

# मराठी

नमः विष्णु पादाय कृष्णप्रिष्ठाय भूतले

श्रीमते लोकनाथ स्वामीन ईति नामिने

कृपया आपके दासी का आपका दिव्य चरण कमल में प्रणाम स्वीकार करें व्यास पूजा की यह शुभ और मंगल प्रसंग पर आपकी ख्याति तीनों लोकों में बनी रहे गुरु महाराज जी आपकी जय हो

गुरु महाराज जी आपको छत्तर भी व्यास पूजा के उपलक्ष में बधाई हो गुरु महाराज जी आपको आने वाले सभी साल सुख समृद्धि आयु वृद्धि यश कीर्ति गुरु गौरांग की कृपा से प्राप्त होती रहे

गुरु महाराज जी आप तो अनंत गुना की खान हो आपके गुना का वर्णन करने लायक में नहीं हूं फिर भी प्रयास कर रही हूं कुछ त्रुटि हो तो बड़े ह्रदय से क्षमा कीजिए

लोकनाथेर जीवन प्रभुपादेर समर्पण

कोमल मंजरी देवी दासी

सांगली

================================================

नमः विष्णु पादाय कृष्ण पृष्ठाय भूतले

श्रीमते लोकनाथ स्वामीन ईति नामिने

नमः विष्णु पादाय कृष्ण पृष्ठाय भूतले.

श्रीमते भक्ती वेदांत स्वामीन इति नामिने

नमस्ते सारस्वते देवे गौरवानी प्रचारिने

निर्विशेषक शून्य वादी पाश्चात्य देश तारिने

परम पूजनीय गुरुदेव लोकनाथ महाराज यांना दंडवत प्रणाम

आपणास 76 व्या व्यास पूजन निमित्त हार्दिक शुभेच्छा

तुम्ही संत मायबाप कृपावंत

काय मी पतीत कीर्ती वानू

अवतार तुम्हा धराया कारण

उद्धारावे जन जड जीवा

वाढविले सुख भक्ती भाव धर्म कुळाचार नाम विठोबाचे

तुका म्हणे गुण चंदनाचे अंगी | तैसे तुम्ही जगी संत

जन

गुरु महाराज आपली महती गुणगान करण्यातपच मी बुद्धिमान नाही व ती क्षमता माझ्यात नाही पण

इतकेच म्हणू शकते की अशा जड जीवावर कृपा केली आहे चंदनाप्रमाणे झिजून सर्व जीवांच्या वर कृपा करण्यासाठी चैतन्य महाप्रभू यांच्याप्रमाणे नगराध्य ग्राम प्रचार आपण करत आहात ऑल इंडिया पदयात्रा वृंदावन परिक्रमा नवद्वीप परिक्रमा एक दिवसीय पदयात्रा झूम मंदिर जपा टॉप विविध मंदिराची प्राणप्रतिष्ठापना विविध उत्सव या माध्यमाद्वारे भक्ती भावाचे सुख आपण प्रदान करत आहात

गुरु महाराज अशीच कृपादृष्टी आमच्यावर राहो आपल्या प्रचार कार्यासाठी आशीर्वाद प्रदान करावे अंतिम लक्ष कृष्ण प्रेम प्राप्त व्हावे हीच अभिलाषा

आपली कृपा अभिलाषी

महालक्ष्मी देवीदासी

शिरढोण आरवडे

===============================================

हरे कृष्ण प्रिय गुरु महाराज

आपल्या चरणी कोटी कोटी दंडवत प्रणाम

गुरु महाराज आपल्याला 76 व्या व्यास पूजन निमित्त हार्दिक शुभेच्छा

ओम अज्ञान तीमिरानधस्य ज्ञानांजन शलाकया चक्षुरूंन्मिलितं येन तस्मै श्री गुरवे नमः

गुरु महाराज आपण खूप खूप दयाळू आहात माझी काही एक पात्रता नसताना आपण माझ्यावर एवढी कृपा केली आहे मी आज जे काही आहे ते केवळ आपल्या कृपेमुळेच आपले एवढे वय आहे तरीसुद्धा तुम्ही नियमितपणे सकाळी मंगला आरती करून दररोज



# मराठी

जपा सेशन जॉईन करून बाकी भक्तांना आपला संघ प्रदान करता प्रत्येक दिवशी वेगवेगळ्या ठिकाणी राहून एवढा प्रवास करून आणि एवढे नवीन प्रोजेक्ट चालू केले आहेत तरी तुमचे प्रत्येक भक्तावर वैयक्तिक लक्ष आहे गुरु महाराज प्रभूपदांनी आपल्याला संत तुकाराम महाराज म्हटले पुण्यामध्ये श्री राधा गोविंद यांच्या ब्रह्म महोत्सव निमित्त तुमचे स्वागत करताना एका प्रभुजींनी म्हटलं होतं की संतांचे दर्शन जर कोणाला घ्यायचे असेल तर डोळे भरून तुमचे दर्शन घ्यावे याचा योग सर्वप्रथम आपल्या कृपेमुळे तुमचे दर्शन 26 जानेवारी 2022 ला आरवडे येथे झाले लेक्चर द्वारे तुम्ही म्हणाला होता की श्री श्री राधा गोपाल यांना जे प्रिय आहेत त्यांना ते त्यांच्या बर्थडे पार्टीसाठी बोलावले आहे हे ऐकून मी भारावून गेले त्यावेळी पहिल्यांदा तुमचे कीर्तन ऐकले आणि मला आजही आठवलं आठवते त्यापूर्वी एवढा आनंदी वातावरण आणि सगळे एवढे रंगून कीर्तनात नृत्य करत होते की असा अनुभव याआधी कधी केला नव्हता त्याच रात्री आपल्या कृपेमुळे कृष्ण बंधूंचे आपले ग्लोरीफिकेशन सेशन ऐकण्याची संधी आपण दिलेत आणि मनात असा विचार केला की मला माझे गुरु महाराज मिळाले केवळ आपल्या कृपा आशीर्वादामुळे कोरोना मधून आम्ही सगळे वाचलो गुरु महाराज मी तुमची मनापासून माफी मागते की मी श्री गौर नेता आहे ना जे प्रॉमिस केले ते मी पूर्ण केले नाही तरीसुद्धा तुम्ही ज्याप्रमाणे खोडकर लेकरावर आई-वडील रागावतात तसेच ते प्रेम करतात तसेच तुम्ही देखील करता जपा सेशनमध्ये जप कसा करावा कोणत्या गोष्टी टाळाव्यात हे तुम्ही सांगितले मी जेव्हा सुट्टी साठी गुजरात वरून घरी आले आणि तुम्ही पंढरपूरला आलात आणि आपल्या दर्शनाची इच्छा तुम्ही पूर्ण केली काही प्रश्न पडले तेव्हा कोणत्या ना कोणता मार्ग मला तुम्ही उत्तर देता तुम्ही एका जपाटामध्ये बोलला होतात की गाई तिच्या वासरावर ते वासरू असे असते की त्याचे त्या गायीकडे आईकडे लक्ष नसते ते त्याच्याच नादात असते पण त्या आईचे सर्वात जास्त प्रेम त्या बासरावर असते त्याचप्रमाणे मी देखील तुमच्यावर प्रेम करतो माझी काही एक पात्रता नाहीये गुरुमाऊली तरी सुद्धा तुम्ही किती कृपा करता तुमच्या ऐतुकी कृपेचे मी शब्दांमध्ये वर्णन करू शकत नाही आम्ही सगळ्यांनी प्रभोपदांना प्रत्यक्षात पाहिले नाही पण माझ्यासाठी माझे प्रभुपाद आपण आहात आणि अजून कितीतरी प्रसंग आहेत त्यामधून तुम्ही मला अलगत वाजवले आहे केवळ आपल्या कृपेमुळे मला कृष्ण बंधू मिळाले मी आपल्या प्रति पण अपराध केले आहेत त्यासाठी मी तुमची मनापासून माफी मागते मला तुमची शिष्य म्हणून स्वीकार करावी ही विनंती माझ्याकडून ध्यानपूर्वक आणि भावपूर्वक जप व्हावा आणि मी सदैव श्री श्री राधा पंढरीनाथ प्रभुपाद आपल्या सेवेमध्ये मग्न राहो असा आशीर्वाद द्यावा आणि माझ्यावर आणि माझ्या परिवारावर सदैव आपली कृपा असू द्यावी ही आपल्या चरणी विनंती

भक्तिन प्रगती ठोंबरे

==============================================



# मराठी

नमः विष्णु पादाय कृष्ण प्रेष्ठाय भूतले

श्रीमती लोकनाथ स्वामीन ईति नामिने

हरे कृष्ण दंडवत प्रणाम माझे परमप्रिय श्री गुरु महाराज तुमच्या व्यास पूजेच्या अत्यंत शुभ दिवशी तुमच्या चरण कमळी माझे विनम्र अभिवादन स्वीकार करा

माझे प्रिय गुरु महाराज

आपल्या पवित्र शरण कमळावर कोटी कोटी नमस्कार श्रीलं प्रभुपादांची जय हो त्यांच्या दिव्य सेवेसाठी आपली जय हो या सर्वात पवित्र व्यास पूजन दिनी मी माझे मन पूर्णपणे आपल्या चरण कमळावर अर्पण करतो आपली कृपा आणि मार्गदर्शनाने माझे जीवन अर्थपूर्ण झाले आहे आपण श्रील प्रभुपादांचे खरे प्रतिनिधी आहात त्यांच्या करुणा भक्ती आणि श्री चैतन्य महाप्रभूंच्या मिशनसाठी असलेल्या पूर्ण समर्पणाचे सजीव मूर्तीमंत रूप आपल्या वाणीमध्ये नामाचे पवित्र कंपन आहे आपले शब्द शास्त्राच्या गोडतेने भरलेले आहेत आणि आपल्या दृष्टीमध्ये एक खरा वैष्णव पाहिल्याचा अनुभव येतो आपण अहोरात्र स्त्रील प्रभुपादांच्या मिशनसाठी कार्यरत आहात आपल्या आरामाची किंवा प्रसिद्धीची चिंता न करता आणि तरीसुद्धा प्रत्येक शिष्याला प्रेमाने काळजीपूर्वक सन्मान देत असता

आजही मला तो प्रसंग आठवतो जेव्हा मी आपल्या चरणी माझ्या ग्रंथ वितरणाचा अहवाल दिला आणि आपण माझ्या पाठीवर प्रेमाने थोपटलं त्या क्षणाचा स्पर्श अजून माझ्या अंतकरणात अनुभवतो ती एक साधित हाप नव्हती ती आपल्या प्रेमाची मान्यतेची आणि पर्यायारण्याची शक्तीशाली झलक होती त्या क्षणाने मला पुन्हा उत्साही बनवलं आणि प्रभुपादांच्या मिशनसाठी प्रामाणिकतेने आणि उत्साहाने सेवा करण्याची प्रेरणा दिली आपली कृपादृष्टी आणि आशीर्वाद हेच माझं खरं वैभव आहे आपली कृपा मिळाली तर कोणतीही सेवा अशक्य नाही माझ्यासारख्या अपात्र जीवासाठी सुद्धा गुरुदेव माझी प्रार्थना आहे माझ्या आळस अभिमान आणि विचलित वृत्तीवर विजय मिळवण्यासाठी माझ्यावर कृपा करा जेणेकरून मी आपला केवळ नाममात्र नाही तर कृतीतून खरा शिष्य होईल आपल्या मिशनचा एक प्रामाणिक नम्र आणि समर्पित सेवक आपली कृपा हेच माझे एकमेव आश्रय आहे आपली उपस्थिती हेच माझं मार्गदर्शन आहे आपले चरण कमळ हेच माझं शाश्वत निवासस्थान आहे पूर्ण भावनेने पूर्ण कृतज्ञतेने आणि समर्पणाने

तुमचा अपात्र दास.

आदी पुरुष रामदास

==============================================

नमः विष्णु पादाय कृष्ण पृष्ठाय भूतले

श्रीमते लोकनाथ स्वामीन ईति नामिने

नमः विष्णु पादाय कृष्ण पृष्ठाय भूतले.

श्रीमते भक्ती वेदांत स्वामीन इति नामिने

नमस्ते सारस्वते देवे गौरवानी प्रचारिने

निर्विशेषक शून्य वादी पाश्चात्य देश तारिने

परम पूजनीय गुरुदेव लोकनाथ महाराज यांना दंडवत प्रणाम

आपणास 76 व्या व्यास पूजन निमित्त हार्दिक शुभेच्छा

तुम्ही संत मायबाप कृपावंत

काय मी पतीत कीर्ती वानू

अवतार तुम्हा धराया कारण

उद्धारावे जन जड जीवा

वाढविले सुख भक्ती भाव धर्म कुळाचार नाम विठोबाचे

तुका म्हणे गुण चंदनाचे अंगी | तैसे तुम्ही जगी संत

जन गुरु महाराज आपली महती गुणगान करण्यातपच मी बुद्धिमान नाही व ती क्षमता माझ्यात नाही पण इतकेच म्हणू शकते की अशा जड जीवावर कृपा केली आहे चंदनाप्रमाणे झिजून सर्व जीवांच्या वर कृपा करण्यासाठी चैतन्य महाप्रभू यांच्याप्रमाणे नगराध्य ग्राम प्रचार आपण करत आहात ऑल इंडिया पदयात्रा वृंदावन परिक्रमा नवद्वीप परिक्रमा एक दिवसीय पदयात्रा झूम मंदिर जपा टॉप विविध मंदिराची प्राणप्रतिष्ठापना विविध उत्सव या माध्यमाद्वारे भक्ती भावाचे सुख आपण प्रदान करत आहात

गुरु महाराज अशीच कृपादृष्टी आमच्यावर राहो आपल्या प्रचार कार्यासाठी आशीर्वाद प्रदान करावे अंतिम लक्ष कृष्ण प्रेम प्राप्त व्हावे हीच अभिलाषा

आपली कृपा अभिलाषी

महालक्ष्मी देवीदासी

शिरढोण आरवडे

=======================================





परमपूज्य लोकनाथ स्वामी महाराजांचे चरणी दंडवत प्रणाम परमपूज्य लोकनाथ स्वामी महाराजांचा जन्म 1949 मध्ये आरवडे येथे झाला 1972 मध्ये ते शिल्पकार यांचे शिष्य झाले त्यांनी त्यांच्या हरिनाम दीक्षा घेतली त्यानंतर डिसेंबर 1975 मध्ये वयाच्या 26 व्या वर्षी त्यांना संन्यास दीक्षा मिळाली, श्रीलंप्रोपादांनी त्यांना जगभरात पदयात्रा आयोजित करून भगवान श्री चैतन्य यांचा संदेश सांगण्याची आज्ञा दिली या प्रवासाचा पहिला टप्पा वृंदावन ते मायापूर असा होता

महाराष्ट्रातील त्यांच्या प्रवचना व्यतिरिक्त त्यांची प्रेरणादायी व्याख्याने आणि कीर्तने प्रसिद्ध आहेत ते एक उत्तम शिष्य असल्याचे उदाहरण आहेत आपल्या गुरुने सांगितलेली आज्ञा काटेकोरपणे कसे पाळा पाळणे हे परमपूज्य लोकनाट स्वामी महाराज यांच्याकडून शिकावे ते आज इस्कॉन मधील दीक्षा गुरून पैकी एक आहेत आणि त्यांनी जगभरात अनेकांना दीक्षा देऊन आपल्या शिष्य करून मार्गदर्शन केले आहे मीही त्यातलाच एक भाग्यवान आहे ज्याला परमपूज्य लोकनाट स्वामी महाराजांनी आपल्या छत्रछायेत घेतलं गुरु हा पथप्रदर्शक असतो तो आपल्या आपल्याला मार्गदर्शन करतो आणि आयुष्यात येणाऱ्या अडचणींना सामोरे जाऊन त्यासोबत जगायला शिकवतो आयुष्यात अध्यात्मिक गुरु असणे फार गरजेचे असते कारण गुरूच ती व्यक्ती असते जी आपल्या चुका पदरात घेऊन आपल्याला भगवंतांची संलग्न करते कारण शास्त्रांमध्ये सांगितल्याप्रमाणे जोपर्यंत आपण पापरहित होत नाही तोपर्यंत आपल्याला भगवतप्राप्ती होत नाही आणि आपण असंख्यजन्म जरी घेतले तरी आपण आपली पाप शून्य नाही करू शकत पण जर आपण गुरुचा आश्रय घेतला तर दुरुस्ती व्यक्ती असते जिच्यामुळे आपला भार हलका होतो

जानेवारी 2022 मध्ये मी पंढरपूर मध्ये सर्वात आधी गुरु महाराजांचे दिव्य कीर्तन ऐकलं पण तेव्हा मला गुरूंची काय महती असते हे माहीत नव्हतं हळूहळू मी गुरु महाराजांची माहिती जाणून घेतली त्यांची महिमा ऐकली असं म्हणतात ना आपण गुरु निवडत नाहीत तेच आपल्याला कृपा छत्र प्रदान करतात गुरु महाराजांच्या दिव्य कीर्तनाचा सतत लाभ घेतल्यानंतर माझ्या भक्तीचा प्रवास सुरू झाला. तीन वर्षानंतर तुकाराम बीज च्या दिवशी हडपसर येथील सेंटरमध्ये मला दीक्षा घेण्यासाठी मार्गदर्शन मिळाले त्यात महाराजांचे दिव्य सत्संग ऐकायला मिळाले माझी पात्रता नसताना सुद्धा मला एक संधी मिळाली सर्वच गोष्टी एकमेकांशी जस जुळलेले आहेत असं वाटत होतं जसं की एखादा चमत्कार वाटलं ही नव्हतं इतक्या लवकर गुरु महाराजांचे शरण मला मिळेल पण मी असा ऐकलं होतं की महाराजांचे मन लोण्यासारखे मऊ आहे म्हणून कदाचित त्यांनी माझ्यावर इतक्या लवकर कृपा केली

परमपूज्य लोकनाट्य महाराजांची 75 वी व्यासपूजा आणि त्यात माझं भाग्य इतकं मोठं की माझी हरिनाम दीक्षा हा योग अत्यंत दिव्य होता वृंदावन मध्ये दीक्षा होणे म्हणजे विशेष कृपा आणि हे फक्त गुरु महाराजांमुळे शक्य झालं आषाढी एकादशीच्या दुसऱ्या दिवशी वृंदावन मधील इस्कॉन गो शाळेत मला महाराजांनी दीक्षा दिली आणि माझा धनंजय चा देव हरिदास झाला माझ्या सगळ्या

चुका सगळे अपराध क्षमा करून त्यांनी मला कल्पवृक्षाप्रमाणे सावली दिली

गुरु हे तीच व्यक्ती असते जे आपली पात्रता न बघता आपल्याला मार्गदर्शन देते आणि त्या गुरूच्या मार्गदर्शनाशिवाय भगवंत प्राप्त होत नाहीत मी गुरु महाराजांबद्दल काही लिहू शकेल इतकी माझी पात्रता नाही पण त्यांनी जे केलेल्या माझ्यासाठी त्याचे रूळ मी कधीच चुकते करू शकत नाही पण त्यांनी दिलेल्या आज्ञाचे प्रामाणिक पालन करणे हीच माझी आदरांजली आहे त्यांना परमपूज्य गुरु महाराजांना व्यासपूजा महोत्सवाच्या हार्दिक शुभेच्छा

देव हरिदास

पुणे

==============================================

नमः विष्णुपादाय कृष्णप्रेष्ठाय भूतले  श्रीमते लोकनाथ स्वामींन इति नामिने

गुरु महाराजांना 76 व्या व्यास पूजेच्या लाख लाख शुभेच्छा गुरुदेव हे कृपेच्या सागरातून म्हणजेच भगवंताकडून भरभरून कृपा प्राप्त करीत आहेत जसे की दररोज सकाळी पहाटे साडेपाच वाजता सर्व भक्तांना झूमद्वारे कृपाशीर्वाद देतात हे पाहून मनाला खूप बरे वाटते आनंद होतो एखाद्यावेळी उठण्यासाठी वेळ झाला तरी दिवसभर आज आपली फार मोठी चूक झाली असे वाटते कारण आज आपणास गुरु महाराजांचा आशीर्वाद मिळू शकला नाही याची खंत वाटते

गुरु महाराजांचे गुणगान करण्याची याबद्दल जीवाची काहीच पात्रता नाही त्यांचे गुणगान करण्यासाठी माझे शब्द अपुरे पडतील महाराजांना पदयात्रा दिंडी खूप आवडते ते पदयात्री भक्तांना विचारत असतात की पदयात्रा दिंडी कोठे आहे ग्रंथ वितरण प्रचार प्रसार कशा प्रकारे सुरू आहे तुम्ही जास्तीत जास्त भक्तांना प्रसाद ग्रंथ वितरण करा त्यामुळे प्रचार वाढेल त्यांना कीर्तन सम्राट संत तुकाराम महाराज म्हणून सर्वत्र ओळखले जाते झूम द्वारे त्यांचे नाव गिनीज बुक ऑफ वर्ल्ड मध्ये नोंद झाले आहे

गुरुदेवांना जेव्हा मिरजेमध्ये पहिल्यावेळी पाहिले तेव्हा त्यांना पाहता क्षणी वाटले की हे कोणी साधारण व्यक्ती नसून एक तेजस्वी भव्य दिव्य असणारी व्यक्ती म्हणजे हेच ते गुरु महाराज ते खूप दयाळू मृदू वाणी असणारे माझे गुरुदेव

गुरुदेवांनी मला चांगला ध्यानपूर्वक मन लावून जप करण्याची सेवा करण्याची ग्रंथ वाचन करण्याची बुद्धी द्यावी भगवंतांचे कधीही विस्मरण होऊ नये असा आशीर्वाद द्यावा

गुरु महाराजांना भगवंतांनी चांगले आरोग्य भरभरून सुख समृद्धी आणि निरोगी आयुष्य द्यावे हीच भगवंतांच्या चरणी प्रार्थना

पुन्हा एकदा व्यास पूजेच्या हार्दिक शुभेच्छा

अर्चन मग्न देवीदासी

सांगली

=====================================================

परम पूज्य लोकनाथास्वामी आपणास व्यास पूजेच्या हार्दिक शुभेच्छा कोटी कोटी दंडवत प्रणाम

श्रीकृष्ण कृपा मूर्ती आपला जय जयकार असो 76 वी व्यास पूजेच्या आपणास शुभेच्छा आपले यश तिन्ही लोकांत पसरले आहे श्रीकृष्णांचे नाव पसरवण्यासाठी आपण आपले आयुष्य समर्पित केले आहे तोच श्रीकृष्ण आम्हाला आपला यश महिमा संपूर्ण जगभर पसरवण्यासाठी प्रेरणा देत आहे गुरु महाराज वाठार गावात भागवतम ठेवले आहे गुरु महाराज आम्ही शब्द पाळला आहे तुमच्या कृपेने भागवतम ठेवत आहे शिरवळ से भक्त लोक निरसे भक्त लोक वाठार से भक्त लोक व्यास पूजेच्या निमित्ताने भागवतम ठेवले आहे तुमचा आशीर्वाद आमच्या पाठीशी आहे आमच्या कुटुंबाला आणि वठार गावातल्या भक्तांना आशीर्वाद द्या कुटुंब परिवाराचा गुरु महाराज कोटी कोटी दंडवत प्रणाम स्वीकार करावा तुमचा आशीर्वाद राहू द्या

तारिणी यमुना देविदासी

सातारा

=============================================

नमः विष्णु पादाय कृष्णपृष्ठाय भूतले

श्रीमते लोकनाथ स्वामीन ईति नामिने

हरे कृष्ण गुरु महाराजांच्या चरणामध्ये कोटी कोटी दंडवत प्रणाम गुरुदेवांच्या 76 व्या व्यासपूजा निमित्त प्रभुपादांना आणि भगवंतांना प्रार्थना करते की महाराजांना उदंड आयुष्य स्वास्थ लाभावे कधी कधी वाटते आपण काय प्रार्थना करणार गुरुदेवांसाठी त्यांनी जेवढे केलेले आहे माझ्यासाठी किंवा माझ्यासारख्या पतितजीवांसाठी त्याची परतफेड होऊच शकत नाही

असे म्हणतात की गुरूंची भगवंतासारखीच पूजा किंवा सेवा केली पाहिजे कारण त्यांनी सतत चिंतनाद्वारे भगवंतांना एक प्रकारे

धारणच केलेले असते. माझ्या गुरू महाराजांबद्दल तर काय सांगावे ते तर करुणेची साक्षात मूर्तिच आहेत लहान मोठे सगळ्यांनाच आदरणीय आहेत अर्थातच जो त्यांना भेटतो प्रत्येक जण त्यांच्याशी प्रभावित होतो महाराजांच्या इस्कॉन मधील सेवा त्यांचे प्रचार कार्य भक्ती मधील प्रगतीसाठी आणि प्रत्येक शिष्याच्या आध्यात्मिक प्रगती साठी जपा व जपाटाक अशा अनेक प्रकारचे कार्य महाराजांनी केलेले आहेत आणि करत आहेत त्याबद्दल सगळेच अवगत आहे मी जास्त काय सांगणार महाराजांचा संघ आशीर्वाद असाच आम्हाला लाभत राहो भगवंतांच्या चरणी हीच एक प्रार्थना

आपली कृपाभिलाशी

उज्वला गोपी देवीदासी.

संभाजी नगर

===========================================

नमः विष्णुपादाय कृष्णप्रेष्ठाय भूतले श्रीमते लोकनाथ स्वामींन इति नामिने

गुरु महाराजांना 76 व्या व्यास पूजेच्या लाख लाख शुभेच्छा गुरुदेव हे कृपेच्या सागरातून म्हणजेच भगवंताकडून भरभरून कृपा प्राप्त करीत आहेत जसे की दररोज सकाळी पहाटे साडेपाच वाजता सर्व भक्तांना झूमद्वारे कृपाशीर्वाद देतात हे पाहून मनाला खूप बरे वाटते आनंद होतो एखाद्यावेळी उठण्यासाठी वेळ झाला तरी दिवसभर आज आपली फार मोठी चूक झाली असे वाटते कारण आज आपणास गुरु महाराजांचा आशीर्वाद मिळू शकला नाही याची खंत वाटते

गुरु महाराजांचे गुणगान करण्याची याबद्दल जीवाची काहीच पात्रता नाही त्यांचे गुणगान करण्यासाठी माझे शब्द अपुरे पडतील महाराजांना पदयात्रा दिंडी खूप आवडते ते पदयात्री भक्तांना विचारत असतात की पदयात्रा दिंडी कोठे आहे ग्रंथ वितरण प्रचार प्रसार कशा प्रकारे सुरू आहे तुम्ही जास्तीत जास्त भक्तांना प्रसाद ग्रंथ वितरण करा त्यामुळे प्रचार वाढेल त्यांना कीर्तन सम्राट संत तुकाराम महाराज म्हणून सर्वत्र ओळखले जाते झूम द्वारे त्यांचे नाव गिनीज बुक ऑफ वर्ल्ड मध्ये नोंद झाले आहे

गुरुदेवांना जेव्हा मिरजेमध्ये पहिल्यावेळी पाहिले तेव्हा त्यांना पाहता क्षणी वाटले की हे कोणी साधारण व्यक्ती नसून एक तेजस्वी भव्य दिव्य असणारी व्यक्ती म्हणजे हेच ते गुरु महाराज ते खूप दयाळू मृदू वाणी असणारे माझे गुरुदेव

गुरुदेवांनी मला चांगला ध्यानपूर्वक मन लावून जप करण्याची सेवा करण्याची ग्रंथ वाचन करण्याची बुद्धी द्यावी भगवंतांचे कधीही विस्मरण होऊ नये असा आशीर्वाद द्यावा

गुरु महाराजांना भगवंतांनी चांगले आरोग्य भरभरून सुख समृद्धी आणि निरोगी आयुष्य द्यावे हीच भगवंतांच्या चरणी प्रार्थना

पुन्हा एकदा व्यास पूजेच्या हार्दिक शुभेच्छा

अर्चन मग्न देवीदासी

सांगली

==========================================

नमः विष्णु पादाय कृष्ण पृष्ठाय भूतले

श्रीमती लोकनाथ स्वामीन इति नामिने

परम पूज्य श्री लोकनाथ स्वामी महाराज आपल्या चरण कमळी कोटी कोटी दंडवत प्रणाम

मी काय आपली महिमा वर्णन करू शकते मी तर आपल्यासारख्या भक्तीरूपी सागरा पुढे पाण्याचा एक थेंब आहे तरीसुद्धा हे माझे सौभाग्य आहे की आज या पावन दिवशी मला आपले कौतुक करण्याची संधी मिळाली

आपल्या 76 व्या व्यासपूजा महोत्सवानिमित्त आपणास खूप खूप शुभेच्छा आपणास सुदृढ व उदंड आयुष्य लाभो हीच श्री श्री राधा गोपाल ज्यांच्या चरणी प्रार्थना करते

गुरु महाराज तुम्ही खूप दयाळू आणि कृपाळू आहात भगवंता सारखेच यात काही शंकाच नाही म्हणूनच तर दररोज घेऊन द्वारे आपण आपला मौल्यवान वेळ आमच्यासारख्या शिष्यांसोबत देता जपासाठी ही आमच्या गुरूंनी आम्हाला दिलेली अमूल्य भेट आहे दिवसाची सुरुवात दररोज आपल्या दर्शनाने होते 2018 पासून अखंडपणे आपण झूमवर जप करण्यासाठी एकत्र येतात आज 2024 म्हणजेच सहा वर्ष होत आहेत तुमची निरंतरता मला प्रेरणा देते रोज सर्वांसोबत जप करण्याची झुंबर जप करणे माझी दिनचर्या झाली आहे

गुरु महाराज आपल्याला प्रभुपात महाराष्ट्राचे संत तुकाराम म्हणायचे आम्ही तर तुकाराम अण्णा पाहिले नाही पण आपल्या दर्शनाने आम्हाला तुकाराम महाराजांचे दर्शन होते

खूप खूप धन्यवाद गुरु महाराज

==============================================

नमः विष्णु पादाय कृष्णप्रिष्ठाय भूतले

श्रीमते लोकनाट्य स्वामीन ईति नामिने

कृपया आपके दासी का आपका दिव्य चरण कमल में प्रणाम स्वीकार करें व्यास पूजा की यह शुभ और मंगल प्रसंग पर आपकी ख्याति तीनों लोकों में बनी रहे गुरु महाराज जी आपकी जय हो

गुरु महाराज जी आपको छत्तर भी व्यास पूजा के उपलक्ष में बधाई हो गुरु महाराज जी आपको आने वाले सभी साल सुख समृद्धि आयु वृद्धि यश कीर्ति गुरु गौरांग की कृपा से प्राप्त होती रहे

गुरु महाराज जी आप तो अनंत गुना की खान हो आपके गुना का वर्णन करने लायक में नहीं हूं फिर भी प्रयास कर रही हूं कुछ त्रुटि हो तो बड़े हृदय से क्षमा कीजिए

लोकनाथेर जीवन प्रभुपादेर समर्पण

कोमल मंजरी देवी दासी

सांगली

=================================================

हरे कृष्ण

व्यासपूजा शब्दांजली 2025

ॐ अज्ञान तिमिरान्धस्य ज्ञानाञ्जनशलाकया

चक्षुरुन्मीलितं येन तस्मै श्रीगुरवे नमः

श्रीचैतन्यमनोऽभीष्टं स्थापितं येन भूतले स्वयं रूपः कदा मह्यं ददाति स्वपदान्तिकम्



# मराठी

नमो ओम विष्णुपादाय कृष्णप्रेष्ठाय भूतले

श्रीमते लोकनाथ स्वामी इति नामिने

परमपूज्य श्रीकृष्ण कृपामूर्ती आदरणीय गुरुदेव श्रील लोकनाथ स्वामी महाराज आपल्या चरणी कोटी कोटी दंडवत प्रणाम

श्रील गुरुदेव 76 व्या व्यासपूजेच्या निमित्ताने आपणास खूप खूप शुभेच्छा व्यक्त करून पूर्ण पुरुषोत्तम भगवान श्रीकृष्ण, श्रीमती राधाराणी, श्री चैतन्य महाप्रभू, श्री नित्यानंद महाप्रभू ,श्रीमती तुलसी महाराणी, आणि परम गुरुदेव श्रील प्रभूपादांच्या चरणी प्रार्थना करतो की माझ्या गुरुदेवांना आरोग्यमय दिर्घायुष्य लाभो जेणेकरून माझ्यासारख्या लाखो बद्ध व पतित जीवांचा उद्धार होईल.

व्यासपुजेच्या निमित्त गुरुदेवांचे गुणगान करण्याची पात्रता निश्चितच माझ्या अंगी नाही. परंतु आपल्याच कृपाशीर्वादाने आपले गुणगान करण्याचा प्रयत्न करीत आहे.

श्रील गुरुदेव आपण प्रभुपादांच्या हरे कृष्ण आंदोलनाचा प्रचार प्रसार कार्य करण्यासाठी आविर्भाव घेतला आहे आपण आपल्या अनेक दिव्य कार्यातून प्रभुपादांचा व गौडिय वैष्णव परंपरेचा गुणगौरव वाढविला आहे

1996 साली श्री प्रभुपादांच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने स्थापन केलेल्या श्रील प्रभुपाद जन्मशताब्दी महोत्सवाचे प्रमुख संचालनपद परमपूज्य श्री गुरुदेव आपण भूषविले जन्मशताब्दीच्या निमित्ताने संपूर्ण विश्वात 110 पेक्षा अधिक देशातून पदयात्रा सुरू केल्या पदयात्रेच्या माध्यमातून आपण हरिनामाचा प्रचार व प्रसार कार्य करीत आहात या माध्यमाने अनेक बद्ध जीवांचा उद्धार होत आहे भारतात तर ऑल इंडिया पदयात्रा सतत भारत भ्रमण करत असते प्रचार प्रसार आणि ग्रंथ व प्रसाद वितरणाचे कार्य करत असते तर अशाच प्रकारच्या पदयात्रा प्रत्येक राज्यातून स्वतंत्र परिक्रमा सुरू होत आहेत व त्याही त्या त्या राज्यामध्ये सतत भ्रमण करून प्रचार प्रसार कार्य आणि ग्रंथ व प्रसाद वितरणाचे कार्य करीत आहेत आज भारतातील बारा पेक्षा अधिक राज्यातून अशा स्वतंत्र परिक्रमा सुरू झाल्या आहेत प्रभुपादांची इच्छा होती की अनेक पदयात्रा असाव्यात या प्रभुपादांच्या इच्छेची पूर्ती करण्यास आपण कटिबद्ध आहात याच आपल्या प्रयत्नातून या पदयात्रांचा उगम होत आहे व त्याचे उत्तम संचलन होत आहे हे सर्व आपल्या दिव्य कृपाशीर्वादानेच शक्य झाले असून यामुळे प्रभुपाद व गुरुगौरांग यांच्या गौरवा मध्ये भरच पडली आहे

या पदयात्रांच्या प्रेरणेतूनच आपण भक्तांना एक दिवसीय पदयात्रा काढण्यास, आषाढी कार्तिकी चैत्री इत्यादी दिंडी काढण्यास, रथयात्रा काढण्यास व नगर संकीर्तन करण्यास प्रेरित करीत आहात यातूनही खूप मोठ्या प्रमाणात प्रचार प्रसार कार्य व ग्रंथ व प्रसाद वितरण कार्य संपन्न होत आहे यामुळे इस्कॉन जगताचा विस्तार खूप मोठा होत आहे

प्रत्येक वर्षी कार्तिक महिन्यामध्ये आपण एक महिन्याची ब्रज मंडल परिक्रमा वृंदावन येथे सुरू केली आहे या परिक्रमेचा लाभ





घेण्यासाठी जगभरातून व भारतातून अनेक संन्याशी, ब्रह्मचारी, गृहस्थ भक्त कार्तिक महिन्यामध्ये ब्रज मंडल परिक्रमेत सहभागी होऊन आपल्या कृष्णभावने मध्ये वृद्धी करीत असतात गौडीय वैष्णव परंपरेमध्ये या ब्रज मंडल परिक्रमेला खूप महत्त्व आहे . जे लोक प्रत्यक्ष कार्तिक महिन्यातील या परिक्रमेमध्ये सहभागी होऊ शकणार नाहीत त्यांच्यावरती कृपा करण्यासाठी आपण ब्रजमंडल दर्शन या पुस्तकाद्वारे घरबसल्या परिक्रमा करण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे तसेच ऑनलाईन परिक्रमा करण्याची ही सुविधा उपलब्ध करून दिली आहे या माध्यमातून आपण जास्तीत जास्त बद्ध जीवांच्या पर्यंत कृष्ण भावना पोचवून इस्कॉनच्या कार्याचा विस्तार करीत आहात

प्रतिवर्षी आपण गौरपौर्णिमेच्या निमित्ताने नवद्वीप मंडल परिक्रमा सुरू केली आहे ही परिक्रमा सुद्धा इस्कॉन जगतात व गौडीय वैष्णव संप्रदायात अत्यंत महत्त्वपूर्ण ठरते या परिक्रमेला जगातून व भारतातील वेगवेगळ्या प्रांतातून अनेक वैष्णव गण उपस्थित राहतात प्रांत वार अनेक गटामधून ही परिक्रमा सुयोग्यरीत्या संपन्न होत असते या परिक्रमेच्या माध्यमातून भक्तांचे चैतन्य महाप्रभूंच्या प्रतीचे प्रेम अधिक वाढते तर चैतन्य महाप्रभू या भक्तांच्या वर भरभरून कृपा वर्षाव करीत असतात ही सर्व किमया माझ्या गुरुदेवांच्या कृपाशीर्वादाने झाली आहे

जगन्नाथपुरी व पंढरपूर या दोन धामात आपण अशाच प्रकारच्या परिक्रमा सुरू केली आहे

या आपल्या पदयात्रा कार्यातूनच इस्कॉनने आपणास इस्कॉन पदयात्रा मंत्रीपद बहाल केले आहे

आपल्या दिव्य किर्तनाने आपण संपूर्ण जगतात किर्तनसम्राट म्हणून प्रसिद्ध आहात या आपल्या किर्तनाच्या माध्यमातून अनेक युवा इस्कॉनचे भक्त बनले आहेत, बनत आहेत व पुढे बनणार आहेत आपल्या उत्साही व प्रेरणादायी किर्तनावरती श्रील प्रभुपाद खूप प्रसन्न होते आणि लोकनाथ स्वामी हा कीर्तन करण्यासाठीच आला आहे, लोकनाथ महाराष्ट्राचा तुकाराम महाराज आहे, लोकनाथ स्वामी आमचे नेते आहेत, असे श्रील प्रभुपाद आपल्या शिष्यांना अभिमानाने म्हणत असत. आणि म्हणूनच जगातील सर्व मोठे किर्तन मेले माझे गुरुदेव श्री लोकनाथ महाराजांच्याशिवाय संपन्न होत नाहीत. त्यांच्या किर्तनामध्ये लहान बालकापासून ते वृद्धापर्यंत सर्वजण भावविभोर होऊन आनंदाने नृत्य करीत असतात या माध्यमातूनही अनेक बद्ध जीवांचा उद्धार होत आहे

श्रील गुरुदेव आपल्या किर्तनाचे वर्णन आम्ही पतीत बद्धजीव करू शकत नाही. परंतु श्रील प्रभुपादांनी आपल्या किर्तनाचे कौतुक का केले ? हे जीवनात एकदा तरी आपले किर्तन प्रत्यक्षात ऐकल्याशिवाय, पाहिल्याशिवाय व त्यावर नृत्य केल्याशिवाय समजणार नाही. आपल्या अद्भुत किर्तनाचे वर्णन करणे माझ्यासारख्या बद्धजीवाच्या आवाक्याच्या बाहेरचे आहे.

या त्यांच्या दिव्य किर्तन कार्यातून इस्कॉनने आपणास किर्तन मंत्रीपद बहाल केले आहे

श्रील प्रभुपाद यांची तीव्र इच्छा होती की भारतामध्ये होणाऱ्या कुंभमेळ्यामध्ये इस्कॉन चा स्वतंत्र आखाडा व महंत असावा



# मराठी

यासाठी आपण खूप प्रयत्नशील राहिलात व आपण इस्कॉन साठी स्वतंत्र आखाडा व महंत पद खेचून आणले आपणास 20 एप्रिल 2004 रोजी उज्जैन येथे अखिल भारतीय कुंभमेळा आखाडा परिषदेने इस्कॉनचे महंत म्हणून घोषित केले

आपण एक विश्वविख्यात भागवत कथाकार म्हणून ही प्रसिद्ध आहात आपल्या भागवत कथा भारत, साउथ आफ्रिका, अमेरिका, मॉरिशस आणि युरोपीय देशातून इंग्रजी हिंदी मराठी भाषेतून होत असतात आपली कथा ऐकणाऱ्यांची ह्दय लगेचच कृष्ण भावनाभावीत होते व ती व्यक्ती कृष्ण फक्त बनते अशी आपली मधुर वाणी आहे

आपण पंढरपूरच्या विठ्ठलाला आपल्या कीर्तनाद्वारे, प्रभुपाद घाटाद्वारे, भूवैकुंठ पंढरपूर पुस्तकाद्वारे व श्री श्री राधा पंढरीनाथ मंदिराद्वारे जगभर पोहोचवले

श्रील प्रभुपाद या भौतिक जगातील आपली लीला संपवून त्यांनी भागवत धामात प्रयाण करताना एक इच्छा बोलून दाखवली की जो कोणी माझ्यावर प्रेम करतो तो व्यक्ती निश्चितपणे एकमेकांशी सहकार्य करूनच राहील जेणेकरून इस्कॉन अखंड एकसंघ कार्यरत राहील इस्कॉनच्या रूपाने मी या भौतिक जगतामध्ये भगवंतांच्या सेवेमध्ये व माझ्या शिष्यांच्या संगामध्ये सतत असेन या गोष्टीची जाणीव आपण सदैव ठेवलीत व इस्कॉन मधून बाहेर पडणाऱ्या भक्तांना एकसंघ ठेवण्याचा खूप प्रयत्न केलात त्यामध्ये आपल्याला खूप छान यश आले आणि या आपल्या कार्यामुळे श्रील प्रभुपाद आपल्यावरती खूप खूप प्रसन्न आहेत व आपल्या वरती कृपेचा वर्षाव सतत करत आहेत

श्रील गुरुदेव दररोज सकाळी आपला संग व अमृतमय कृपेचा वर्षाव जपा टॉकच्या रूपाने आमच्यावर होत असतो. आपली धीर गंभीर वाणीद्वारे श्रवण केल्याने माझ्यासारख्या बद्ध जीवांचा उद्धार होतो.

आपल्यावरती जीवापाड प्रेम करणारे आपले बंधू व प्रियशिष्य धर्मावतार प्रभुजी, नंदलाल प्रभुजी व सीता माताजी यांनी वैकुंठ धामाकडे प्रयाण केले आपण या भौतिक जगामध्ये पोरके झालात तरीही आमच्यावरती मायेची छत्र धरून आम्हासारख्या बद्ध जीवांना पोरकेपणाची जाणीव होऊ नये यासाठी कृपेचा वर्षाव करीत आहात

आपल्या दिव्य भव्य कार्याचा आढावा घेणे या पतीत जीवाच्या आवाक्याच्या बाहेरील गोष्ट आहे हे कार्य म्हणजे सागराला एका छोट्या घागरीमध्ये भरण्यासारखेच आहे तरीही व्यास पूजेला शिष्याने आपल्या गुरुचे गुणगान करण्याचे कार्य करण्याच्या निमित्ताने हा एक छोटासा प्रयत्न गोड मानून घ्याल अशी आशा आहे

श्रील गुरुदेव हा पतित सेवक आपल्याकडे याचना करतो की आपण मला आशीर्वाद द्या की माझ्या ह्दयामध्ये भगवंतांचे शुद्ध प्रेम जागृत व्हावे व या शुद्ध प्रेमाचे वितरण करण्याची क्षमता माझ्यामध्ये विकसित व्हावी. आपला संग प्राप्त व्हावा. गुरुदेव आपली





सेवा या तुच्छ पतीत जीवाकडून तन, मन,धन आणि वाणीद्वारे सर्वोत्कृष्ट व्हावी.

श्रील गुरुदेव आपल्या व्यासपूजे निमित्त पुन्हा एकदा आपणास खूप खूप शुभेच्छा व्यक्त करून भगवंतांच्या व गुरुगौरांगांच्या चरणी प्रार्थना करतो की आपणास आरोग्यमय दीर्घायुष्य लाभो.

आपला अतिपतित कृपाभिलाषी

उज्ज्वलकृष्ण दास

आरवडे

*************************************************************

वंदे गुरु शरणम गुरु शरणं शरणं गुरु शरणं

वंदनीय गुरू महाराज तुमच्या विषयी लिहिण्याची माझी पात्रता नाही तुमची शिष्य शामकृष्ठा देविदासी तुमच्यासाठी जे काही मोडके थोडके शब्द लिहील त्याचा तुम्ही स्वीकार करावा आज तुमच्यामुळे मी अध्यात्मिक मार्गावर आले राधाकृष्ण श्रीराम विष्णू यांची कशी सेवा करायची हे माहीत झाले वाणी मन जेव्हा क्रोध अहंकार इत्यादी इंद्रियांवर कसे नियंत्रण करायचे हेही तुम्ही शिकवले रोज सकाळी जपा टोकच्यावेळी तुम्ही आसनावर बसलेले असतात तुमच्या प्रसन्न चेहऱ्याकडे पाहून माझ्या मनाची हृदयाची बॅटरी चार्ज होते कधी पहाट होते आणि कधी तुमचे दर्शन मिळते याची मनाला उत्सुकता लागते ज्यावेळी एक आत्म्याची बैठक किंवा मिलन चालू आहे असं वाटतं वाटत राहते तुमच्या दासानुदास होण्याचे सर्व श्रेय महालक्ष्मी माताजींचे आहे आज त्यांच्यामुळेच मी आध्यात्मिक मार्गावर आले आणि तुमची दासानुदास होण्याची संधी माझ्या शिक्षा गुरु महालक्ष्मी माताजी यांनी दिली. गुरूंचे व्यक्तिमत्व आपण आपल्या भौतिक डोळ्यांनी पाहू शकत नाही त्यांनीच दिलेल्या अध्यात्मिक डोळ्यांनी गुरु प्रेमाचे अंजन घालून अंतस्थ हृदयातून गुरूंना पाहू

शकतो सावधानतेने गुरुनावंदन करूया आणि गुरूंचा कृपाप्रसाद घेऊया कारण कृपाप्रसाद मिळाल्याशिवाय हा भवसागर तरुण जाणे आणि कृष्ण प्रेम मिळणे अशक्य आहे न धनं न जनम न सुंदरी कोणत्याही प्रकारची आशा न करता गुरूच्या चरणाची आसक्ती असावी आश्रय घ्यावा त्यामुळेच आपल्याला गुरु प्रेम कृष्ण प्रेम प्राप्त होईल

आपली दासानुदासी

श्यामप्रेष्ठा देवीदासी

शिरढोण आरवडे

=========================================================

ओम अज्ञान तीमिरांधस्य ज्ञानांजन शलाकया

चक्षुरूंमिलितं येन तस्मै श्री गुरवे नमः

परमपूज्य लोकनाथ स्वामी महाराजांच्या चरणी माझे कोटी कोटी दंडवत प्रणाम आपल्या व्यासपूजा निमित्त कोटी कोटी शुभेच्छा

आमच्यासारख्या बद्ध जीवांवर आपण कृपा करून भगवद भक्ती दिलात

आपण श्रीलंप्रभदांच्या आदेशाला आपले जीवन बनवले

गुरुवाणी ही श्रेष्ठ वाणी गुरु संदेश जगाला दिला

आपले सर्वोत्कृष्ट कार्य आपण करत आहात

आपण सगळ्या जीवांवर समभावाने दया करता

आपले गुण नम्रता सहनशीलता आहे

आपण सगळ्यांवर कृपा करता आपण दीनबंधू आहात कृपासिंधू आहात दयेचे सागर आहात आपण कीर्तन सम्राट आहात आपल्या कीर्तनाद्वारे सगळ्यांना आपण कृष्ण प्रेम प्रदान करत आहात

आपल्या कृपेमुळे भगवंतांची कृपा प्राप्त होते आपली कृपा नसेल तर आध्यात्मिक मार्गावर प्रगती करणे अशक्य आहे

झूम मंदिरामध्ये पाच वाजता जप आपण सुरू करता आपल्याबरोबर जग चांगला होतो जप आणि जपा टॉक याच्याने आम्हाला उत्साह येतो प्रेरणा मिळते आपण मोठे मंदिर स्थापन करीत आहात पंढरपूर मध्ये आपण भव्य मंदिर निर्माण करीत आहात आणि श्रीलंप्रोपात घाट पण भव्य आहे प्रचार कार्य आपले नेहमी चालू असते देश विदेशातून आपण प्रचार करत आहात रथयात्रा काढत आहात स्त्रील प्रभुपादांच्या आज्ञेने पदयात्रा चालू केली आता ती पदयात्रा सगळीकडे सतत चालू आहे वृंदावन परिक्रमा मायापुर

परिक्रमा आपण करीत आहात आपल्यामुळे सगळे काही दिव्य आणि भव्य असते भगवंतांच्या कृपेने मला एवढे चांगले गुरु महाराज मिळाले माझे भाग्य चांगले आहे पुन्हा एकदा गुरु महाराज कोटी कोटी दंडवत प्रणाम करते आपण पुढे असेच सगळ्यांना ज्ञान देत राहावे श्रीकृष्ण आपल्याला उदंड आयुष्य देवो म्हणून भगवंताकडे मी प्रार्थना करते

केवल भक्ती देविदासी

सोलापूर

=====================================================

नमः ओम विष्णु पादाय कृष्णप्रेष्ठाय भूतले

श्रीमते लोकनाथ स्वामीन  ईति नामिने

ट परमपूज्य गुरु महाराज तुमच्या सुमधुर वाणीमुळे आम्ही आपणाकडे आकर्षित झालो आपल्या भागवत कथा च्या उपस्थितीमुळे आणि आपल्या कीर्तनामुळे आम्हाला आपल्याकडे आकर्षण निर्माण झाले जेव्हा दीक्षा झाली तेव्हापासून एकही दिवस जपा टॉक चुकवला नाही जपानमध्ये तुमच्या आशीर्वादाची तर आम्ही वाट पाहत असतो जपा टॉक मुळे आमचा जप व्यवस्थित आणि एका जागेवर बसून होऊ लागला

गुरु महाराज जर तुम्ही नसता भेटला तर आम्ही इकडे तिकडे फिरत राहिलो असतो तुमच्यामुळे आम्हाला आध्यात्मिक संघ भेटला अनेक गुरुबंधू भगिनी भेटल्या जपाटापमुळे आम्हाला देश विदेशातील अनेक गुरुबंधू भेटतात

आपला दास

मिथिला नरेश दास

पुणे

==============================================

नमः विष्णु पादाय कृष्ण प्रेष्ठाय भूतले

श्रीमते लोकनाथ स्वामीन ईती नामिने

परमपूज्य गुरु महाराज आपल्या शरीरावर माझा साष्टांग नमस्कार

मी भौतिक जगामध्ये कितपत पडलो होतो परंतु आपला कृपा कटाक्ष हरिनामा मृत मिळाल्यामुळे भगवंतप्राप्तीचा मार्ग मिळाला

आहे त्यामुळे खरोखरच मी भाग्यशाली जीव आहे

झूम मंदिर आमच्यासारख्या जीवांना वरदानच ठरले आहे आपले दर्शन आपला संघ सकाळी मिळतो त्या उत्साहाने दररोजची सकाळ सुरू होते आपले प्रवचन रसभरीत असते सतत तुमची वाणी कानावर पडावे असे वाटते आपण ज्यावेळेस राधा माधव सुंदर ते ध्यान भजन म्हणता त्यावेळी आम्ही आनंदी होतो आपल्यासारखे गुरु आम्हाला मिळाले खरोखर आम्ही धन्य आहोत सुख शांतीचा यावेळी आम्हाला अनुभव होत आहे भगवंता शिवाय सर्व काही शून्य आहे याची प्रचिती होत आहे माझ्यावर असाच कृपा कटाक्ष राहो महाराज आपणास कोटी कोटी प्रणाम

आपला शिष्य

तुकाराम भक्त दास

शिरढोण आरवडे

====================================================

नमः विष्णु पादाय कृष्णप्रेष्ठाय भूतले

श्रीमते लोकनाथ स्वामींन इति नामिने

परम पूज्य लोकनाट स्वामी गुरु महाराजांना माझा साष्टांग दंडवत प्रणाम आज आपल्या ७६व्या वाढदिवस व व्यास पूजन निमित्त हार्दिक शुभेच्छा गुरु महाराज दिव्य आणि तेजपुंज व्यक्तित्व असून त्यांच्या कुठल्याच कार्याची तुलना करणे शक्य नाही गुरु महाराज हे नेहमी प्रफुल्लीत आणि उत्साही असतात त्यांनी कधीही आदर मान सन्मानाची आशा ठेवली नाही खरच गुरू महाराज हे शांत आणि प्रेमळ व्यक्तिमत्व आहेत लोकनाथ महाराजांचे इस्कॉन मधील वाढलेले महात्म्य म महत्व प्रमुख पदाधिकाऱ्यांमध्ये झालेली निवड देश विदेशातून धर्मप्रचार कार्यक्रमातून संपर्कात येणारे सुसज्ज शहरे उच्चभ्रू समाज व वातावरण यांच्याशी आलेल्या संपर्कानंतरही महाराजांचे खेड्यापाड्याबद्दलचा आदर आजही तूसभरही कमी झाला नाही

बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले ही संत तुकाराम महाराजांची शिकवण परमपूज्य लोकनाट स्वामी गुरु महाराजांनी आपल्या जीवनात अमलात आणली त्यांची कृष्ण भक्ती संकीर्तन प्रवचन प्रगाड अभ्यास हे पाहून माझे मंत्र होते श्रीलं प्रभुपाद यांच्याकडून संन्यास गुरूदिक्षा घेतल्यानंतर सातत्याने आज अखेर महाराज गुरुवाणी ही श्रेष्ठ वाणी आणि गुरु संदेश हा परमात्मा प्राप्त करण्याचा संदेश हे मानून भक्ती मार्ग अनुसरून आपले सर्वोत्कृष्ट कार्य करीत आहेत पवित्रता ज्ञानलालसा आणि चिकाटी या त्रिगुणांनी व काया वाचा मनाने महाराज खऱ्या अर्थाने अध्यात्मिक जीवन जगत आहेत भगवंताविषयी त्यांच्या मनात आंतरिक ओढ आहे आपणास

त्यांच्या हृदयात कृष्ण प्रेमाची खरी व्याकुळता निर्माण झालेली दिसून येते त्यांना भगवत सिद्धी प्राप्त झालेली आहे

त्यागी निष्पाप चरित्रशील कृष्णप्रेमी शुद्धचित्त हे सर्वश्रेष्ठ गुण महाराजांच्या ठाई आहेत मी भगवंताकडे प्रार्थना करतो की महाराजांना भरपूर आयुष्य लाभो व प्रभुपादांची सेवा घडो

आपला सेवक

भक्ती विनोद ठाकूर दास

संभाजीनगर

=========================================================

नमः विष्णुपादाय कृष्ण पृष्ठाय भूतले

श्रीमते लोकनाथ स्वामीनितीनामिने

माझ्या गुरु महाराजांना माझा कोटी कोटी दंडवत प्रणाम व त्यांना उदंड आयुष्य लाभो हीच कुंजबिहारी जवळ प्रार्थना

गुरु महाराज त्रिकालज्ञ आहेत त्यांना भूत भविष्यातील सर्व ज्ञान असते एकदा नित्यानंतरयोदशीला महाराज नागपूरला आले तेव्हा मी त्यांना मंदिरात भेटली त्यांना सर्व काही माहीत असतेस त्यांनी मला विचारले तू कोणाजवळ राहते मला त्यांचे आश्चर्य वाटले मी हे अभिनंदन प्रभुंना सांगितले त्यांना पण वेगळेच फील झाले. नंतर काही महिन्यातच मधला पोरगा ज्याच्याजवळ मी रहात होती तो गोदामात गेला तेव्हा मला कळले की महाराजांना हे आधीच कळले होते तस त्याला लिव्हर फॅन क्रिया वगैरेचा त्रास होताच अशा महाराजांची सर्व भक्तांना गरज आहे तसेच महाराजांचे दर्शन रोजच झूम मिटींगला होते

आपली दासी

नयन मंजिरी देविदासी

नागपूर

==========================================================

नमः विष्णुपादाय कृष्ण पृष्ठाय भूतले

श्रीमते लोकनाथास्वामीन इतिनामिने

परमपूज्य लोकनाथ स्वामी महाराज यांच्या चरणी माझा साष्टांग दंडवत प्रणाम ज्यांनी श्रीकृष्णांच्या आणि श्रीलंप्रभदांच्या चरण कमळांचा आश्रय घेतला आहे सर्वप्रथम परमपूज्य गुरु महाराजांना त्यांच्या ७६व्या व्यास पूजेच्या लाख लाख शुभेच्छा श्री श्री राधा

शामसुंदरांच्या चरणी एवढीच प्रार्थना की गुरु महाराजांचे स्वास्थ निरोगी राहू दे

गुरु महाराजांच्या अनंत गुणांना समजण्यास व त्यांचे वर्णन करण्यास मी अपात्र आहे तरीही माझ्या मंदबुद्धीने थोडासा प्रयत्न करीत आहे गुरु महाराज करणेचा सागर आहेत ते शांत प्रेमळ दयेची मूर्ती आहेत पात्र पात्र न बघता त्यांनी माझ्यासारख्या बुद्ध जीवावर कृपा केली आहे त्यांनी मला त्यांच्या चरणांचा आश्रय देऊन माझे जीवन धन्य केले आहे यावरूनच गुरू महाराज किती कृपाळू आहेत हे लक्षात येते माझ्यासारख्या अनेक बद्ध जीवांवर कृपा करण्यास ते सदैव तत्पर असतात गुरु महाराजांची गुरुभक्ती अगाध आहे श्रीलंप्रभुपादांच्या आदेशानुसार बैलगाडीतून पदयात्रा त्यांनी सुरू केली आता ही पदयात्रा अनेक देशांमध्ये परदेशांमध्ये खेड्यामध्ये जाऊन पोहोचली आहे आणि चैतन्य महाप्रभूंची वाणी खरी करत आहे त्यांचे श्रेय फक्त गुरु महाराजांनाच आहे

गुरु महाराजांना किर्तन सम्राट म्हणून जेव्हा संबोधले जाते तेव्हा मला खूप आनंद होतो गुरु महाराज जेव्हा कीर्तन करतात तेव्हा मनाला मंत्रमुग्ध करून टाकतात

गुरु महाराजांचे श्रीलंप्रभुपाद व इस्कॉन प्रतीची निष्ठा आणि समर्पण अद्भुत आहे काया वाचा आणि मनाने खऱ्या अर्थाने महाराज अध्यात्मिक जीवन जगत आहेत या वयातही गुरु महाराजांची सेवा कार्य सुरूच आहेत नवनवीन मंदिरे भागवत कथा हरिनाम संकीर्तन इत्यादी द्वारा

जशी गाय नेहमी आपल्या वासराचे हितचिंतते तसे गुरु महाराज आपल्या शिष्यांची काळजी घेतात व हितचिंतन करतात जपाटाक्ष माध्यमातून गुरू महाराज आमच्या कडून साधनाही करून घेतात गुरु महाराजांचा प्रसन्नचित्त चेहरा त्यांचा आनंद व उत्साह पाहून मनाला प्रेरणा मिळते गुरु महाराजांचे जीवन चरित्र हे सूर्याप्रमाणे तेजस्वी आहे ते माझ्यासारख्या बुद्ध जिवांना आध्यात्मिक प्रकाश देणारे आहे त्यांचे चरित्र वंदनीय स्मरणीय शुद्ध व पवित्र करणाऱ्या आहे गुरु महाराजांची महानता व्यक्त करायला मी असमर्थ आहे तरीही माझे हृदय आनंदाने भरून गेलेले आहे की मला शब्दांजली लिहिण्याची संधी मिळाली

गुरुने दिला मला ज्ञानरूपी वसा

आम्ही चालवू हा पुढे वारसा

मी गुरु महाराजांच्या चरणी प्रीतीपूर्वक वंदना करते व नम्र प्रार्थना करते की माझ्यासारख्या अज्ञानी व अंधकारात पडलेल्या जीवांवर कृपेचा वर्षाव करावा व माझे जीवन कृष्ण भावना भावित व्हावे असा कृपा आशीर्वाद द्यावा श्री श्री राधा श्यामसुंदरांच्या चरणी एवढीच प्रार्थना करते की त्यांचे स्वास्थ्य निरोगी राहू दे व त्यांना अखंड आयुष्य लाभू दे

जे का रंजले गांजले त्यासी म्हणे जो आपुले तोचि साधू ओळखावा देव तेथेची जाणावा

परमपूज्य लोकनाथ स्वामी महाराज की जय

महाराणी रुक्मिणी देवीदासी

इचलकरंजी

=========================================

परमपूज्य लोकनाथ स्वामी महाराज यांच्या चरण कमली कोटी कोटी दंडवत प्रणाम

ओम अज्ञान तीमिरानधस्य ज्ञानांजन शलाकया चक्षुरून्मिलितं येन तस्मै श्री गुरवे नमः

गुरु महाराज आपण आपल्या अलिबागच्या भक्तांना व साधकांना नगर कीर्तनाची सेवा 2023 रोजी दिली होती त्याप्रमाणे आपल्या कृपेने ती सेवा अखंडपणे चालू आहे त्यामध्ये मिठाई गौर दिंडी प्रसाद वितरण ग्रंथ वितरण प्रवचन सेवा चालू आहे

महाराज आपल्या कृपेनेच भक्ती शास्त्री कोर्स यशस्वीरित्या पूर्ण केल्याने ब्राह्मण दीक्षा देऊन मला उपकृत केलेत आपले रोज जपान टाक द्वारे दर्शन प्राप्त झाल्याने माझी साधना प्रचार पुस्तक वितरण संकीर्तनात खूपच प्रगती झालेली आहे

आपला दासानुदास

रामप्रसाद दास

अलिबाग

======================================================

माझे प्रिय गुरु महाराज

तुम्ही खूप खूप दयाळू कृपाळू आहात तुम्ही माझ्या सारख्या जीवात्म्यावर कृपा केली म्हणून मी भक्तीमध्ये टिकून राहिले तुमचं कीर्तन ऐकताना जणू काही वैकुंठात असल्यासारखं वाटतं तुमचं कीर्तन तुमचं प्रवचन खूपच प्रेरणा देणारं असतं

तुम्ही लहानपणापासूनच कृपाळू आहात प्राण्यांवर तुम्ही दया करता लहानपणी कोंबडीच्या पिल्लावर दया दाखवली तशी तुम्ही तुमच्या शिष्यावर दया दाखवता स्त्रील प्रभोपदांनी तुम्हाला तुकाराम महाराज म्हणून संबोधन दिले ते खरंच आहे प्रभदांच्या जीवनात जे काही घडलं त्याप्रमाणे तुम्ही पण खूप प्रयत्न केलेत मी तुमच्या मुखातून ऐकले त्यातील एक प्रसंग आठवतोय की जेव्हा जुहू मधील हरे कृष्ण लँड ची स्थापना चालू होती तुम्ही घरोघरी जायचे आणि कोणी लोक काही द्यायचे तर काही दरवाजा बंद करायचे कोणी कुत्र पाठीमागे सोडून द्यायचे आम्हाला तसं काही प्रयत्न करायचे नाहीत सगळं काही बनवून ठेवलेला आहे श्रीलंप्रोपदांनी आणि तुम्ही





तरीही आम्ही बद्ध जीव भौतिक संसारात अडकतो मी जेव्हा भक्ती सुरू केली तेव्हा मला झोप मंदिर जपाटाकमुळे रोजच सकाळी मनाचा शुद्धीकरण होतं आपली वाणी ऐकायला मिळते असं वाटतं की बस हे क्षण संपू नये पण जपा टाक नंतर जेव्हा भौतिक कार्य करताना तुमचं कीर्तन ऐकते कार्य पटकन आणि सुखमय होतात कधी कधी काही संकट आले की प्रवचन ऐकून त्यातून निघायचा मार्ग सापडतो तुमची कृपा अशीच ठेवा मला आपली शिष्य म्हणून स्वीकार करा हेच आपल्या चरणी प्रार्थना

आपली कृपाभिलाशी

भक्तिन रेखा यादव

आरवडे

=====================================================

श्री परमपूज्य वंदनीय लोकनाथ स्वामी महाराज यांना साष्टांग दंडवत प्रणाम

मी सामान्य माणूस आपल्यासारख्या वरिष्ठ खूप मोठ्या जागतिक दर्जाच्या स्वामीं बद्दल काय लिहिणार ते समजत नाही तरी थोडक्यात म्हणजे आपले नियोजन कामाची पद्धत तसेच या वयात करीत असलेली भगवंतांची सेवा ही खूप मोठी गोष्ट आहे तसेच आपण सध्या पंढरपूर धाम येथे निर्माण करीत असलेल्या मंदिराबद्दल तर काय बोलावे कारण आपण खूप मोठे कार्य सेवा हाती घेतली आहे ही सेवा आपल्या हातून भगवंत पार पाडो ही श्री पांडुरंगाच्या चरणी प्रार्थना तसेच आपले कीर्तन भागवत कथा आपला मंजुळ गोड आवाज तसेच भागवत कथा समजून सांगण्याची पद्धत हे मनाला खूप भावते व आमच्या ज्ञानात सेवेत भर घालते

संबंध ज्ञानदास

पुणे

===============================================

श्रीलंप्रभुपादकीय

परमपूज्य लोकनाथ स्वामी महाराज की जय

परमपूज्य गुरु महाराजांना साष्टांग दंडवत प्रणाम

# मराठी

नमः विष्णू पादाय कृष्णप्रेष्ठाय भूतले

श्रीमते लोकनाट्य स्वामी इति नामिने

साधूंची लक्षणे अशी आहेत की ती सहनशील दयाळू आणि सर्व जीवांची मैत्रीपूर्ण असतो त्याला कोणताही शत्रू नसतो तो शांत असतो तो शास्त्रांचे पालन करतो आणि त्यांचे सर्व गुण उदात्त असतात

मुकं करोति वाचालम पंगुं लंघयते गिरीम

यथ कृपा तमहं वंदे परमानंद माधवम

मी माझ्या आध्यात्मिक गुरूला पतीत आत्म्यांना वाचवणाऱ्या गुरूंना आदरपूर्वक वंदन करतो त्यांची दया मुख्यांना वक्त्यांमध्ये बदलते आणि लंगड्यांना पर्वत ओलांडण्यास सक्षम करते

ध्यानम मूलं गुरुमूर्ती पूजा मुलं गुरूर पदम

मंत्रमुलम गुरुर्वाक्यम मोक्ष मुलम गुरुकृपा

गुरूंचे स्वरूप ध्यान करण्यासाठी सर्वोत्तम आहे गुरूंचे चरण पूजेसाठी सर्वोत्तम आहेत गुरूंचे वचन हा मंत्र आहे गुरूंची कृपा ही मुक्तीचे मूळ आहे

प्रिय गुरु महाराज कृपया माझे नम्र प्रणाम स्वीकार करावेत मी अज्ञानी आहे मी गुरु महाराजांबद्दल काय लिहिणार तरीही दोन शब्द लिहिते तुमच्या व्यास पूजेच्या निमित्ताने माझ्यासारख्या पतित व्यक्तीला तुमच्याबद्दल लिहिण्याचा योग आला आमच्यासारख्या पती त्यांचा उद्धार करण्यासाठी तुमच्यासारखे गुरु मला लाभले याचे मी भाग्य समजते

आपली शिष्या

=================================================

आदरणीय गुरुदेव मी तुम्हाला माझा दंडवत प्रणाम अर्पण करीत आहे तुम्हाला 76 व्या वाढदिवसाच्या शुभेच्छा देते व तुम्हाला दीर्घ आयुष्याची इच्छा व्यक्त करते तुमचे गुणगौरव करणे म्हणजे लहान तोंडी मोठा घास घेणे आहे तुमचे जपा टॉक अविरतपणे खंड न पडता तुम्ही चालूच ठेवले आहे तुमचे सुश्राव्य किर्तन मनाला प्रसन्न करते खरंच या वयात तुमचा उत्साह आहे तो तरुणांना सुद्धा लाजवेल असा आहे तुम्ही चालू केलेली पदयात्रा अखंडितपणे शिष्यानमार्फत चालू आहे याचे खरच कौतुक आहे गावागावात कृष्णभक्तीचा प्रचार व प्रसार महाराज तुमच्यामुळेच अविरतपणे चालू आहे याचा मला खूप अभिमान वाटतो श्रीलंप्रोपाद ु महाराज

यांची अधिक कृपा प्राप्त करण्यासाठी मी माझी जप साधना एकाग्रतेने करण्याचा प्रयत्न करते जेव्हा वेळ मिळेल तेव्हा मंदिरात व सत्संगाला जाते त्यामुळे मन खूप प्रसन्न होते

गुरु महाराज तुमचा कृपा आशीर्वाद माझ्यावर अखंड असावा माझी भक्ती मध्ये अधिकाधिक प्रगती व्हावी मी एक चांगली भक्त बनू दे हेच श्रीलंप्रभुपाद व तुमच्या चरणी प्रार्थना करते

आपली कृपाभिलाशी

भक्तिन हेमांगी प्रकाश अंतुले

ठाणे

=====================================================

ओम अज्ञान तिमिरांधःस्य ज्ञानांजन शलाकया

चक्षु उन्मिलीतम येन तस्मै श्री गुरवे नमः

गुरु महाराज तुमच्या चरणी दंडवत प्रणाम सर्वप्रथम आपल्याला 76 व्या व्यासपूजा निमित्त हार्दिक शुभेच्छा

महाराज आपण माझ्या जीवनातील एक अविभाज्य भाग आहात आपल्या मार्गदर्शनाने आणि शिकवणीने माझ्या जीवनाला एक नवी दिशा मिळाली आपण फक्त एक शिक्षक नाही तर आम्हा सर्वांसाठी मार्गदर्शक आणि आध्यात्मिक प्रेरणास्थान आहात

आपण नेहमीच आपल्या शिष्यांना प्रोत्साहन देता आणि त्यांच्यात आत्मविश्वास जागवता आपल्या शिकवणीमुळे माझ्या विचारांना नवीन ऊर्जा मिळाली

आहे आपल्याकडून शिकून मी नेहमीच अधिक चांगली सेवा करण्याचा प्रयत्न करेल तुमच्याकडून मला ज्ञान शिस्त आणि आध्यात्मिक सदाचार जगण्याची कला शिकायला मिळत आहे मी नेहमीच तुमच्याकडून खूप काही शिकत असतो काय योग्य आहे हे सांगण्यापेक्षा तुम्ही काय योग्य नाही हे नेहमीच सांगत आलात बहुतेक जीवनातल्या किंवा शाळेतल्या परीक्षेत पास होणं फार काही कठीण नाही खरी परीक्षा तर आयुष्याची असते जिथे खूप काही शिकायला मिळतं चांगलं आणि वाईट सुद्धा आयुष्याच्या परीक्षेत खूप काही शिकायला मिळतं त्यामुळे जगण्याची दिशा कळते आणि अशी दिशा आपलं जगणं सार्थकी लावते अशा या आपल्या प्रेरणा खूपच मोलाच्या ठरतात आपण आम्हा सर्व भक्तांवर केलेल्या कृपेचा वर्षाव आणि प्रभु पदांच्या कार्यात दिलेला जीवन समर्पणाबद्दल मी मनापासून आभार मानतो हे ऋण मी कधीच विसरू शकणार नाही पुन्हा एकदा तुम्हाला व्यास पूजेच्या हार्दिक शुभेच्छा धन्यवाद गुरु महाराज

आपला शिष्य

रसराज गोपालदास

आरवडे

===============================================

ओम अज्ञान तीमरानधस्य ज्ञानांजनशला गया चक्षुरूंन्मिलितं येन तस्मै श्री गुरवे नमः

परमपूज्य श्रीकृष्ण कृपा मूर्ती आदरणीय गुरुदेव श्री लोकनाथ स्वामी महाराज आपल्या चरणी कोटी कोटी दंडवत प्रणाम

आज मी स्वतःला खूप भाग्यवान समजते कारण मला गुरु चरण लाभले आणि प्रभुपाद श्री राधाकृष्ण यांची माझ्यावर कृपा झाली आणि म्हणून आपल्या सारखे गुरु मला मिळाले

ज्याप्रमाणे राजा भगीरथाने त्यांच्या पितरांना पापातून मुक्त करून मोक्षप्राप्ती मिळवून देण्यासाठी गंगा नदीला पृथ्वीवर आणले त्याप्रमाणे मी व माझ्या सर्व कुटुंबाला या 84 लक्ष घेऊन इथून भौतिक सुख दुःखातून मुक्त करण्यासाठी हरिनामाचा वारसा देव केला या कलियुगामध्ये लोक विविध चिंतांनी विचलित असल्यामुळे अध्यात्मिक साक्षात्काराचे उत्तम साधन म्हणजे हरिनामाचे कीर्तन होय

हरेर्नाम हरेर्नाम हरेर्नामैव केवलम

कलौनास्तैव नास्तैव गतिर अन्यथा

या हरिनामाशिवाय जीवाला अन्य कोणतीही गती नाही भौतिक सुखदुःखात मायामोहात अडकलेल्या जीवाला ज्याप्रमाणे परिसर स्पर्शातून लोखंडाचे सोने होते त्याप्रमाणे आपले चरण लाभल्यामुळे माझे व माझ्यासारख्या लाखो लोकांचे जीवन आपण सुवर्णमय बनवले

माझ्या मनातील भावना मला शब्दात व्यक्त करता येत नाहीत लिहायचे म्हटले तरी आकाशाचा कागद आणि समुद्राची शाही केली तरी ती अपुरीच पडेल

स्त्रील गुरुदेव आपल्या व्यास पूजेनिमित्त पुन्हा एकदा आपणास खूप खूप शुभेच्छा व्यक्त करून भगवंतांच्या चरणी प्रार्थना करते की आपणास आरोग्यमय व दीर्घायुष्य लाभो

आपली कृपाभिलाशी

चिंतामणी देविदासी

कोरेगाव





=============================================

ओम अज्ञान तीमिरांधस्य ज्ञानांजन शलाकया

चक्षुर उनमिलीतम येन तस्मै श्री गुरवे नमः

नमः विष्णु पादाय कृष्ण पृष्ठाय भूतले

श्रीमते लोकनाथ स्वामीन ईति नामिने

पूज्य गुरु महाराजांना त्यांच्या 76 व्या वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा गुरु महाराजांची मी आभारी आहे की गुरु महाराजांनी आमचा इचलकरंजीत भगवंता भगवंता राधा श्याम सुंदरचिंना आणले आणि त्यांच्या कृपेने एक मोठे भव्य दिव्य मंदिर होत आहे

गुरु महाराजांच्या कृपेमुळे आसपास खेडेगावातील लोक आपल्या हरेकृष्ण आंदोलनाला जोडले जात आहेत प्रचार होत आहे आणि आम्हाला पण सेवा करायला मिळत आहे आमच्या दिवसाची सुरुवात झूम मंदिराने होते आणि दिवस खूप छान जातो मी इतकी बद्ध होते की तुम्ही मला शरण दिला आणि राधा शामसुंदराच्या चरणी सेवेत लावले माझी एवढीच प्रार्थना आहे की गुरु महाराजांची चांगले आरोग्य राहो गुरु महाराज आपण दयेचे सागर आहात तुमचे कार्य खूप दिव्य आणि भव्य आहे

गुरु महाराजांच्या चरणी एवढीच प्रार्थना आहे की लवकरात लवकर मोठे मंदिर हो आणि राधा श्याम सुंदर त्या मंदिरात विराजमान होऊ देत माझी आध्यात्मिक प्रगती होऊ देत मी  प्रभुपादांच्या आंदोलनात दासानुदास या भावनाने सेवा करू देत

पुन्हा एकदा गुरु महाराज आपणाला ७६व्या व्यास पूजेची हार्दिक शुभेच्छा

कालिंदी किशोरी देविदासी

इचलकरंजी

================================================

नमः विष्णु पदाय कृष्ण पृष्ठाय भूतले

श्रीमती लोकनाथ स्वामीन ईति नामिने

गुरु महाराज आपल्या चरण कमळी दंडवत प्रणाम गुरु महाराज आपण खूप गायब आहात आम्हासारख्या सामान्य भक्तालाही भक्तीचा मार्ग दाखवला आणि भगवंतापर्यंत कसे पोहोचावे हे सहज सोप्या भाषेत रोज सकाळी जपाच्या माध्यमातून मार्गदर्शन

करता आमचे रोज चे जीवन सुंदर बनवण्यासाठी आपण प्रयत्न करत असता कितीही मोठ्या प्रवासात असले तरी आमच्यासाठी वेळ काढतात खूप खूप धन्यवाद गुरु महाराज

गुरु महाराज तुमच्या आज्ञेने तुमच्या कृपेमुळे मी युवतींना प्रचार करत आहे सोबत महिन्यातून एकदा चेतना फेस्टिवल होत आहे रोज भगवद्गीता आणि प्रभदांच्या पुस्तकांचे अध्ययन होत आहे सकाळी तुमच्याबरोबर जग आणि जपाटासाठी पण मुलींना एकत्र करण्याचा पूर्णपणे प्रयत्न आहे

गुरु महाराज दोन वेळा वैष्णवी पदयात्रा झाली आपण आता एप्रिलमध्ये नागपूरला आले होते तेव्हा आपण आज्ञा दिली आहे की तीन महिन्यातून पदयात्रा सुरू करावी निश्चित गुरु महाराज तुमच्या आज्ञेचे पालन होईल गुरु महाराज माझी काही पात्रता नाही परंतु तुमची कृपा दृष्टी माझ्यावर सदैव असू द्या तुमच्या आशीर्वादाने आता मला असे वाटू लागले आहे की प्रचार करणं सोपं आहे माझ्या मध्ये एक आत्मविश्वास जागृत झाला आहे गुरु महाराज माझी बुद्धी फार जड असल्याकारणाने काय लिहावे हे कळत नाही परंतु तुमच्या चरणी एवढीच प्रार्थना आहे की तुमच्या कृपा सदैव माझ्यावर असू द्या मी कृष्णभावनामृताचा घेतलेला वसा यामध्ये खंड पडू नये श्रीलं प्रभुपादांच्या या संकीर्तन आंदोलनात माझं जीवन सत्कारणी लागावे हीच इच्छा आहे

आपली दासी

आदिशक्ती देविदासी

नागपूर

==================================================

नमः विष्णु पादाय कृष्ण पृष्ठाय भूतले. श्रीमते लोकनाथ स्वामींन इति नामिने

हरे कृष्ण गुरु महाराज दंडवत प्रणाम सर्वप्रथम आपणास 76 व्या व्यास पूजन निमित्त हार्दिक शुभेच्छा श्री श्री राधा गोपाल आणि राधा पंढरीनाथ आपणास चांगले आरोग्य प्रदान करोत हीच प्रार्थना

गुरु महाराज आपले अनेक गुण आहेत माझ्यासारखी शूद्र जीव काय वर्णन करणार आपली हरिनामा प्रति व गुरून प्रति श्रद्धा हे गुण मला आवडतात आपल्या संन्यास दीक्षाला पन्नास वर्षे पूर्ण होत आहेत आपण प्रभुपादांच्या आज्ञेचे पूर्ण निष्ठेने पालन करत आहात याच्यावरून आपली प्रभुपादांच्या प्रती शरणागती दिसून येते आपले हरिनाम विषयीचे प्रेम आपल्या कीर्तनातून दिसून येते आपले कीर्तन आमच्या हृदयापर्यंत पोहोचते आपले कीर्तन ऐकता क्षणी आम्ही भगवद घामातच आहोत असे वाटते

आमच्या मनातील प्रश्नांची उत्तरे आपल्या प्रवचनातून मिळतात एकदा आम्ही भगवंतांना नाम रूप गुण लिहिला यांच्या विषयी ज्ञान मिळावे अशी प्रार्थना केली तर मला इचलकरंजीच्या भागवत कथेमध्ये आपले श्रीकृष्ण स्वरूपचिंतन पुस्तक मिळाले त्यामध्ये आपण भगवंतांच्या नामरूप गुणांचे वर्णन केले आहेत गेल्या आठवड्यात माझा जप ध्यानपूर्वक होत नव्हता तुम्ही झूम वरील प्रवचनात जप कसा करावा हे सांगितले माझ्या ऑफिस मधील मुलगी मला बायबल विषयी सांगते ती देव आहे पण देवाला आकार नाही असे म्हणते तिच्या चर्चा मी ऐकत होते पण जेव्हा तुमचे प्रवचन ऐकत होते त्या प्रवचनांमध्ये आपण सांगत होतात जे लोक भगवंतांना आकार नाही असे म्हणतात त्यांच्याशी चर्चा करू नये मायावादी कृष्णा पराधी तेव्हापासून अशा माया मादी चर्चा ऐकणे बंद केले प्रत्येक वेळी गुरु ही साधारण व्यक्ति नाहीत याचा अनुभव येतो

गुरु महाराज आपणास चांगले निरोगी आरोग्य लाभो हीच भगवंतांच्या चरणी प्रार्थना आहे गुरु महाराज जसे आपण प्रभुपादनच्या प्रती शरणागत आहात आणि त्यांच्या आज्ञाचे पालन करत आहात त्याचप्रमाणे मी पण तुमच्या प्रती शरणागत होऊन आयुष्यभर तुमच्या आज्ञेचे पालन करण्यासाठी आशीर्वाद द्या तुमच्यासारखे आम्हाला पण हरिनामा विषयी भगवंतांच्या नाम रूप गुण लिला याबद्दल प्रेम वाटावे असा आशीर्वाद द्या

तुम्ही माझा आपली शिष्य म्हणून स्वीकार केला याबद्दल आपल्याला खूप खूप धन्यवाद पुन्हा एकदा आपणास व्यास पूजन निमित्त हार्दिक शुभेच्छा

आपली दासी

सुधा निधी देविदासी

मिरज

=====================================================

नमः विष्णुपादाय कृष्णप्रिष्ठाय भूतले

श्रीमते लोकनाथ स्वामीनितीनामिने

गुरु महाराज आपल्या चरणी कोटी कोटी दंडवत प्रणाम आपणास 76 व्या व्यास पूजेनिमित्त खूप खूप शुभेच्छा गुरु महाराज तशी मी आजपर्यंत तुम्हाला प्रत्यक्षात कधीही भेटली नाही परंतु ती इच्छा लवकरच पूर्ण होईल ही आशा आहे

अध्यात्मिक जीवनात गुरूंना अनन्यसाधारण महत्त्व आहे आणि मीही अशाच एका गुरूंच्या शोधात आहे मी अजून तुम्हाला फारशी

ओळखत नाही परंतु नुकताच मी सकाळी जपा सेशन आणि जपाटाक जॉईन करत आहे तेव्हापासून हळूहळू मला तुमच्याप्रती गोडी वाढत आहे माझी फक्त एवढीच इच्छा आहे की माझ्यासारख्या तुच्छ मनुष्य जीवावर कृपा करा आणि मला आशीर्वाद रुपी कृष्ण भक्ती द्या

मी असं ऐकलं आहे की शिष्याची सगळी दुःखे गुरु आपल्यावर घेत असतो तर तुम्हाला किती कष्ट होत असेल तरी तुम्ही कायम सर्वांवर आपली दया दाखवत आहात

म्हणून मी आज फक्त तुम्ही कायम स्वस्थ आरोग्य संपन्न आणि आनंदी राहा अशी प्रार्थना करते

आपली चरणदासी

भक्तिन भाग्यश्री साळुंखे

सोलापूर

==================================================

नमः विष्णुपादाय कृष्ण प्रेष्ठाय भूतले

श्रीमते लोकनाथ स्वामीन ईति नामिने

परमपूज्य लोकनाट स्वामी गुरु महाराज यांना माझा साष्टांग दंडवत प्रणाम आज तुमच्या 76 व्या चा व व्यासपूजा निमित्त हार्दिक शुभेच्छा

आरवडे गावी रघुनाथ जन्मले भविष्यात लोकनाथ झाले चरित्र यांचे पहा जरा शिकवण आपण त्यातून घ्यावी. हाच सापडे बोध खरा

दृढनिश्चयी महाराज सतत नामस्मरणात तल्ली नसतात वैदिक संस्कृतीचा गाढा अभ्यासक ज्याचे ध्येय हरिनाम संकीर्तन जगाच्या घराघरात पोहोचवणे ही त्यांची तळमळ महाराजांचा आवाज सुमधुर असून हरे कृष्ण कीर्तन व नृत्यता संतास करून थकत नाहीत कीर्तन प्रवचनात महाराज विश्वविख्यात आहेत महाराज भगवंतांच्या चरण कमलावर मन स्थिर करून भागवत लिहिलेची चर्चा भगवंतांना वाहिलेली फुले व तुळशी सुगंध घेतात

सध्या सुरू असणारी मानव जगाची भौतिक प्रगती यात लोक पावत चाललेली ग्रामीण संस्कृती सुरू असणारे मानव जातीचे अदबदन आदर्श जिव्हाळा सहजीवन यांचा झालेला ऱ्हास हे पाहून महाराज तुम्ही दुःखी होतात तुमचे कीर्तन अभंग प्रवचन सर्वांना

समजेल अशा भाषेमध्ये असते तुम्ही एवढे कृपाळू आहात की अनपड व्यक्तीला सुद्धा शिष्यत्व दिले तुमच्यासारखे गुरु लाभल्यामुळे माझे मानवी जीवन सार्थक झाले अशाच प्रकारची माझ्यावर कृपा असू द्या जेणेकरून मी भक्तीमध्ये प्रगती करू शकेल

आपली सेविका

सुभद्रा सखी देविदासी

संभाजीनगर

==================================================

हरे कृष्ण गुरू महाराज दंडवत प्रणाम

आपल्यामध्ये अनेक गुणवैशिष्ट्य आहेत आणि वेळोवेळी ती अधोरेखित होतात जसे की करुणा निरागसता साधेपणा कृतज्ञता नम्रता सेवाभाव प्रेम आणि गुरून प्रति असलेली आढळ श्रद्धा व परंपराचे भावना अशा अनेक गुणांनी आपण आम्हा साधकांना प्रेरित करत असतात तसेच कृष्ण भक्ती आणि कृष्णप्रेम साधकांमध्ये वाटण्याची आपली इच्छाशक्ती आम्हाला सतत बळ देण्याचे कार्य करते

महाराज आपण खरोखर जपा सेशन्स व जपान टाक द्वारे हरिनामाचे जागतिक प्रतिनिधी झालेला आहात संपूर्ण विश्वातील साधकांसाठी ज्यामुळे हजारो भक्त रोज ब्रह्म मुहूर्तावर आपले दर्शन व तत्वज्ञान याचे लाभ घेतात अशा प्रकारे या उपक्रमामुळे आपला संघ जसा प्राप्त होतो तसाच बघता भक्तांमध्ये देखील संघप्राप्तीचा लाभ आम्हाला होतो अशा प्रकारे गुरु महाराज जे बोलता आणि जे करता ते फक्त कृष्ण भगवंतांना आणि आपल्या प्रिय गुरूंना प्रसन्न करण्याचा हेतूनेच करतात

शेवटी आपल्या ७६व्या व्यास पूजे विषयी पुन्हा आपणास दीर्घायुष्य आणि आरोग्य लाभो अशी परमेश्वराच्या चरणी प्रार्थना करतो तसेच आपल्या हातून संकीर्तन चळवळीचा वसलेले प्रभुपादांच्या शिकवणीचा प्रसार आणि प्रचार होऊ अशी प्रार्थना करतो

आपला सेवक

रसिक शिरोमणी दास

अंतरंग पार्षदा देविदासी

ठाणे

===============================================

ZIP FILE 3

ओम अज्ञान तिमिरांधस्य ज्ञानांजन शलाकया चक्षुरुन्मिलितं येन तस्मै श्री गुरवे नमः

गुरु महाराजांना माझा कोटी कोटी दंडवत प्रणाम गुरु महाराजांना व्यास पूजेच्या खूप खूप शुभेच्छा महाराजांचे स्वास्थ्य नेहमी ठीक राहावे व त्यांना दीर्घायुष्य लावावे हीच राधा गोपालांच्या चरणी प्रार्थना महाराज खूप दारू आहेत सर्वांवर कृपेचा वर्षाव करतात ते कीर्तन सम्राट म्हणून प्रसिद्ध आहेत त्यांचे सुमधुर किर्तन वाणी मनाला खूप भावते म्हणून त्यांना तुकाराम महाराज असे संबोधले जाते

गुरु महाराजांच्या बरोबरचा माझा एक अनुभव सांगू इच्छिते पंढरपूर गावांमध्ये गेलो असताना योगायोगाने महाराजांच्या निवासस्थानी जाण्याचा योग आला त्यावेळी महाराजांनी माझ्यासाठी वेळ दिला व माझ्या पाठीवर थाप मारून कृपाशीर्वाद दिला हा क्षण मी कधीही विसरू शकणार नाही तसेच महाराजांनी सांगली इस्कॉन यांना भेटण्यासाठी वेळ दिला होता आम्ही सर्व सांगलीचे भक्त तिथे गेलो असता महाराजांनी आपला महत्त्वाचा वेळ सोडून आम्हा सांगली भक्तांसाठी वेळ दिला ते म्हणाले सांगली आमची सांगली तसेच त्यांनी आरवडे मंदिर मदर टेम्पल चा बच्चा सांगली आहे असे म्हटले हे ऐकून खूप छान वाटले महाराजांची अशीच कृपा आम्हावर राहो हीच प्रार्थना

निकुंज बिहारी श्यामदास

सांगली

====================================================

ओम अज्ञान तिमिरानधस्य ज्ञानांजनशलाकया

चक्षुरुमिलितं येन तस्मै श्री गुरवे नमः

माझ्या गुरु महाराजांना 76 व्या वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा माझे आराध्य परमपूज्य लोकनाथ स्वामी महाराजांच्या चरणी प्रणाम करून माझ्या गुरूंच्या विषयी दोन शब्द लिहिण्याचा प्रयत्न करतो

वैष्णोतत्त्वज्ञानानुसार भक्त हा स्वतः नारायण होऊन नव्हे तर नारायण यांचा निकटस्थ दास होऊन साक्षात नारायणा समानात होतो असे महान भक्त जनसामान्याच्या कल्याणार्थ आध्यात्मिक गुरु म्हणून कार्य करत असतात यास्तव नारायणांच्या महिन्याचा

सर्वत्र प्रचार करणाऱ्या आध्यात्मिक गुरूंना म्हणजेच परमपूज्य लोकांना स्वामी महाराजांना नारायण मानून नारायणा समानच त्यांची सर्व प्रकारे आदर युक्त सेवा केली पाहिजे गुरु महाराज आपल्यासाठी साक्षात भगवंत दर्शन घडवून देत आहेत भगवंतांचे ठिकाण म्हणजे वृंदावन धाम आहे ते वृंदावन धाम अनेक ठिकाणी स्थापन करण्याचे कार्य माझे गुरु महाराज करत आहेत

माझे गुरु महाराज फार फार दयाळू आहेत प्रत्येक जीवा प्रति त्यांचे प्रेम आहे म्हणून प्रत्येक जीवावर कृपा करीत आहेत मलाही माझ्या जीवनात ग्रेट गुरु परमपूज्य लोकांना स्वामी महाराज भेटले म्हणून मी हा भाऊ सागर पार करीत आहे भाऊसागर पार करण्यासाठी जी नका आहे ती म्हणजे आंतरराष्ट्रीय कृष्ण भावना मृत संघ आणि ती नौकाचालक म्हणजे माझे गुरु परमपूज्य लोकनाथ स्वामी महाराज पुन्हा एकदा गुरु महाराजांना वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा

पंढरीनाथ कृष्णदास

इचलकरंजी

====================================================

ओम अज्ञान तीमिरानधस्य ज्ञानांजन शलाकया

चक्षुरूं उन्मिलितं येन तस्मै श्री गुरवे नमः

परमपूज्य लोकनाथ स्वामी गुरु महाराजांच्या चरणी कोटी कोटी दंडवत प्रणाम 76 व्या व्यास पूजा दिनानिमित्त मनातील गुरून प्रति भावना व्यक्त करते

गुरु महाराज आपल्या दररोजच्या दर्शनाने माझे नाम जप व साधना नित्यनियमाने सुरू होते एकही दिवस असे होत नाही की आपल्या जपा टॉक मध्ये मी राहत नाही कारण मला आपल्या दर्शनाने उत्साह आणि आनंद मिळतो आपल्या मुखाने जेव्हा भगवंतांचे गुणगान ऐकते तेव्हा तर जणू मला धाम प्राप्त झाल्याचा आनंद होतो

गुरु महाराज आपल्या सुंदर अशा भजनांचा व कीर्तनाचा आस्वाद घेताना माझे हृदय व कान तृप्तच होत नाहीत त्यासाठी आपला सतत संघ साधसंघ हवाहवासा वाटतो आपल्या दर्शनाने नयन तृप्त होत नाहीत नित्य नवासा आनंद प्राप्त होतो अशीच आमच्यावर आपली सदैव आशीर्वाद व कृपादृष्टी असावी हीच चैतन्य महाप्रभूंकडे प्रार्थना करते

आपली आज्ञाकारक शिष्या

राधा ठाकूराणी देविदासी

सोलापूर





==========================================

गुरु महाराज आपल्या चरण कमळी दंडवत प्रणाम गुरु महाराज आपण खूप खूप जाड आहात आम्हासारख्या सामान्य भक्तालाही भक्तीचा मार्ग दाखवून भगवंतापर्यंत कसे पोहोचावे हे सहज सोप्या भाषेत रोज सकाळी झूम मंदिराच्या माध्यमातून मार्गदर्शन करतात आमचे रोजचे जीवन सुकर बनवण्यासाठी आपण प्रयत्न करत असतात कितीही मोठ्या प्रवासात असले तरी आमच्यासाठी वेळ काढता खूप खूप धन्यवाद गुरु महाराज

गुरु महाराज तुमच्या आज्ञेने तुमच्या कृपेमुळे मी युवतींना प्रचार करत आहे सोबत महिन्यातून एकदा चेतना फेस्टिवल होत आहे रोज भगवद्गीता आणि प्रभोपदांच्या पुस्तकाचे अध्ययन होत आहे सकाळी तुमच्या सोबत जपान आणि जपान साठी पण जॉईन करण्याचा मुलींचा पूर्णपणे प्रयत्न आहे

गुरु महाराज दोन वेळा वैष्णवी पदयात्रा झाले आपण आता एप्रिलमध्ये नागपूरला आले होते तेव्हा आपण आज्ञा दिली आहे की तीन महिन्यातून एकदा पदयात्रा सुरू करावी गुरु महाराज माझी काही पात्रता नाही परंतु तुम्ही कृपादृष्टी माझ्यावर सदैव असू द्या तुमच्या आशीर्वादाने हे सर्व घडत आहे

आपली दासानुदासी

आदिशक्ती देविदासी

नागपूर

====================================================

नमः ओम विष्णु पदाय कृष्ण पृष्ठाय भूतले

श्रीमते लोकनाथ स्वामींन इति नामिने

माझे प्रिय गुरू महाराज परमपूज्य लोकनाथ स्वामी महाराज

आपल्या चरण धुळीला माझा साष्टांग दंडवत प्रणाम स्वीकार करावा माझ्या आणि सर्वांत शिष्यांचे तारणहार तुमच्या दैवी कृपेचा सर्व जय असो तुमच्या निस्वार्थ दया आणि अमूल्य तत्त्वज्ञानाला सर्व जय असो तुमच्या 76 व्या व्यासपूजन निमित्त तुमच्या दैवी कृपेला सर्व जय असो

गुरु महाराज तुमच्या ज्ञानाच्या प्रकाशाने तुमच्या मधुर वाणीने आमचे जीवन प्रकाशित होत आहे जस अंधारात जेव्हा काजवा चमकतो तसे तुम्ही आमच्या जीवनामध्ये खाजव्यासारखे येऊन आम्हाला ज्ञानाचा प्रकाश देत आहात संसारामधील असलेल्या दावानल तुम्ही शांत करत आहात एक नवीन दिशा तुम्ही देत आहात

तुमच्या ज्ञानाने तसेच तुमच्या वाणीने जसे सूर्य आल्यानंतर अंधार जाऊन प्रकाश सर्वत्र पसरतो तसेच आमच्या जीवनातील अंधार नाहीसा होऊन एक सुंदर प्रकाशाची सुरुवात होते तुम्ही केलेले किर्तन जेव्हा आमच्या कानावर पडते एक दिव्य अनुभूतीचा अनुभव पाहायला मिळतो रोमांच येतो अंगावर शहारे येतात कृष्ण प्रेम जागृत झाल्यासारखे होते कृष्ण भावनेमध्ये स्थित राहण्याचा अनुभव प्राप्त होतो गुरु महाराज तुमचे ज्ञान ह्याला कुठली सीमा नाही तुमच्या ज्ञानाने आम्ही प्रकाशमय होत आहोत आम्हाला असेच प्रकाशमय राहायचे आहे तुमची कीर्ती जगभर पसरली आहे तसेच ते जगाच्या कानाकोपऱ्यात पोहोचेल आणि सर्व जगामध्ये हरिनामाचा गजर होईल

गुरु महाराज तुम्ही जेव्हा हरि बोलता तेव्हा खूप सुखाची प्राप्ती होते गुरु महाराज एक आता अनुभव आला तो मी तुम्हाला सांगू इच्छितो आम्ही आपल्या जपा सेशन अटेंड करत होतो त्यामध्ये आम्ही पंढरपूरचे विषय ऐकत होतो तेव्हा असे वाटले होते की आपण पंढरपूर येथे जावे ते पण प्रथमच अगोदर गेलो होतो पण त्या जाण्याला 25 ते 26 वर्ष झाली असावी तर आम्ही पंढरपूरला यायला तयारी केली की आपण जाऊयात पंढरपूरला आम्ही निघालो आणि आम्ही संध्याकाळी सात वाजता पोचलो त्यानंतर आम्ही श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिराचा नामदेव पायरीवरून दर्शन घेतला आणि राहण्याच्या ठिकाणी जाण्यासाठी निघालो आमची राहायची सोय माझ्या आत्याच्या असलेल्या धर्म शाळेत रूमवर होती व ती धर्मशाळा गोविंदपुरा येथे होती तेथे आम्ही जाण्यास निघालो जाताना आम्हाला फोन आला की त्या धर्म शाळेत जास्त लोकं असतात ती बहुतेक वेळा रिकामीच असते आणि त्यात आम्ही तिथेच तिघेच होतो त्यानंतर आम्हाला हिच्या घरातून कॉल आला आणि त्यांनी सांगितले की तिकडे न जाता दुसऱ्या जागी असलेल्या धर्म शाळेत जायला सांगितले आणि ती जागा जवळच होती आम्ही तिकडे गेलो आणि आमच्यावर खरच देवाची कृपा झाली तिथे आम्हाला राहायला छान रोम मिळाली आणि तेथे आमची खायची देखील सोय झाली कारण पंढरपूर मध्ये कांदा लसूण असणारे हॉटेल नसतील असे बोललेले बरोबर होईल पण देवाने आमची सोय करून ठेवली जेवल्यानंतर त्या धर्म शाळेच्या पाठीमागे नजर गेली आणि आमचा आनंद गगनात मावेना असा झाला कारण पाठीमागील बाजूस आम्हाला श्रीलंप्रभुपात घाट हे होते आणि ते पाहून खूप खुश झालो कारण आम्हाला आपले इस्कॉन चे मंदिर कोठे आहे हे माहीत नव्हते मग सकाळी आम्ही मंगल आरती करिता निघालो मंगला आरती करताना आम्हाला माहीत नव्हते की गुरू महाराज पंढरपूर येथे आहेत पण आम्ही विचार करत होतो की आपण मंगला आरती करत आहोत आणि गुरु महाराज डाव्या बाजूने आले आणि त्या दिवशी तसेच झाले आम्ही आरती करत असताना जसं इमॅजिन केलं होतं

तसंच गुरु महाराज मंदिरामध्ये आरतीसाठी आले तो अनुभव खूप खास होता त्या क्षणी खूप आनंद झाला डोळे पानावले कारण गुरू महाराजांनी समोर पाहतानाचा अनुभव खूप छान होता गुरु महाराजांना समोरासमोर पाहण्याची दुसरी वेळ होती ही वेळ पण खास होती आमचं पूर्ण लक्ष गुरु महाराजांकडे होतं त्यांच्यावरून नजर बाजूला जातच नव्हती तो क्षण आम्ही आयुष्यभर विसरू शकत नाही दुसऱ्या दिवशी आम्हाला गुरु महाराजांबरोबर बोलण्याचा अवसर भेटला आणि गुरु महाराजांबरोबर बोललो खूप छान वाटले

आपली आश्रित

भक्तिन प्रिया पाटील

================================================

मी रोज इस्कॉन सोलापूरला राधा दामोदर यांच्या दर्शनासाठी येत होतो मग माझी भेट पावन हरिनाम प्रभू यांच्याशी झाले मग मला त्यांनी तुमची 73 व्या व्यास पूजेत येण्यास सांगितले मग मला तेथे तीन दिवसांची सेवा प्राप्त झाले तुमची पहिली भेट तिथेच झाली मी तुमचे कीर्तन कथा तुमचे 73 व्या व्यास पूजा बघून खूप आनंदी झालो मला तुमची कृपा आशीर्वाद प्राप्त झाला म्हणून तुमच्या कृपेने ७४व्या व्यास पूजेला कंठी तुमच्या हातून घातली आणि 75 व्या व्यास पूजेला दीक्षा झाली

तुमचे भक्तांवरील प्रेम प्रभुपादान वरील प्रेम तुमची दयाळू स्वभाव हे मला खूप आवडतो अशीच कृपा माझ्यावर राहू द्या

मी माझ्या शेवटच्या श्वासापर्यंत आपली आणि प्रभोपदांची सेवा करीत राहील असा आशीर्वाद मला द्यावा पुन्हा एकदा व्यास पूजेच्या हार्दिक शुभेच्छा

माखन तस्करदास

सोलापूर

============================================

नमः ओम विष्णु पादाय कृष्णपृष्ठाय भूतले

श्रीमते लोकनाथ स्वामींन इतीनामिने

माझे प्रिय गुरु महाराज

तुम्हाला 76 व्या व्यास पूजेच्या हार्दिक शुभेच्छा परमपूज्य लोकनाथ स्वामी महाराजांना व्यास पूजेच्या हार्दिक शुभेच्छा

परमपूज्य गुरु महाराजांची गौरवगाथा विशाल महासागरासारखी आहे 1971 स*** परमपूज्य महाराजांनी हरेकृष्ण आंदोलनामध्ये

प्रवेश केला आणि वयाच्या अवघ्या 26 व्या वर्षी 1975साली श्रीलं प्रभुपादांकडून संन्यास दीक्षा घेतली व त्रिदंड धारण केला तेव्हापासून परमपूज्य महाराज अविश्रांतपणे जगभर प्रचार दौरे करीत असतात महाराज कितीही थकलेले असले किंवा प्रवासात असले तरीही सकाळी पाच वाजता जपा टॉकमध्ये सर्व भक्तांना दर्शन देतात त्यांच्या दर्शनाने दिवस कसा आनंदी जातो परमपूज्य महाराज त्यांच्या सर्व भक्तांवर स्वतःच्या मुलांप्रमाणेच प्रेम करतात महाराज त्यांच्या प्रवचनामध्ये बऱ्याच वेळा म्हणतात की माझे सर्व भक्त माझी मुलेच आहेत श्रीधाम पंढरपूर येथे परमपूज्य महाराजांनी श्रीलं प्रभुपाद घाटाचे निर्माण केले तेथे त्यांच्या आशीर्वादाने फक्त इस्कॉनच्याच नाही तर इतरही सर्व तिथे आलेले लोक रोज महाप्रसादाचा लाभ घेतात तसेच पंढरपूर मध्ये महाराजांच्या अथक परिश्रमामुळे भव्य दिव्य असे भूवैकुंठ मंदिर निर्माण असे कार्य चालू आहे परमपूज्य महाराजांच्या चरणी कोटी कोटी दंडवत

महाप्रकाश लीला देविदासी

पुणे

===============================================

माझ्या आध्यात्मिक गुरु महाराजांना कोटी कोटी दंडवत प्रणाम माझ्या गुरूंनी प्रकाशमय ज्ञानाने मला आध्यात्मिक दृष्टी प्रदान केली तसेच पात्रता नसता नाही आमचे शिष्यत्व स्वीकारले महाराज खूप दयाळू आहेत ते सर्वांवर निश्चित कृपा करतात मी त्यांची खूप ऋणी आहे मी माझे भाग्य समजते या मनुष्य जन्मात येऊन मला योग्य गुरु प्राप्त झाले

माझ्या गुरु महाराजांना खूप खूप दीर्घायुष्य लाभो त्यांच्याकडून आम्हाला खूप ज्ञान प्राप्त होवो सदैव त्यांचा आशीर्वाद आमच्या पाठीशी राहो हीच भगवंतांच्या चरणी प्रार्थना

माझी मुलगी व मी बेळगाव रथयात्रेला गेले असता  आम्ही महाराजांचे दर्शन घेण्यासाठी गेलो असता महाराजांनी आपल्या गळ्यातील हार माझ्या मुलीच्या गळ्यात घालून तिला कृपा आशीर्वाद दिला ही गोष्ट मी कधीही विसरू शकणार नाही

मी राधा गोपाल व राधा पंढरीनाथ यांच्या चरणी प्रार्थना करते की महाराजांना दीर्घायुष्य लाभो व त्यांचे स्वास्थ्य नेहमी ठीक राहो हीच प्रार्थना

आपली दासी

शुद्ध नामसेवा देविदासी

सांगली

=========================================





सर्वप्रथम परमपूज्य लोकनाथ स्वामी महाराज यांना माझा कोटी कोटी दंडवत प्रणाम गुरु महाराजांना 76 व्या व्यास पूजन निमित्त मनापासून हार्दिक शुभेच्छा

गुरु महाराजांचे गुणगान करणे म्हणजेच आमच्या शब्दाच्या पलीकडचे आहे त्यांचे गुण आपण कधीही वर्णन करू शकणार नाही

जसे आई-वडील आपल्याला जन्म देऊन या भौतिक जीवनाची ओळख करून देतात पण आपले गुरु आपल्याला या अध्यात्मिक जगाची ओळख करून देऊन भागवत धामाकडे जाण्याचा मार्ग दाखवतात की जेणेकरून आपला शिष्य या भूतलावर पुन्हा जन्म घेणार नाही असे आपले गुरु महाराज आपल्यावर त्यांच्या आध्यात्मिक आचरणाद्वारे कृपा करतात आई-वडील या भूतलावर कसे जगावे हे शिकवतात पण आपले गुरु आपल्याला भौतिक आसक्ती कडून आध्यात्मिक आसक्ती कडे जाण्याचा मार्ग दाखवतात

जसे आपण आई-वडिलांशिवाय हे भौतिक जग पाहू शकत नाही तसेच गुरूंच्या आश्रयाशिवाय आपण भगवंताकडे पोहोचू शकत नाही अर्थातच गुरुच आपल्याला भगवंतांचे वास्तविक दर्शन घडवू शकतात म्हणून गुरुचे आपल्या जीवनामध्ये फार महत्त्वाचे स्थान आहे आणि भगवंतांच्या कृपेने आपल्याला एक चांगले गुरु प्राप्त होऊ शकतात

जसे की आज मी स्वतःला फार भाग्यशाली समजते की मला परमपूज्य लोकनाट स्वामी महाराजांसारख्या गुरूंचा आश्रय मिळाला खरोखरच आमचे भाग्यच उजळले जन भगवंतांनी गुरु महाराजांच्या रूपात आमच्यावर कृपा केली असेच म्हणावे लागेल

गुरु महाराजांचे गुणगान कितीही केले तरी संपदा संपत नाही वास्तविक पाहता गुरु महाराजांचे गुणगान करण्यात इतकी पात्रता आपली नाहीच मुळी

गुरु महाराजांचे मला कधी जवळून दर्शन घेण्याचा प्रसंग आला नाही पण आठ दिवसांपूर्वी पंढरपूरला गुरु महाराजांचा जवळून दर्शन घेण्याची संधी मिळाली माझ्या मनाला खूप बरे वाटले जणू वाटत होते की गुरु महाराजांना बरेच वर्षापासून मी ओळखते असा माझ्या मनात भास झाला गुरु महाराज सांगलीच्या भक्तांबरोबर खूप आपुलकी ने बोलत होते प्रत्येक गोष्ट विचारत होते ते त्या दिवशी इतके व्यस्त असताना सुद्धा महाराजांनी आम्हाला भरपूर वेळ दिला

गुरु महाराजांनी काही भक्तांना भेटवस्तू दिल्या मी पण जेव्हा शेवटी गुरु महाराजांकडे संकोच पणे जाऊन एक छोटी भेट दिली गुरु महाराजांनी माझी ती भेट इतक्या नम्रपणे स्वीकारले की त्यांचा नम्रपणा पाहून माझ्या डोळ्यातून अचानकपणे अश्रू धारावाहू लागल्या का कुणास ठाऊक पण तो गुरु महाराजांचा आपुलकीचा अनुभव मी त्या क्षणी घेतला खूप समाधान वाटले मनाला

भगवंताकडे गुरु महाराजांसाठी एकच प्रार्थना आहे की गुरु महाराजांना त्यांच्या अध्यात्मिक जीवनामध्ये खूप खूप प्रगती प्राप्त





होवो

गुरु महाराजांचा आत्तापर्यंतचा अध्यात्मिक प्रवास भगवंतांच्या कृपेने बऱ्याच अडचणींवर मात करून सुखाचा गेला तसेच त्यांची शारीरिक प्रगती सुद्धा उत्तम राहावी अशी भगवंतांनी गुरु महाराजांवर आपली कृपा करावी तसेच पंढरपूर मधील वैकुंठ प्रकल्प लवकरात लवकरच पूर्ण व्हावा अशी गुरू महाराजांची तीव्र इच्छा आहे ते स्वप्न सुद्धा भगवंताने लवकरात लवकर साकार करावे अशी भगवंताकडे प्रार्थना करते

मधुपुरी मधुरा देविदासी

सांगली

==================================================

हरे कृष्णा गुरु महाराज आपल्या चरणी माझे कोटी कोटी दंडवत प्रणाम स्वीकार करावेत

नमः विष्णुपादाय कृष्णपृष्ठाय भूतले श्रीमते लोकनाथ स्वामीन ईति नामिने

प्रिय गुरु महाराज आपल्या 76 व्या अमृत महोत्सव व्यासपूजा निमित्त माझ्याकडून कोटी कोटी शुभेच्छा

श्री गुरु करुणा सिंधू अधमजनार बंधू

लोकनाथ लोके र जीवन

श्री गुरु महाराज आपण करून याचे सागर आहात पापी-अदम जीवाचे बंधू आहात त्यामुळे आमच्या ह्या पापी जीवावर दया करून या अंधकारमय भौतिक जीवनात उद्धार करण्यासाठी आपण अपार प्रयत्न करीत आहात प्रत्येक जीवाच्या हृदयात हरिनाम जागृत करीत आहात

झूम मंदिरामुळे प्रत्येक जीवाचा उद्धार होत आहे आपल्याबरोबर जप आणि संघ सानिध्य प्राप्त होत आहे आपला आशीर्वाद ही मिळत आहे या आशीर्वादामुळे भौतिक जीवनातून अध्यात्मिक जीवनात प्रवेश मिळत आहे त्यामुळे खूप खूप आभारी आहोत

श्रीलंप्रभुपादांचे आदेशाचे पालन करण्यात तुम्हाला स्वास्थ्य आणि दीर्घायुष्य उदंड आयुष्य लाभो हीच राधा दामोदर जगन्नाथ गुरुदेव सुभद्रा चरणी प्रार्थना प्रभूपदांच्या ग्रंथाचे प्रचार आणि प्रसार करावे हरिनामाचा प्रचार करावे हीच प्रार्थना गुरु महाराज कृपया मला आशीर्वाद द्यावा

आपली नित्यसेविका

सुभद्रा शरण देविदासी

सोलापूर

=====================================================

हरेकृष्ण गुरु महाराज दंडवत प्रणाम स्वीकार करावा प्रिय गुरु महाराज

कृपया आपल्या पवित्र चरणी माझा दंडवत प्रणाम स्वीकार करावा गुरू महाराज आपणाला 76 व्या व्यास पूजेनिमित्त खूप खूप हार्दिक शुभेच्छा

गुरु महाराज तुम्हाला इतकं काय सांगायचं की शब्दात कसं मांडावं कळत नाही परंतु गुरु महाराज एक गोष्ट मला नक्की सांगायची की जर पतीत जीवांच्या जीवनात जर शुद्ध भक्ताची कृपा असेल ना तर तो नक्कीच त्याला भगवद प्रेम प्राप्त होईल गुरु महाराज तुम्ही माझ्या आयुष्यात आला आणि जीवनाला नवीन वळण मिळालं त्याबद्दल खरंच खूप खूप धन्यवाद गुरु महाराज गुरु महाराज मी सध्या गायन क्लास लावला ज्याने करून मी भगवान प्रसन्नतेसाठी चांगलं कीर्तन करू शकेल मला कृपा करा जेणेकरून हे मी करू शकेल आणि रोजच्या जीवनात अमलात आणण्याचा प्रयत्न करेल

माझा जप देखील चांगला चालला आहे गुरु महाराज परंतु त्यात अजून सुधार करण्याची आवश्यकता आहे अजून चांगल्या प्रकारे जप करण्याचा प्रयत्न करीन

गुरु महाराज आपलं भाऊ वैकुंठ मंदिर लवकरात लवकर होऊ दे अशी प्रार्थना मी करेन आणि यथा संभव मी योगदान करेल गुरु महाराज एक विनंती की तुमची कृपा सदैव असू द्यावी जेणेकरून वैष्णव भगवान आणि गुरुजनांची सेवा घडावी

आपली दासी.पायल पाटील

पुणे

======================================

परमपूज्य लोकनाथ स्वामी महाराजांचे चरणी दंडवत प्रणाम परमपूज्य लोकनाट स्वामी महाराजांचा जन्म 1949 मध्ये आरवडे येथे झाला 1972 मध्ये ते शिल्पकार यांचे शिष्य झाले त्यांनी त्यांच्या हरिनाम दीक्षा घेतली त्यानंतर डिसेंबर 1975 मध्ये वयाच्या 26 व्या वर्षी त्यांना संन्यास दीक्षा मिळाली, श्रीलंप्रोपादांनी त्यांना जगभरात पदयात्रा आयोजित करून भगवान श्री चैतन्य यांचा संदेश

# मराठी

सांगण्याची आज्ञा दिली या प्रवासाचा पहिला टप्पा वृंदावन ते मायापूर असा होता

महाराष्ट्रातील त्यांच्या प्रवचना व्यतिरिक्त त्यांची प्रेरणादायी व्याख्याने आणि कीर्तने प्रसिद्ध आहेत ते एक उत्तम शिष्य असल्याचे उदाहरण आहेत आपल्या गुरुने सांगितलेली आज्ञा काटेकोरपणे कसे पाळा पाळणे हे परमपूज्य लोकनाट स्वामी महाराज यांच्याकडून शिकावे ते आज इस्कॉन मधील दीक्षा गुरून पैकी एक आहेत आणि त्यांनी जगभरात अनेकांना दीक्षा देऊन आपल्या शिष्य करून मार्गदर्शन केले आहे

मीही त्यातलाच एक भाग्यवान आहे ज्याला परमपूज्य लोकनाट स्वामी महाराजांनी आपल्या छत्रछायेत घेतलं गुरु हा पथप्रदर्शक असतो तो आपल्या आपल्याला मार्गदर्शन करतो आणि आयुष्यात येणाऱ्या अडचणींना सामोरे जाऊन त्यासोबत जगायला शिकवतो आयुष्यात अध्यात्मिक गुरु असणे फार गरजेचे असते कारण गुरूच ती व्यक्ती असते जी आपल्या चुका पदरात घेऊन आपल्याला भगवंतांची संलग्न करते कारण शास्त्रांमध्ये सांगितल्याप्रमाणे जोपर्यंत आपण पापरहित होत नाही तोपर्यंत आपल्याला भगवतप्राप्ती होत नाही आणि आपण असंख्यजन्म जरी घेतले तरी आपण आपली पाप शून्य नाही करू शकत पण जर आपण गुरुचा आश्रय घेतला तर दुरुस्ती व्यक्ती असते जिच्यामुळे आपला भार हलका होतो

जानेवारी 2022 मध्ये मी पंढरपूर मध्ये सर्वात आधी गुरु महाराजांचे दिव्य कीर्तन ऐकलं पण तेव्हा मला गुरूंची काय महती असते हे माहीत नव्हतं हळूहळू मी गुरु महाराजांची माहिती जाणून घेतली त्यांची महिमा ऐकली असं म्हणतात ना आपण गुरु निवडत नाहीत तेच आपल्याला कृपा छत्र प्रदान करतात गुरु महाराजांच्या दिव्य कीर्तनाचा सतत लाभ घेतल्यानंतर माझ्या भक्तीचा प्रवास सुरू झाला. तीन वर्षानंतर तुकाराम बीज च्या दिवशी हडपसर येथील सेंटरमध्ये मला दीक्षा घेण्यासाठी मार्गदर्शन मिळाले त्यात महाराजांचे दिव्य सत्संग ऐकायला मिळाले माझी पात्रता नसताना सुद्धा मला एक संधी मिळाली सर्वच गोष्टी एकमेकांशी जस जुळलेले आहेत असं वाटत होतं जसं की एखादा चमत्कार वाटलं ही नव्हतं इतक्या लवकर गुरु महाराजांचे शरण मला मिळेल पण मी असा ऐकलं होतं की महाराजांचे मन लोण्यासारखे मऊ आहे म्हणून कदाचित त्यांनी माझ्यावर इतक्या लवकर कृपा केली

परमपूज्य लोकनाट्य महाराजांची 75 वी व्यासपूजा आणि त्यात माझं भाग्य इतकं मोठं की माझी हरिनाम दीक्षा हा योग अत्यंत दिव्य होता वृंदावन मध्ये दीक्षा होणे म्हणजे विशेष कृपा आणि हे फक्त गुरु महाराजांमुळे शक्य झालं आषाढी एकादशीच्या दुसऱ्या दिवशी वृंदावन मधील इस्कॉन गो शाळेत मला महाराजांनी दीक्षा दिली आणि माझा धनंजय चा देव हरिदास झाला माझ्या सगळ्या चुका सगळे अपराध क्षमा करून त्यांनी मला कल्पवृक्षाप्रमाणे सावली दिली

गुरु हे तीच व्यक्ती असते जे आपली पात्रता न बघता आपल्याला मार्गदर्शन देते आणि त्या गुरूच्या मार्गदर्शनाशिवाय भगवंत प्राप्त होत नाहीत मी गुरु महाराजांबद्दल काही लिहू शकेल इतकी माझी पात्रता नाही पण त्यांनी जे केलेल्या माझ्यासाठी त्याचे रूळ मी

कधीच चुकते करू शकत नाही पण त्यांनी दिलेल्या आज्ञाचे प्रामाणिक पालन करणे हीच माझी आदरांजली आहे त्यांना परमपूज्य गुरु महाराजांना व्यासपूजा महोत्सवाच्या हार्दिक शुभेच्छा

देव हरिदास

पुणे

==================================================

ओम अज्ञान तीमिरानधस्य ज्ञानांजन शलाकया

चक्षुरूमिलितं येन तस्मै श्री गुरवे नमः

परमपूज्य गुरु महाराजांना त्यांच्या 76 व्या वाढदिवसाच्या खूप शुभेच्छा गुरु महाराजांची मी आभारी आहे की गुरु महाराजांनी आपल्या इचलकरंजीत भगवंत राधा श्यामसुंदर जिल्हा आणले आणि त्यांच्या कृपेने एक मोठे भव्य दिव्य मंदिर होत आहे

गुरु महाराजांच्या मुळे आसपास खेडेगावातील लोक जुडत आहेत प्रचार होत आहे आणि आम्हाला पण सेवा करायला मिळते आहे आमच्या दिवसाची सुरुवात झूम मंदिराने होते आणि तुमच्या दर्शनाने दिवस खूप छान जातो मी इतकी बुद्ध होते की तुम्ही मला शरण दिलं आणि राधा शामसुंदरच्या चरणी सेवेत लावले माझी एवढीच पात्रता आहे की गुरु महाराजांचे चांगले आरोग्य लाभो तुम्ही खूप दयेचे सागर आहात तुमचे कार्य खूप दिव्य भव्य आहे

गुरु महाराजांच्या चरणी एवढेच प्रार्थना आहे की लवकरात लवकर मोठा मंदिर हो आणि राधा शामसुंदर विराजमान होऊ दे माझी आध्यात्मिक प्रगती होऊ देत मी श्रीलंप्रभुपादांच्या मिशनमध्ये दासानुदास भावाने सेवा करू शकेल अशी शक्ति मला द्या

कालिंदी किशोरी देविदासी

इचलकरंजी

=====================================

नमः विष्णु बाळा कृष्ण पृष्ठाय भूतले

श्रीमते लोकनाथ स्वामीन ईति नामिने

नमः विष्णु पादाय कृष्ण पृष्ठाय भूतले.

श्रीमते भक्ती वेदांत स्वामीन इति नामिने

नमस्ते सारस्वते देवे गौरवानी प्रचारिने

निर्विशेषक शून्य वादी पाश्चात्य देश तारिने

परम पूजनीय गुरुदेव लोकनाथ महाराज यांना दंडवत प्रणाम

आपणास 76 व्या व्यास पूजन निमित्त हार्दिक शुभेच्छा

तुम्ही संत मायबाप कृपावंत

काय मी पतीत कीर्ती वानू

अवतार तुम्हा धराया कारण

उद्धारावे जन जड जीवा

वाढविले सुख भक्ती भाव धर्म कुळाचार नाम विठोबाचे

तुका म्हणे गुण चंदनाचे अंगी | तैसे तुम्ही जगी संत

जन

गुरु महाराज आपली महती गुणगान करण्यातपच मी बुद्धिमान नाही व ती क्षमता माझ्यात नाही पण इतकेच म्हणू शकते की अशा जड जीवावर कृपा केली आहे चंदनाप्रमाणे झिजून सर्व जीवांच्या वर कृपा करण्यासाठी चैतन्य महाप्रभू यांच्याप्रमाणे नगराध्य ग्राम प्रचार आपण करत आहात ऑल इंडिया पदयात्रा वृंदावन परिक्रमा नवद्वीप परिक्रमा एक दिवसीय पदयात्रा झूम मंदिर जपा टॉप विविध मंदिराची प्राणप्रतिष्ठापना विविध उत्सव या माध्यमाद्वारे भक्ती भावाचे सुख आपण प्रदान करत आहात

गुरु महाराज अशीच कृपादृष्टी आमच्यावर राहो आपल्या प्रचार कार्यासाठी आशीर्वाद प्रदान करावे अंतिम लक्ष कृष्ण प्रेम प्राप्त व्हावे हीच अभिलाषा

आपली कृपा अभिलाषी

महालक्ष्मी देवीदासी शिरढोण आरवडे

=======================================================





नमः विष्णु पादाय कृष्ण पृष्ठाय भूतले

श्रीमती लोकनाथ स्वामीन इति नामिने

परम पूज्य श्री लोकनाथ स्वामी महाराज आपल्या चरण कमळी कोटी कोटी दंडवत प्रणाम

मी काय आपली महिमा वर्णन करू शकते मी तर आपल्यासारख्या भक्तीरूपी सागरा पुढे पाण्याचा एक थेंब आहे तरीसुद्धा हे माझे सौभाग्य आहे की आज या पावन दिवशी मला आपले कौतुक करण्याची संधी मिळाली

आपल्या 76 व्या व्यासपूजा महोत्सवानिमित्त आपणास खूप खूप शुभेच्छा आपणास सुद्दढ व उदंड आयुष्य लाभो हीच श्री श्री राधा गोपाल ज्यांच्या चरणी प्रार्थना करते

गुरु महाराज तुम्ही खूप दयाळू आणि कृपाळू आहात भगवंता सारखेच यात काही शंकाच नाही म्हणूनच तर दररोज घेऊन द्वारे आपण आपला मौल्यवान वेळ आमच्यासारख्या शिष्यांसोबत देता जपासाठी ही आमच्या गुरूंनी आम्हाला दिलेली अमूल्य भेट आहे दिवसाची सुरुवात दररोज आपल्या दर्शनाने होते 2018 पासून अखंडपणे आपण झूमवर जप करण्यासाठी एकत्र येतात आज 2024 म्हणजेच सहा वर्ष होत आहेत तुमची निरंतरता मला प्रेरणा देते रोज सर्वांसोबत जप करण्याची झुंबर जप करणे माझी दिनचर्या झाली आहे

गुरु महाराज आपल्याला प्रभुपात महाराष्ट्राचे संत तुकाराम म्हणायचे आम्ही तर तुकाराम अण्णा पाहिले नाही पण आपल्या दर्शनाने आम्हाला तुकाराम महाराजांचे दर्शन होते

खूप खूप धन्यवाद गुरु महाराज

======================================================

नमः विष्णु पादाय कृष्णप्रिष्ठाय भूतले

श्रीमते लोकनाट्य स्वामीन ईति नामिने

कृपया आपके दासी का आपका दिव्य चरण कमल में प्रणाम स्वीकार करें व्यास पूजा की यह शुभ और मंगल प्रसंग पर आपकी ख्याति तीनों लोकों में बनी रहे गुरु महाराज जी आपकी जय हो

गुरु महाराज जी आपको छत्तर भी व्यास पूजा के उपलक्ष में बधाई हो गुरु महाराज जी आपको आने वाले सभी साल सुख समृद्धि

आयु वृद्धि यश कीर्ति गुरु गौरांग की कृपा से प्राप्त होती रहे

गुरु महाराज जी आप तो अनंत गुना की खान हो आपके गुना का वर्णन करने लायक में नहीं हूं फिर भी प्रयास कर रही हूं कुछ त्रुटि हो तो बड़े हृदय से क्षमा कीजिए

लोकनाथेर जीवन प्रभुपादेर समर्पण

कोमल मंजरी देवी दासी

सांगली

=============================================

नमः विष्णु पादाय कृष्णपृष्ठाय भूतले

श्रीमते लोकनाथ स्वामीन ईति नामिने

हरे कृष्ण गुरु महाराजांच्या चरणामध्ये कोटी कोटी दंडवत प्रणाम गुरुदेवांच्या 76 व्या व्यासपूजा निमित्त प्रभुपादांना आणि भगवंतांना प्रार्थना करते की महाराजांना उदंड आयुष्य स्वास्थ लाभावे कधी कधी वाटते आपण काय प्रार्थना करणार गुरुदेवांसाठी त्यांनी जेवढे केलेले आहे माझ्यासाठी किंवा माझ्यासारख्या पतितजीवांसाठी त्याची परतफेड होऊच शकत नाही

असे म्हणतात की गुरूंची भगवंतासारखीच पूजा किंवा सेवा केली पाहिजे कारण त्यांनी सतत चिंतनाद्वारे भगवंतांना एक प्रकारे धारणच केलेले असते. माझ्या गुरू महाराजांबद्दल तर काय सांगावे ते तर करुणेची साक्षात मूर्तिच आहेत लहान मोठे सगळ्यांनाच आदरणीय आहेत अर्थातच जो त्यांना भेटतो प्रत्येक जण त्यांच्याशी प्रभावित होतो महाराजांच्या इस्कॉन मधील सेवा त्यांचे प्रचार कार्य भक्ती मधील प्रगतीसाठी आणि प्रत्येक शिष्याच्या आध्यात्मिक प्रगती साठी जपा व जपाटाक अशा अनेक प्रकारचे कार्य महाराजांनी केलेले आहेत आणि करत आहेत त्याबद्दल सगळेच अवगत आहे मी जास्त काय सांगणार महाराजांचा संघ आशीर्वाद असाच आम्हाला लाभत राहो भगवंतांच्या चरणी हीच एक प्रार्थना

आपली कृपाभिलाशी

उज्वला गोपी देवीदासी.

संभाजी नगर

=========================================

नमः विष्णु पादाय कृष्ण प्रेष्ठाय भूतले

श्रीमती लोकनाथ स्वामीन ईति नामिने

हरे कृष्ण दंडवत प्रणाम माझे परमप्रिय श्री गुरु महाराज तुमच्या व्यास पूजेच्या अत्यंत शुभ दिवशी तुमच्या चरण कमळी माझे विनम्र अभिवादन स्वीकार करा

माझे प्रिय गुरु महाराज

आपल्या पवित्र शरण कमळावर कोटी कोटी नमस्कार श्रीलं प्रभुपादांची जय हो त्यांच्या दिव्य सेवेसाठी आपली जय हो या सर्वात पवित्र व्यास पूजन दिनी मी माझे मन पूर्णपणे आपल्या चरण कमळावर अर्पण करतो आपली कृपा आणि मार्गदर्शनाने माझे जीवन अर्थपूर्ण झाले आहे आपण श्रील प्रभुपादांचे खरे प्रतिनिधी आहात त्यांच्या करुणा भक्ती आणि श्री चैतन्य महाप्रभूंच्या मिशनसाठी असलेल्या पूर्ण समर्पणाचे सजीव मूर्तीमंत रूप

आपल्या वाणीमध्ये नामाचे पवित्र कंपन आहे आपले शब्द शास्त्राच्या गोडतेने भरलेले आहेत आणि आपल्या दृष्टीमध्ये एक खरा वैष्णव पाहिल्याचा अनुभव येतो आपण अहोरात्र स्त्रील प्रभुपादांच्या मिशनसाठी कार्यरत आहात आपल्या आरामाची किंवा प्रसिद्धीची चिंता न करता आणि तरीसुद्धा प्रत्येक शिष्याला प्रेमाने काळजीपूर्वक सन्मान देत असता

आजही मला तो प्रसंग आठवतो जेव्हा मी आपल्या चरणी माझ्या ग्रंथ वितरणाचा अहवाल दिला आणि आपण माझ्या पाठीवर प्रेमाने थोपटलं त्या क्षणाचा स्पर्श अजून माझ्या अंतकरणात अनुभवतो ती एक साधित हाप नव्हती ती आपल्या प्रेमाची मान्यतेची आणि पर्यायारण्याची शक्तीशाली झलक होती त्या क्षणाने मला पुन्हा उत्साही बनवलं आणि प्रभुपादांच्या मिशनसाठी प्रामाणिकतेने आणि उत्साहाने सेवा करण्याची प्रेरणा दिली

आपली कृपादृष्टी आणि आशीर्वाद हेच माझं खरं वैभव आहे आपली कृपा मिळाली तर कोणतीही सेवा अशक्य नाही माझ्यासारख्या अपात्र जीवासाठी सुद्धा गुरुदेव माझी प्रार्थना आहे माझ्या आळस अभिमान आणि विचलित वृत्तीवर विजय मिळवण्यासाठी माझ्यावर कृपा करा जेणेकरून मी आपला केवळ नाममात्र नाही तर कृतीतून खरा शिष्य होईल आपल्या मिशनचा एक प्रामाणिक नम्र आणि समर्पित सेवक आपली कृपा हेच माझे एकमेव आश्रय आहे आपली उपस्थिती हेच माझं मार्गदर्शन आहे आपले चरण कमळ हेच माझं शाश्वत निवासस्थान आहे पूर्ण भावनेने पूर्ण कृतज्ञतेने आणि समर्पणाने

तुमचा अपात्र दास.

आदी पुरुष रामदास

==================================================

नमः विष्णु पादाय कृष्ण प्रेष्ठाय भूतले

श्रीमती लोकनाथ स्वामीन ईति नामिने

सर्वप्रथम पूज्य गुरु महाराजांना व्यास पूजेच्या हार्दिक शुभेच्छा मी श्री श्री राधा पंढरीनाथ अण्णा प्रार्थना करते की माझ्या गुरू महाराजांचे स्वास्थ्य सदैव उत्तम राहो व त्यांना उदंड आयुष्य लाभो

गुरु महाराज आपल्या चरण कमळी माझे कोटी कोटी दंडवत प्रणाम गुरु महाराज आपल्या गुणांविषयी आणि महान कार्याविषयी मी पाहणार काय बोलणार परंतु आपल्या प्रसन्नतेसाठी दोन शब्द लिहीत आहे

संसार दावा नललीढ लोक

त्राणाय कारुण्य घनाघनात्वं

प्राप्तस्य कल्याण गुणारणुवस्य

वंदे गुरौ श्री चरणार विंदम

या गुरु अष्टकामध्ये आपण कृपेच्या सागरातून माझ्यावर कृपेचा वर्षाव करीत आहात गुरु महाराज आपण नसता तर मी या अंधकार रुपी भौतिक जगात हरवून गेली असती आपण मला अंधकारातून ज्ञानरूपी ज्योतीने प्रकाश दिला माझ्या जीवनात प्रकाश आणला महाराज आपले कार्य खूप महान आहे आपण जवळजवळ सर्व जगात म्हंटले तरी शंभर पेक्षा जास्त पदयात्रा सुरू केल्या आहेत खऱ्या अर्थाने आपण चैतन्य महाप्रभूंची वाणी सिद्ध केली आहे

गुरु महाराज आपण दररोज आम्हा शिष्यांना झूम मंदिरात येऊन दर्शन देता व आमचे भक्तीत प्रगती करण्याकरिता आम्हाला आशीर्वचन देता त्याबद्दल आपले खूप खूप आभार मानते आपले उपकार मी हजारो जन्म घेऊन देखील फेडू शकणार नाही

सीता सेविका देवीदासी

अहिल्यानगर

==================================================

नमः विष्णुपादाय कृष्ण प्रिष्ठाय भूतले श्रीमते लोकनाथ स्वामीन ईति नामिने

माझ्या प्रिय गुरु महाराजांच्या 76 व्या व्यास पूजेच्या खूप खूप शुभेच्छा माझ्या गुरु महाराजांना भरपूर आयुष्य लाभो ही भगवंतांच्या





चरणी प्रार्थना आहे माझ्या गुरु महाराजांचे अनंत गुणांचे वर्णन करण्याचे सामर्थ्य माझ्यामध्ये नाही तरीपण गुरुम महाराजांच्या संतुष्टीसाठी मी लिहिण्याचा प्रयत्न करीत आहे गुरु महाराज तुम्ही पदयात्रा चालू केली आणि त्या पदयात्रांचे आम्हाला ब्रह्म मुहूर्तावर जपाटाच्या वेळी साक्षात धाम दर्शन होते गुरु महाराज धाम दर्शन आणि तुमच्या दर्शनाने माझे मन भारावून जाते गुरू महाराज खूप खूप धन्यवाद तुम्ही माझ्यासारख्या तुच्छदासीवर कृपा केली गुरु महाराज तुम्ही 25 तारखेच्या कराडच्या शोभायात्रेत तुमचे दर्शन झाले आणि सर्व भक्तांना विशेष मार्गदर्शन केले मी खूप प्रसन्न आहे अशीच कृपा माझ्यावर कुटुंबावर आणि भक्तांवर असू द्या

गुरु महाराज मला तुमचे कीर्तन खूप खूप आवडते तुम्ही कीर्तन करताना अपंग व्यक्ती सुद्धा भावी बोर होतो गुरु महाराज मला भक्तांचा संग भेटत नाही गुरु महाराज मला खूप दुःख होते गुरु महाराज मला भक्तांचा संग मिळू द्या आणि माझ्या भक्तीत प्रगती होऊ द्या माझ्या मधील वाईट गुण निघून माझ्यामध्ये सणशीलता येऊ द्या मला वैष्णव सेवा गुरु सेवा करण्यायोग्य बनवा

आपली दासी

राधिका स्वरूपी देविदासी

कोल्हापूर

==================================================

नमः विष्णुपादाय कृष्णप्रष्ठाय भूतले

श्रीमते लोकनाथ स्वामीन ईति नामिने

परम पूज्य श्री गुरुदेव आपल्या दिव्य चरण कमळावर या तीनही नसेवकाचे कोटी कोटी दंडवत प्रणाम स्वीकार करावेत ही नम्र विनंती सर्वप्रथम मी आपणास व्यास पूजन निमित्त हार्दिक शुभेच्छा व्यक्त करतो व भगवंतांच्या चरणी आपल्या शारीरिक स्वास्थ्याविषयी प्रार्थना करतो

गुरुमुख पद्म वाक्य चित्तते करीया ऐक्य

आरना करीहमने आशा

गुरु महाराज आपण गेली 52 वर्षापासून प्रभूपदांच्या आज्ञेचे पालन करत आहात या कालावधीत आपण कधीही स्वतःच्या इच्छांचा विचार न करता केवळ श्रील प्रभुपादांसाठी जीवन व्यतीत करीत आहात आपली गुरूनिष्ठा अप्रतिम आहे आपल्या चरणी प्रार्थना करतो की अशी गुरूनिष्ठा माझ्यामध्ये देखील येवो जेणेकरून मी माझं जीवन सर्वस्व आपल्या सेवेत लावू शकेल

गुरु महाराज आपण विशेष व्यक्तिमत्व आहात म्हणून प्रभुपातांनी आपणास विशेष सेवा दिली ती म्हणजे पदयात्रा चैतन्य महाप्रभू

सुद्धा पदयात्रा केली होती तसेच आपल्या महाराष्ट्राचे वारकरी संत मंडळी जसे की तुकाराम महाराज ज्ञानेश्वर महाराज नामदेव महाराज गोरा कुंभार चोखामेळा इत्यादी सर्वांनी पदयात्रा केली आपल्या कृपेने आज पदयात्रेद्वारे घरोघरी दारोदारी हरिनाम हरी कथा हरिप्रसादाचे वितरण होत आहे

गुरु महाराज आपण नेहमी पंढरीचे पांडुरंगाचे गुणगान करता आणि विशेष करून पंढरीचे महात्मे जगाला व जागर करत आहात संत मंडळी सांगतात की.   पंढरीचे सुख नाही त्रिभुवनी.   पाहिली शोधूनी अवघी तीर्थे

अशा पंढरपुराचा वास चंद्रभागा स्नान अनेक दर्शन विठोबाचे केवळ आपल्या कृपेने भेटत आहे माझ्यासारख्या बुद्ध जीवांच्या कल्याणासाठी सामान्य व्यक्तीप्रमाणे आपण व्यवहार करता आपण साक्षात भगवंतांचे विश्वासू प्रतिनिधी असला तरीही आपण अशाच प्रकारे व्यवहार करता गुरु महाराज आपल्या दिव्य व्यक्तिमत्त्वाला जाणणे खूप अवघड आहे   वैष्णवेर क्रिया मुद्रा विज्ञेय न बुझाय

प्रत्यक्षात व्यवहार करताना मायेच्या प्रभावामुळे मी सर्व विसरून जातो व त्यामुळे नक्कीच अपराध झाले असणार त्यामुळे आपल्या चरणी प्रार्थना करतो की मला अपराधांसाठी क्षमा करावे

मी आपल्या चरण कमळावर नम्र निवेदन करतो की माझी बुद्धी नेहमी आपल्या चरणांशी स्थित रहावी ज्यामुळे आपण प्रभुपानांना प्रसन्न करण्यासाठी संपूर्ण जीवन दिला तसे माझे जीवनही आपल्या सेवेत लागावे यासाठी मला आध्यात्मिक शक्ति आणि बुद्धी प्रदान करावी ही नम्र विनंती

आपला कृपा अभिलाषी भिक्षुक

मधुर विठ्ठल नामदास

पंढरपूर

===============================================

नमः विष्णुपादाय कृष्णप्रेष्ठाय भूतले   श्रीमते लोकनाथ स्वामींन इति नामिने

गुरु महाराजांना 76 व्या व्यास पूजेच्या लाख लाख शुभेच्छा गुरुदेव हे कृपेच्या सागरातून म्हणजेच भगवंताकडून भरभरून कृपा प्राप्त करीत आहेत जसे की दररोज सकाळी पहाटे साडेपाच वाजता सर्व भक्तांना झूमद्वारे कृपाशीर्वाद देतात हे पाहून मनाला खूप बरे वाटते आनंद होतो एखाद्यावेळी उठण्यासाठी वेळ झाला तरी दिवसभर आज आपली फार मोठी चूक झाली असे वाटते कारण आज आपणास गुरु महाराजांचा आशीर्वाद मिळू शकला नाही याची खंत वाटते

गुरु महाराजांचे गुणगान करण्याची याबद्दल जीवाची काहीच पात्रता नाही त्यांचे गुणगान करण्यासाठी माझे शब्द अपुरे पडतील महाराजांना पदयात्रा दिंडी खूप आवडते ते पदयात्री भक्तांना विचारत असतात की पदयात्रा दिंडी कोठे आहे ग्रंथ वितरण प्रचार प्रसार कशा प्रकारे सुरू आहे तुम्ही जास्तीत जास्त भक्तांना प्रसाद ग्रंथ वितरण करा त्यामुळे प्रचार वाढेल त्यांना कीर्तन सम्राट संत तुकाराम महाराज म्हणून सर्वत्र ओळखले जाते झूम द्वारे त्यांचे नाव गिनीज बुक ऑफ वर्ल्ड मध्ये नोंद झाले आहे

गुरुदेवांना जेव्हा मिरजेमध्ये पहिल्यावेळी पाहिले तेव्हा त्यांना पाहता क्षणी वाटले की हे कोणी साधारण व्यक्ती नसून एक तेजस्वी भव्य दिव्य असणारी व्यक्ती म्हणजे हेच ते गुरु महाराज ते खूप दयाळू मृदू वाणी असणारे माझे गुरुदेव

गुरुदेवांनी मला चांगला ध्यानपूर्वक मन लावून जप करण्याची सेवा करण्याची ग्रंथ वाचन करण्याची बुद्धी द्यावी भगवंतांचे कधीही विस्मरण होऊ नये असा आशीर्वाद द्यावा

गुरु महाराजांना भगवंतांनी चांगले आरोग्य भरभरून सुख समृद्धी आणि निरोगी आयुष्य द्यावे हीच भगवंतांच्या चरणी प्रार्थना

पुन्हा एकदा व्यास पूजेच्या हार्दिक शुभेच्छा

अर्चन मग्न देवीदासी

सांगली

==================================================

परम पूज्य लोकनाथास्वामी आपणास व्यास पूजेच्या हार्दिक शुभेच्छा कोटी कोटी दंडवत प्रणाम

श्रीकृष्ण कृपा मूर्ती आपला जय जयकार असो 76 वी व्यास पूजेच्या आपणास शुभेच्छा आपले यश तिन्ही लोकांत पसरले आहे श्रीकृष्णांचे नाव पसरवण्यासाठी आपण आपले आयुष्य समर्पित केले आहे तोच श्रीकृष्ण आम्हाला आपला यश महिमा संपूर्ण जगभर पसरवण्यासाठी प्रेरणा देत आहे गुरु महाराज वाठार गावात भागवतम ठेवले आहे गुरु महाराज आम्ही शब्द पाळला आहे तुमच्या कृपेने भागवतम ठेवत आहे शिरवळ से भक्त लोक निरसे भक्त लोक वाठार से भक्त लोक व्यास पूजेच्या निमित्ताने भागवतम ठेवले आहे तुमचा आशीर्वाद आमच्या पाठीशी आहे आमच्या कुटुंबाला आणि वठार गावातल्या भक्तांना आशीर्वाद द्या कुटुंब परिवाराचा गुरु महाराज कोटी कोटी दंडवत प्रणाम स्वीकार करावा तुमचा आशीर्वाद राहू द्या

तारिणी यमुना देविदासी

सातारा

# मराठी

=================================================

परमपूज्य गुरु महाराजांच्या 76 व्या व्यास पूजन निमित्त शब्दांजली लिहीत आहे गुरु महाराजांना माझा दंडवत प्रणाम

गुरु महाराज मी स्वतःला खूप भाग्यशाली समजते की मला आपले गुणगान करण्याची संधी मिळाली 16 मे तारखेला आम्ही पंढरपूर मध्ये आले होते लातूर मंदिरामधून बरेच भक्त होते गुरु महाराजांचा खूपच जवळून संघ प्राप्त झाला मला खूप आनंद झाला गुरु महाराजांच्या कुठल्याही कार्यक्रमांमध्ये खूप लांबून संघ प्राप्त होत असतो तर विठ्ठल रुक्मिणीचे सुद्धा दर्शन खूप छान झाले तर गुरु महाराजांच्या कृपेमुळेच सर्व चांगल्या गोष्टी घडत असते

ब्रम्हांड भ्रमिते कौन भाग्यवान जीव

गुरु कृष्ण कृपा पाय भक्तीलताबीज

तर गुरूंची कृपा झाल्याशिवाय आपण कृष्ण प्राप्ती करू शकत नाही प्रभुपादांना त्यांच्या शिष्यांनी एकदा प्रश्न विचारला की प्रभुपात आम्ही नरकात प्रचार करू शकतो का प्रभुपात हो म्हणाले का कारण जेथे भगवंतांचे नाम नाही जेथे भक्ती नाही तिथे नरकच आहे असे गुरू महाराज प्रभूपदांचे शिष्य मला लाभले गुरु महाराज या भौतिक जगातल्या लोकांना काहीच माहित नाही भगवंत कोण आहे भक्ती काय आहे अशा लोकांना प्रचार करून लाखो हजारो भक्त बनवत आहेत ते दयेचे सागर आहेत ते इतरांना दुखी पाहून त्यांच्यावर सदैव करुणा करतात श्री चैतन्य महाप्रभू आणि रामानंद राय यांच्यामधील चर्चेच्या वेळी श्री चैतन्य महाप्रभू त्यांना विचारले की सर्वश्रेष्ठ कीर्ती कोणती यावर रामानंद राय म्हणाले की महान भक्त म्हणून कीर्तीवंत झालेल्या मनुष्याची कीर्ती सर्वश्रेष्ठ असते कारण तो केवळ वैकुंठातच शाश्वत जीवन असे नव्हे तर आपल्या कीर्ती द्वारे या भौतिक जगातही चिरंजीवी होतो तर गुरू महाराजांना उदंड आयुष्य लाभो व्यास पूजन निमित्त मनःपूर्वक शुभेच्छा

ज्योतिरमय सीता देवी दासी

लातूर

=================================================

श्री लोकनाथ स्वामी महाराज की जय

दंडवत प्रणाम गुरु महाराज

आपल्या कृपा आशीर्वादाने मी कृष्णभक्तीमध्ये हळूहळू पुढे चाललो आहे मी नेहमी तुमचा ऋणी राहील कारण आध्यात्मिक

गुरुमुळेच कृष्ण भक्ती आणि कृष्ण प्राप्ती होते अध्यात्मिक गुरूंच्या कृपेविना हे संभाव नाही त्यामुळे तुमच्या आशीर्वाद नेहमी माझ्या पाठीशी असू द्यावेत

भक्त मंगेश पोटे

दुबई

======================================

हरे कृष्ण प्रिय गुरु महाराज

आपल्या चरणी कोटी कोटी दंडवत प्रणाम

गुरु महाराज आपल्याला 76 व्या व्यास पूजन निमित्त हार्दिक शुभेच्छा

ओम अज्ञान तीमिरानधस्य ज्ञानांजन शलाकया चक्षुरूंन्मिलितं येन तस्मै श्री गुरवे नमः

गुरु महाराज आपण खूप खूप दयाळू आहात माझी काही एक पात्रता नसताना आपण माझ्यावर एवढी कृपा केली आहे मी आज जे काही आहे ते केवळ आपल्या कृपेमुळेच आपले एवढे वय आहे तरीसुद्धा तुम्ही नियमितपणे सकाळी मंगला आरती करून दररोज जपा सेशन जॉईन करून बाकी भक्तांना आपला संघ प्रदान करता प्रत्येक दिवशी वेगवेगळ्या ठिकाणी राहून एवढा प्रवास करून आणि एवढे नवीन प्रोजेक्ट चालू केले आहेत तरी तुमचे प्रत्येक भक्तावर वैयक्तिक लक्ष आहे गुरु महाराज प्रभूपदांनी आपल्याला संत तुकाराम महाराज म्हटले पुण्यामध्ये श्री राधा गोविंद यांच्या ब्रह्म महोत्सव निमित्त तुमचे स्वागत करताना एका प्रभुजींनी म्हटलं होतं की संतांचे दर्शन जर कोणाला घ्यायचे असेल तर डोळे भरून तुमचे दर्शन घ्यावे याचा योग सर्वप्रथम आपल्या कृपेमुळे तुमचे दर्शन 26 जानेवारी 2022 ला आरवडे येथे झाले लेक्चर द्वारे तुम्ही म्हणाला होता की श्री श्री राधा गोपाल यांना जे प्रिय आहेत त्यांना ते त्यांच्या बर्थडे पार्टीसाठी बोलावले आहे हे ऐकून मी भारावून गेले त्यावेळी पहिल्यांदा तुमचे कीर्तन ऐकले आणि मला आजही आठवलं आठवते त्यापूर्वी एवढा आनंदी वातावरण आणि सगळे एवढे रंगून कीर्तनात नृत्य करत होते की असा अनुभव याआधी कधी केला नव्हता त्याच रात्री आपल्या कृपेमुळे कृष्ण बंधूंचे आपले ग्लोरीफिकेशन सेशन ऐकण्याची संधी आपण दिलेत आणि मनात असा विचार केला की मला माझे गुरु महाराज मिळाले केवळ आपल्या कृपा आशीर्वादामुळे कोरोना मधून आम्ही सगळे वाचलो गुरु महाराज मी तुमची मनापासून माफी मागते की मी श्री गौर नेता आहे ना जे प्रॉमिस केले ते मी पूर्ण केले नाही तरीसुद्धा तुम्ही ज्याप्रमाणे खोडकर लेकरावर आई-वडील रागावतात तसेच ते प्रेम करतात तसेच तुम्ही देखील करता जपा सेशनमध्ये जप कसा करावा कोणत्या गोष्टी टाळाव्यात हे तुम्ही सांगितले मी जेव्हा सुट्टी साठी गुजरात वरून घरी आले आणि तुम्ही पंढरपूरला आलात

आणि आपल्या दर्शनाची इच्छा तुम्ही पूर्ण केली काही प्रश्न पडले तेव्हा कोणत्या ना कोणता मार्ग मला तुम्ही उत्तर देता तुम्ही एका जपाटामध्ये बोलला होतात की गाई तिच्या वासरावर ते वासरू असे असते की त्याचे त्या गायीकडे आईकडे लक्ष नसते ते त्याच्याच नादात असते पण त्या आईचे सर्वात जास्त प्रेम त्या बासरावर असते त्याचप्रमाणे मी देखील तुमच्यावर प्रेम करतो माझी काही एक पात्रता नाहीये गुरुमाऊली तरी सुद्धा तुम्ही किती कृपा करता तुमच्या ऐतुकी कृपेचे मी शब्दांमध्ये वर्णन करू शकत नाही आम्ही सगळ्यांनी प्रभोपदांना प्रत्यक्षात पाहिले नाही पण माझ्यासाठी माझे प्रभुपाद आपण आहात आणि अजून कितीतरी प्रसंग आहेत त्यामधून तुम्ही मला अलगत वाजवले आहे केवळ आपल्या कृपेमुळे मला कृष्ण बंधू मिळाले मी आपल्या प्रति पण अपराध केले आहेत त्यासाठी मी तुमची मनापासून माफी मागते मला तुमची शिष्य म्हणून स्वीकार करावी ही विनंती माझ्याकडून ध्यानपूर्वक आणि भावपूर्वक जप व्हावा आणि मी सदैव श्री श्री राधा पंढरीनाथ प्रभुपाद आपल्या सेवेमध्ये मग्न राहो असा आशीर्वाद द्यावा आणि माझ्यावर आणि माझ्या परिवारावर सदैव आपली कृपा असू द्यावी ही आपल्या चरणी विनंती

भक्तिन प्रगती ठोंबरे

==================================================



# मराठी

## शब्दांजली :

जय श्री गुरुदेव   नमः ॐ विष्णुपादाय कृष्णप्रेष्ठा य  भूतले श्री मते लोकनाथ स्वामी न इति नामिने     हे माझे परमप्रिय गुरु महाराज तुमच्या चरणी दंडवत प्रणाम  यावर्षी माझे खुप तिव्रते ने  शुद्धीकरण झाले  खुप त्रास झाला असे वाटले नको भक्ती करायला कारण माझ्या घरात कोणी भक्त नाही मी एकटीच भक्त आहे खुप मोठी तपश्चर्या आहे भक्ती करण म्हणजे  पण तुमच्या आणि श्री राधा गोपालजींच्या कृ पेने मी सगळ्या अडचणी पार करत इथ पर्यंत आले      या वर्षी  तुमची  माझ्यावर विशेष कृपा झाली ती म्हणजे माझी काहीच पात्रता नसताना तुम्ही मला वृंदावनात ब्राम्हण दिक्षा दिलीत त्याबद्दल मी तुमची खुप ऋणी आहे त्यामुळे मी भगवंताचे सतत स्मरण करण्याचा प्रयत्न करत आहे मला संध्या करताना खुप छान वाटते संध्या करत  असताना जी उर्जा प्रकाश दिसतो त्याने मला जगण्याचे बळ येते शक्ती येते  मी आरवडेला बोट फेस्टिवल  ला गेले तेव्हा मला खुप छान अनुभव आला जेव्हा भगवंत आणि राधा राणी नौकाविहार करत होते तेव्हा मला काहीच कळेना अस वाटत होत त्यांच्या मागे मागे पळाव  अस वाटत होत हे सगळ भूतला वरच नक्कीच नाहीय  हे सगळ गोलोका तीलच आहे खुप छान वाटत होत अंगावर रोमांच येत होते  इथे पण श्री राधा गोवालजीं नी माझ्यावर विशेष कृपा केली माझ्या भावाच लग्न ठरले आम्हाला खुप काळजी वाटत होती त्याची सगळी काळजी राधा राणीने मिटवली मला जमेच तशी महिन्यातून किंवा २ महिन्यातून मी आखडेला सेवेला जाते मंगल आरती करते खुप छान वाटते आरवडे त तुम्ही इथे मंदिर बांधल्या मुळे मला हे सगळे मिळाले सेवा मिळाली मी तुमची खुप ऋणी आहे  अशीच माझ्या कडून सेवा घडूद्या प्रचार होऊ द्या खुप गंभीरतेन जप आणि भक्ती होऊ द्या मला आशीवाद द्या  गुरु महाराज   तुम्ही खुप दयाळू आहात काळजी घ्या तब्येतीची जास्त दगदग करू नका तुम्ही आरवडेला रहायला कधी येणार मला तुमची सेवा करायची आहे माझ्या मुळे तुम्हाला त्रास झाला असेल नकळत पणे तर मला क्षमा करा तुम्हाला खुप चांगले आरोग्य लाभो हीच गोपाल जीच्या चरणी प्रार्थना आहे         **तुमची मदन मोहन मोहिनी देवी दासी मिरज महराष्ट्र**

प.पू. लोकनाथ स्वामी महाराज यांसी विनम्र साष्टांग दंडवत प्रणाम.
ॐ अज्ञान तिमीरान्धस्य ज्ञानाञ्जनशलाकया !ण चक्षुरून्मिलितं येन  तस्मै श्रीगुरवे नमः !!
माझे भाग्य म्हणून आपण मला आपला चरणाश्रय प्रदान केलात त्याबद्दल मी आपला कायम ऋणी आहे वास्तविक माझी योग्यता नव्हती तरी आपल्या कृपेने व श्रील प्रभूपादांच्या आशीर्वादाने 'अशक्य ते शक्य' झाले .
आपला जपा टॉक म्हणजे प्रत्यक्ष आपला आशीर्वाद असेच वर्णन करावे लागेल , सकाळी - सकाळी आपले प्रत्यक्ष दर्शन व आत्मसाक्षात्कारी संताकडून श्रवणाचा लाभ घेणाऱ्या पात्रांना भाग्यवंतच म्हटले पाहिजे.
संकिर्तन पदयात्रेबद्दल आपला जिव्हाळा म्हणजे समस्त अज्ञानी जीवांना भगवंतांच्या नाम श्रवणाचा लाभ व्हावा व त्यांची अध्यात्मक उन्नती व्हावी या उदात्त हेतूचे प्रात्यक्षिकच आहे असे मी मानतो.
माझे अवलोकन आहे की आपण आपल्या बऱ्याच शिष्यांना प्रत्यक्ष नावाने ओळखता हे विशेष जाणवते यातून आपल्या शिष्यांप्रती असलेला आपलेपणा,  स्नेहाचे बंधन दर्शवते.
श्रील प्रभूपादांनी आपणांस सांगितलेल्या 'बैलगाडीतून प्रचार' मोहिमेचे आपण वटवृक्षात रूपांतर केलेत आणि १५०हून अधिक देशांमधील होत असलेल्या पदयात्रा हे त्याचे फलित  आहे.
चैतन्य महाप्रभूंची आपल्यावर असीम कृपा आहे त्या कृपेतील एक कणभर कृपा आपण सर्वांवर करावी जेणेकरून कृष्णभावनाभावीत ससनौकेमध्ये आम्ही प्रविष्ट होऊ आणि निश्चित पैलतिर गाठू.

**आपला कृपाभिलाषि,**
**श्रीदामसखादास.**
**संदिप नाशिककर, अलिबाग.टं**





हरे कृष्ण

परमपूज्य लोकनाथ स्वामी महाराज व्यास पूजा शब्दांजली

नमः ओम विष्णुपादाय कृष्णप्रेष्ठाय भूतले ।
श्रीमते लोकनाथ स्वामीन् इति नामिने ।।

हरे कृष्ण गुरुमहाराज,
कृपया आपल्या चरणकमळांशी माझा पंचांग प्रणाम स्वीकार करावा.
श्रील प्रभुपाद की जय .

गुरुमहाराज, आपल्याला या अतिपावन ७६ व्या व्यासपूजेच्या अनंत कृष्णभावनामृत भक्तिमय शुभेच्छा .
तुमच्या आशीर्वादाने ही व्यासपूजा शब्दांजली मी तुम्हाला अर्पण करत आहे कारण माझी एवढी पात्रता नाही कि मी तुमच्या गुणांचे वर्णन करावे . तुमच्या प्रति कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हा माझा एक छोटा प्रयत्न आहे.

गुरुमहाराज, सर्वप्रथम मी तुमची नित्य ऋणी आहे. तुम्ही या भौतिक जगात फक्त आणि फक्त माझ्यासारख्या बध्द जीवांच्या उद्धारासाठी आला आहात. तुम्ही अनेक मार्गांनी या सर्व बध्द जीवांना पुन्हा भगवंताशी जोडत आहात आणि भगवंताशी असलेल्या नात्याचे स्मरण करवून देत आहात. ५० वर्षांहून जास्त काळ लोटला आहे. तुम्ही आजही श्रील प्रभुपादांच्या सेवेत उत्साहाने अखंड कार्यरत आहात.

गुरुमहाराज, तुम्हाला स्मरण केल्यावर किंवा तुमच्या सान्निध्यात असताना जो अत्युच्च आनंद मिळतो कदाचित हाच गोलोक वृन्दावनात मिळणारा आनंद आहे असे वाटतो. अंधकाराने भरलेल्या माझ्या आयुष्यात तुम्ही प्रकाशमान, तेजोमय सूर्य बनून आलात आणि माझ्या आयुष्याला योग्य दिशा आणि हेतू दिलात, तो म्हणजे पुन्हा गोलोक वृन्दावनात स्वतःच्या घरी परतण्याचा आहे आणि त्याची तयारी करण्याचा आहे. तुमचे हे शब्द मला फार उत्साही आणि निर्धास्त बनवतात.

माझ्या प्रत्येक भक्तिमय गोष्टीची सुरुवात ही तुमच्या उपस्थितीत, तुमच्या कृपेने झाली आहे. त्यासाठी मी तुमची शतशः ऋणी आहे. ज्याप्रमाणे तुम्ही आम्हाला कधी विसरत नाहीत त्याप्रमाणे मी ही तुम्हाला कधीही विसरू नये यासाठी तुमच्या कृपाआशीर्वादाची याचना करते.

कृपया तुमच्या चरणांशी माझ्याकडून झालेल्या अपराधांसाठी मला क्षमा करावी आणि माझ्यावर कृपा करावी. संपूर्ण गुरुपरंपरेतील आचार्यांचा आश्रय घेण्यासाठी तुमच्याकडून हरिनाम दीक्षा घेण्याची माझी इच्छा आहे. हरे कृष्ण.

**तुमची अपात्र पतित सेविका,**
**भक्तिन रुपाली कापसे**
**आटपाडी, महाराष्ट्र**

---

आदरणीय गुरुदेव, एच. एच. लोकनाथ स्वामी महाराज,

कृपया माझे कोटी कोटी साष्टांग दंडवत स्वीकारा.
श्रील प्रभुपादांची जय हो. आपल्या दिव्य सेवेला माझा शतशः नमस्कार.

अज्ञानाच्या अंधारातून आपण माझ्या अंतःकरणात सत्याचा दिवा प्रज्वलित केला.
आपल्या कृपेने मला कृष्णभक्तीची खरी दिशा सापडली.
आपल्या वचनेत, आचरणात आणि करुणेमध्ये मला श्रीकृष्णप्रेमाचे खरे दर्शन झाले.

आपण मला सांगितले की हा जगत नश्वर आहे,
पण कृष्णाचे प्रेम, त्याचे नाम आणि त्याचे भक्त हेच खरे शाश्वत धन आहे.
आपल्या सान्निध्यात मला भगवान श्रीकृष्ण अधिक जवळ वाटतो,
आणि आपल्या उपदेशात मला जीवनाचा खरा अर्थ सापडतो.

आपल्या कृपेसाठी मी अत्यंत ऋणी आहे.
आपण मला मार्गदर्शन केले, आशीर्वाद दिले आणि उंचावले.
आपल्या पवित्र पादकमळांचा मी सदैव सेवक राहो,
आणि आपल्या मिशनची सेवा मी निष्ठेने आणि प्रेमाने करत राहो.

आपला शिष्य,
**जोशुआ (Bangalore)**



# मराठी

नमो ऊः विष्णु पादय कृष्ण प्रेठाय भुतले!
श्रीमते लोकनाथ स्वामिन इती नमिने!!
परम पूज्य लोकनाथ स्वामी गुरुमहराज आपल्या चरण कमली कोटी कोटी दंडवत प्रणाम.
आपणास ७६ या व्यासपुजा महोत्सवानिमित्त हार्दिक शुभेच्छा.

गुरुमहराज या वर्षी आम्हला इस्कॉन बेंगळूरु वासियांना तुमचा संग सानिध्य,सेवा करण्याची संधी मिळाली. त्यामुळे आम्ही सर्व बेंगळुरू वासी खुप आनंदी आहे. तुम्ही असेच बेंगळुरू ला ववर्षातुन एकदा तरी आम्हाला तुमचा संग मिळूं दे आणि आम्हा सर्वावर तुमची आशीच कृपा राहु दे. हीच तुमच्या चरणी प्रार्थना.
झूम जपा टॉक द्वारे तुमचा रोज संग मिळत आहे पण मी ते प्रामाणिक पणे गंभीरतेने करण्यात आळस करत आहे. आम्हा सर्वावर तुमची अशीच कृपा राहु दे आणि आम्ही तुमचा सेवेत आणि तुमच्या मार्गदर्षणाखली सदैव प्रमानिकपणे तुमच्या सेवेत राहू हीच तुमच्या चरणी प्रार्थना.तुम्हाला निरोगी स्वास्थ्य, दिर्घाआयुष लाभो हीच राधा पंढरीनाथ चरणी प्रार्थना.

**तुमची दासानुदासी**
**सुदैवी सुंदरी देवी दासी**
**इस्कॉन शेषद्रीपुरम**
**बेंगळुरू.**

हरे कृष्ण प्रिय गुरू महाराज 🙏
कृपया तुमच्या चरण कमळी माझा पंचांग प्रणाम स्वीकार करा
अभय चारणारविंद भक्तीवेदांत स्वामी श्रीलं प्रभूपाद जी यांचा सदैव जय असो ,
आपल्या या पावन व्यासपूजा दिवस निम्मित तुम्हाला खुप खुप शुभेच्छा .

तुमची पतित अशी शिष्य मी थोडे लिहण्या चे प्रयत्न करते महाराज मी सध्या राधा गोविंद धाम इस्कॉन अहमदाबाद येथील मंदिर मधे जॉईन आहे मी मुरली मोहन प्रभू, सुंदर वामन प्रभू आणि माधव मोहिनी माताजी यांच्या मार्गदर्शन नुसार मंदिरात सेवा करते आणि आम्ही रविवारी होत असलेल्या पदयात्रेत ही जातो .
महाराज ज्या प्रमाणे श्रीलं प्रभूपाद जी यांनी तुम्हाला सुंदर असे नाव दिले आहे त्या प्रमाणे च तुम्ही आहेत तुम्ही लोकांच्या मनातील प्रिय श्रीमती राधा राणी कृष्ण चे दास आणि आमच्या सारख्या पतित जीवांचे नाथ आहेत . महाराज तुम्ही नेहमी आनंदी रहा, दीर्घायुष्य रहा तुमच्या मनातील जी भूवैकुंठ मंदिर बनवण्याची जी ईच्छा ती लवकरात लवकर पूर्ण होवो ही मी आई रुक्मिणी आणि माऊली विठ्ठल यांना प्रार्थना करेल .

**तुमची च तुच्छ सेवक**
**मयुरी वाडीले (कृष्ण बंधू )**
**ता . शिंदखेडा ,जि. धुळे , महाराष्ट्र**
**महाराज माझी चूक पदरात घेऊन कृपया मला तुमची शिष्य म्हणून स्वीकारा ही माझी तळमळीने प्रार्थना गुरुमहाराज🙏🙇**





नम ॐ विष्णु-पादाय कृष्ण-प्रेष्ठाय भूतले।
श्रीमते लोकनाथ-स्वामिन् इति नामिने

हरे कृष्ण गुरु महाराज कृपया माझे विनम्र अभिवादन स्वीकार करा.

गुरु महाराज आपल्याविषयी बोलण्याची माझी कुठलीच पात्रता नाही, पण या भौतिक अनर्थांनी भरलेल्या मनाचे शुद्धीकरण करण्यासाठी मी आपल्याविषयी बोलण्याचा प्रयत्न करतो. गुरु महाराज सर्व प्रथम आपणास आपल्या ७६ व्या व्यासपूजेच्या विठ्ठलमय शुभेच्छा आपणास उत्तम आणि निरोगी आरोग्य लाभो हीच श्री श्री राधा पंढरीनाथ, श्री श्री विठ्ठल रुक्मिणी, श्री श्री गौर निताई आणि श्रील प्रभूपाद यांच्या चरणी प्रार्थना.

गुरु महाराज, आपण महाराष्ट्रामधील एकमेव संत जगाच्या पाठीवर १०८ हून अधिक देशांत सनातन धर्माचा प्रचार केला, आणि अजूनही सुरू आहे. भगवान श्रीकृष्ण चैतन्य महाप्रभूंची भविष्यवाणी की पृथिवीते आछे यत नगरादि-ग्राम, सर्वत्र प्रचार हैबे मोर नाम:, आणि आपले गुरु महाराज इस्कॉन चे संस्थापक आचार्य अभयचरणारविंद भक्तिवेदांत स्वामी श्रील प्रभूपाद यांच्या आदेशाने आपण पदयात्रेच्या अथवा बैलगाडीच्या माध्यमातून १०८ पेक्षा अधिक देशांमध्ये हरिनामाचा, गीता, भागवताचा प्रचार/प्रसार केला, आणि अजूनही अखंड सुरूच आहे. गुरु महाराज मला तुम्हाला पाहिलं की संत तुकाराम महाराजांची आठवण येते, श्रील प्रभूपाद म्हणायचे तुकाराम महाराज हे महाराष्ट्राचे तुकाराम होते, पण लोकनाथ स्वामी इस्कॉन चे अर्थात संपूर्ण विश्वाचे तुकाराम आहेत, आणि खरंच गुरु महाराज आपण आपल्या कीर्तनातून दिव्य कार्यातून ते दाखवून दिलं.

आज श्री पंढरपूर धामात आपल्या मार्गदर्शनाखाली इस्कॉन भूवैकुंठ पंढरपूर नावाचे असे विशाल मंदिर बनत आहे, ज्याच्याद्वारे महाराष्ट्रातील प्रत्येक गावात महाप्रभूंच्या नावाचा प्रचार होणार. पुढील येणारी हजारो वर्षे या मंदिरातून पंढरपूर धामाचा महिमा संपूर्ण जगभर पसरनार आहे. गुरु महाराज खरोखरच आपले कार्य खूप महान आहे, जे शब्दांमध्ये मांडणे शक्य नाही. गुरु महाराज आपण खरच लोकांचे नाथ आहात. माझ्या सारख्या बद्ध आणि मूर्ख जीवाला पात्रता नसतानाही आपण मला आश्रय दिला त्याबद्दल मी आपला सदा ऋणी राहील.

आजच्या दिवशी आपल्या चरणी माझी हीच प्रार्थना की मला गुरुनिष्ठा आणि नामरुची प्रदान करा. आणि तुम्ही दिलेल्या आदेशांचे पालन करण्याची ताकद द्या.

**आपला तुच्छ दास**
**व्रजनायक कृष्ण दास (Hingoli)**

---

अज्ञान तिमिरान्धस्य ज्ञानाञ्जन शलाकया । चक्षुरुन्मीलितं येन तस्मै श्री गुरवे नमः ॥

परमपूज्य लोकांना स्वामी महाराजांच्या चरणांशी माझा कोटी कोटी प्रभू दंडवत प्रणाम आज या व्यास पूजेच्या दिवशी मला गुरु महाराजांविषयी बोलण्याची संधी मिळाले हे माझे परम सौभाग्य आहे खरंतर ज्यावेळी इस्कॉनमध्ये नवीनच यायला सुरुवात केली तेव्हा मला महाराजांबद्दल काहीच माहित नव्हतं माझ्या मैत्रिणींनी मला गुरु महाराजांचे काही कीर्तन आणि भजन ऐकण्यासाठी दिले होते त्या कीर्तनांचा आवाज मला खूप आवडायला लागला मला माहित नव्हतं ते गुरु महाराज गात आहेत 26 जानेवारीला मी जेव्हा आरवडे या ठिकाणी गेले होते तेव्हा स्टेजवर महाराजांना गाताना समोरून ऐकलं महाराजांच आवाज एवढा मन प्रसन्न करणार होता खरच त्यानंतर महाराज महाराष्ट्रात ज्या दिवशी असायचे त्या ठिकाणी फक्त किर्तन ऐकायला जायचे हळूहळू गुरु महाराज गुरु गुरु दीक्षा याबद्दल कळू लागलं त्याचवेळी ठरवलं गुरु महाराजांकडून दीक्षा घ्यायची 2011 साली. IDC कोर्स केला त्यातून गुरु आणि गुरु दीक्षा याबद्दल माहिती मिळाली आरवडे ला महाराज आले की सारखं जाणं व्हायचं पण गुरू महाराजांची पुढं बोलायची हिंमत होत नव्हती का माहीत नाही पण भीती वाटायची आपली तेवढी योग्यता आहे का असा विचार सतत व्हायचा 2015 स*गुरु महाराज साताऱ्याला आले होते तेव्हा महाराजांचा प्रसाद बनवून देण्याचे सेवा मला मिळाली आणि महत्त्वाचं म्हणजे महाराजांचा उद्दिष्ट खायला सुद्धा भेटलं महाराजांनी बुंदी प्रसादही हातावर ठेवला खरच गुरु महाराज खूप दावे आहेत 2019 साली पंढरपूर मध्ये गुरु महाराजांकडून दीक्षा मिळणार होती आमच्या गावची बरीच भक्त तिथे दीक्षा घेण्यासाठी आले होते त्यात माझाही नंबर होता आम्हाला एका लाईन मध्ये उभं केलं होतं आणि पहिला नंबर माझाच नेहमीसारखा भीती वाटत होतीस महाराज बघत होते माझ्याकडे पण मी घाबरलेलीच आणि ज्यावेळी माझं नाव घेतलं दिक्षासाठी तेव्हा मनात खूप धाकधूक होत होती काय बोलायचं काय करायचं काहीच माहित नव्हतं माझे दात दुख महाराजांना कदाचित कळली असावी महाराज स्वतःच बोलले काय नाव मी आधी चपापले पण म्हणाले आरती पवार,.... महाराज बघत होते आणि माळ देऊन बोलले आनंद गोपी खरंच मन भरून गेलं अचानक डोळ्यात पाणी आलं महाराजांना दंडवत केला आणि येऊन जागेवर बसले लोक म्हणतात आयुष्यात काय कमावलं खरंतर भौतिक काहीच नाही पण गुरूंचा आश्रय भेटला तेच माझ्यासाठी खूप मोठी संपत्ती आहे गुरूंबद्दल दोन गोष्टी करण गरजेचे असतात एक वपु सेवा आणि दुसरी वाणी सेवा करण्याची संधी भेटत नाही पण गुरूंनी सांगितलेल्या वाणी सेवा नक्कीच करण्याचा प्रयत्न करेन मी नेहमीच त्यांचा आदर करीन गुरूंच्या मार्गदर्शनाचे पालन करेल त्यांच्या स्मरण करण गुरु महाराज माझ्या पाठीशी असेच उभे रहा तुमचा माझ्यावर सतत आशीर्वाद असू द्या तुमच्यासारखे गुरु माझ्या आयुष्यात आहेत हीच खूप मोठी गोष्ट आहे यासाठी मनापासून आभार, खरंच धन्यवाद,मी खूप धन्य आहे. हरे कृष्णा 🙏 **Anangagopidevidasi( KRISHNA BANDHU) Satara**



# मराठी

हरे कृष्ण दंडवत प्रणाम गुरु महाराज,
आपणास 76 व्या व्यास पूजन निमित्त हार्दिक शुभेच्छा. गुरु महाराज आपल्या गुणांचे वर्णन करावे अशी पात्रता माझ्यात नाही ,आपल्यामध्ये काही दोष नाही हाच सर्वात मोठा गुण आहे. आपल्यामध्ये भेद बुद्धी नाही आपण सर्वांना समभावानेच पाहतात व जेवढे जास्तीत जास्त कृष्ण देता येईल तेवढा आपण देण्याचा प्रयत्न करतात. इतर अनेक वैष्णव खूप चांगले प्रवचन करतात कीर्तन करतात परंतु जेव्हा आपण माईक हातात घेतात तेव्हा, एखाद्या राजाने पूर्ण सभेवर ताबा घ्यावा त्याप्रमाणे भास होतो ,आपला आवाजातील भारदस्तपणा एक उठावदारपणा एक स्पष्टता डायरेक्ट हृदयापर्यंत पोहोचते. आपण जेव्हा बोलतात तेव्हा आपण बोलतच जावे व या कानाने फक्त ऐकतच जावे असे वाटते कितीही ऐकले तरी मन भरत नाही.

गुरु महाराज मी अतिशय पतीत असा जीवात्मा आहे माझ्यात काही चांगले गुण नाही , पण तरीही आपण मला आश्रय दिला आहे ही आपली महानताच आहे. गुरु महाराज आपण माझ्यावर कृपा करावी जेणेकरून मी आपली काही सेवा करू शकेन.

**आपल्या चरणांचा दास.**
**वेनुधारी श्याम दास, श्रीरामपूर.**

---

हरे कृष्ण, माझे अत्यंत प्रिय श्रील गुरुदेव

श्रील प्रभुपाद की जय! गुरुदेव महाराज की जय!

नमो ओं विष्णुपदाय कृष्ण-प्रेष्ठाय भूतले
श्रीमते लोकनाथस्वामी इति नामिने
आपल्या ७६व्या व्यास पूजेच्या पावन दिवशी, कृपया माझे कोटी कोटी नम्र साष्टांग दंडवत प्रणाम आपल्या पवित्र चरणकमळांवर स्वीकारा. मी आपल्या चरणधुळीला वंदन करते.

गुरुदेव, कृपया मला आशीर्वाद द्या की मी लवकरच आपले प्रत्यक्ष दर्शन घेऊ शकेन, आणि आपण मला दीक्षा देऊन आपली सेवा करण्याची संधी द्याल.

गुरुदेव, श्री राधा-माधव नेहमीच आपल्यावर आपली कृपादृष्टी ठेवोत, आणि आपण कृपया मला आपल्या दया-भावाने गोलोकधामात घेऊन जा.

माझी प्रार्थना आहे की, आपण मला आपली शिष्या म्हणून स्वीकारा. आतापर्यंत मी फक्त मोबाईल आणि टीव्हीवरूनच आपले दर्शन घेऊन नमस्कार केला आहे, पण आता मला आपल्याला समोरून साष्टांग नमस्कार करायचा आहे.

**आपली कन्या,**
**अंजली**
**नगीना, बिजनौर, उत्तर प्रदेश, भारत**
**(कृष्ण बंधु - ISKCON)**

---

हरे कृष्ण गुरु महाराज
आपल्या चरणकमलांवर माझा कोटी कोटी दंडवत प्रणाम. श्रील प्रभुपाद की जय गुरुदेव माझी काहीच योग्यता नाही आपल्याला ऑफरिंग लिहायची, पण माझ्यावर काही कृपा झाली असेल आणि मला कृष्णबंधुच असोसिएशन मिळालं. आणि त्यांच्या असोसिएशन मुळेच मी भक्ती करु शकत आहे. गुरु महाराज आपण रोज झुम मंदिर मध्ये दर्शन देता, गुरु महाराज आपण कृपासिंधू आहात आम्हाला असंच नेहमी कृपेच्या छायेत ठेवा. आपले कीर्तन ऐकण्यासाठी आतुरता लागलेली असते. आपण सगळ्यांना कृष्ण प्रेम प्रदान करता, गुरु महाराज माझ्यावर पण कृपा करा. मला आपली शिष्य स्विकार करा गुरु महाराज. मला दीक्षा मिळावी म्हणून मी आपल्याकडे प्रार्थना करते. मला बुक डीसट्रीब्युट करायचं आहे पण माझ्या गावात कुणीही इस्कॉन भक्त नाही आहे ,मला कुणीतरी ऑफलाईन असोसिएशन मिळाव म्हणून मी आपल्याकडे प्रार्थना करते. ज्यामुळे मी काहीतरी सेवा करू शकेन. प्रभुपाद मिशन मध्ये थोडी काही सेवा करू शकेन असा आशीर्वाद द्या गुरुमहराज .

**आपली सेवक**
**सुवर्ण भट**
**वणी, जिल्हा यवतमाळ, महाराष्ट्र**



# मराठी

हरे कृष्ण दंडवत प्रणाम गुरुमहराज.......ज्या वेळी मी गुरु महाराजांना पहिल्यांदाच कोंढण्यापूर का बागीतल त्या वेळी मला असा वाटले की मी भगवंतांनाच बघितले अस वाटत होते... आणि मला गुरु महाराजांची सर्वांत जास्त आवडलेली गोष्ट म्हणज कितीही भक्त का असेना त्यांच्या समोर ते सर्वांवरच नजर त्यांची टाकतात ..बापरे ... खूप छान वाटले मला जेव्हा मी पहिल्यांदा गुरुं महाराजांना पाहिले...माझ्या जीवनातला. सर्वात मोठा दिवस होता ती ज्या दिवशी मी गुरु महाराजांना..पाहिले... आणि मी कृष्णबंधू ग्रूप मध्ये आहे मी कृष्णबंधू मधे लेक्चर खूप छान वाटतात .... हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे हरे राम हरे राम राम राम हरे हरे..हरिरीरीरीरी बोलल.. **भक्त किरण ताले (अकोला)**

---

हरे कृष्ण,
प्रिय श्रील गुरु महाराज,
आपल्या कमळवत पायांजवळ माझे कोटी कोटी साष्टांग दंडवत प्रणाम.
श्रील प्रभुपादांना असंख्य नमस्कार!
आपल्या अतीपावन प्रकटदिनाच्या हार्दिक शुभेच्छा!
आपल्या 76व्या व्यासपूजेच्या असंख्य शुभकामना!
सर्व गौरव आपल्या पावन प्रकटदिनाला!

आपण या युगात भक्तीमार्गाचा दीप प्रज्वलित करणारे एक तेजस्वी दीपस्तंभ आहात. आपल्यातील सहिष्णुता, दयाळूपणा आणि निष्कपट भक्ती ही आम्हा सर्वांसाठी एक जिवंत प्रेरणा आहे. आपल्या एकेक प्रवचनाने, कीर्तनाने आणि साध्या कृतीनेसुद्धा आमच्या अंत:करणात भगवंताच्या भक्तीविषयी प्रेम जागृत होते.
आपल्या कृपेमुळे या सेवेला अर्थ प्राप्त झाला आहे. कृपया माझ्या सेवेत सातत्य आणि शुद्धता यासाठी आपली कृपादृष्टी सदैव राहो, अशी प्रार्थना करतो. आपली कृपा लाभावी म्हणून मी सदैव तळमळीने प्रयत्न करत राहीन.
आपल्या दीर्घायुष्यासाठी व उत्तम आरोग्यासाठी मी श्रीकृष्णचरणी प्रार्थना करतो, जेणेकरून आपण अजून अनेक वर्षे या जगात राहून श्रीचैतन्य महाप्रभूंच्या संकीर्तन चळवळीचा प्रचार करू शकाल.

**आपला सेवक,**
**प्रणव तिडके**
**करजगाव, अमरावती डिस्ट्रिक्ट, महाराष्ट्र,**
**कृष्णबंधु.**

प्रिय गुरु महाराज!!

हरे कृष्ण,

विनम्रतेच्या भावनेत मी तुमच्या चरण कमळांना माझा वंदन करीत आहे.

मी तुम्हाला व्यास पूजेच्या खूप खूप शुभेच्छा देते आणि श्री श्री रुक्मिणी द्वारकाधीशला या शुभ दिवसाच्या अनेक आनंदी परताव्याची प्रार्थना करते.

यावर्षी जरी मला तुम्हाला भेटण्याची संधी मिळाली नाही. तरीही माझ्या मनात आणि हृदयात मी तुमच्या कमळ चरणी आहे. अन्यथा माझ्या जीवनात काहीच अर्थ नाही.

हे गुरु महाराज माझे आध्यात्मिक वाढीसाठी जरी कासवाच्या पाऊल खुणा सारखे असले तरी ते तुमच्या कृपेमुळे आहे. मला पूर्ण विश्वास आहे की एक दिवस तुमची ही पतीत आत्मा तुमच्या भक्तिमय आणि करुणामय आशीर्वाद नक्कीच प्राप्त करेल.

हे गुरु महाराज आज पर्यंत मला तुमची दर्शन सकाळच्या जप चर्चा सत्रात होते. पण याआधी पहिल्यांदा तुमचे दर्शन इस्कॉन नागपूर 2019 रोजी रविवारच्या कार्यक्रमांमध्ये झाले. पण ते काही क्षणच मी तुमचे दर्शन करू शकले.

पण तुमच्याच कृपेने मला दुसऱ्यांदा तुमचे दर्शन श्री श्री कृष्ण बलराम मंदिर  इस्कॉन वृंदावन मध्ये १ नोव्हेंबर २०२१ रोजी सकाळच्या गुरु पूजा मध्ये झाले .

हरि बोल!हरि बोल! हरि बोल !!!

हे गुरु महाराज मी पहिल्यांदा वृंदावन ला आले आणि पहिल्यांदा माझी ही वृंदावन परिक्रमा होती. माझ्याकडे शब्द नाही मला व्यक्त करण्याला की तुमचे मला दुसऱ्यांदा दर्शन झाले ते पण वृंदावन मध्ये धाम मध्ये खूप खूप आभार गुरु महाराज. तुमचे दर्शन घेऊन ही परिक्रमा आणि ही यात्रा मंगलमय आणि पूर्ण झाली. तुमचे मनापासून धन्यवाद !

आजपर्यंत मला तुमच्याशी वैयक्तिक भेटीची संधी मिळाली नसली तरी तुमच्या कृपेने तो दिवस लवकरच येईल यावर माझं पूर्ण विश्वास आहे.

प्रिय गुरु महाराज,  तुमच्या सर्व दयेबद्दल तुमचे खूप खूप आभार .

कृपया, नेहमी निरोगी रहा.

कृपया ,आम्हाला सदैव तुमच्या सेवेत राहू द्या आणि तुमच्या कमळ चरणी राहू द्या.

तुमच्या दीर्घाआयुष्यासाठी आणि उत्तम आरोग्यासाठी नरसिंह देवाकडे सदैव प्रार्थना करते. पुन्हा एकदा मी तुम्हाला विनम्र अभिवादन करते. मला आशीर्वाद द्या . मनापासून पुन्हा एकदा धन्यवाद !

हरे कृष्ण ,



नमः ॐ विष्णुपादाय कृष्ण प्रेष्ठाय भूतले।
श्रीमते लोकनाथ स्वामिन् इति नामिने।।
नमः ॐ विष्णुपादाय कृष्ण प्रेष्ठाय भूतले।
श्रीमते भक्तिवेदांत स्वामिन् इति नामिने।।
नमस्ते सारस्वते देवे गौरवाणी प्रचारिणे।
निर्विशेष शुन्यवादी पाश्चात्य देश तारिणे।।
जय श्री कृष्ण चैतन्य प्रभु नित्यानंद ।
श्री अद्वैत गदाधर श्रीवास आदि गौर भक्त वृंद।।
हरे कृष्ण हरे कृष्ण।
कृष्ण कृष्ण हरे हरे ।।
हरे राम हरे राम।
राम राम हरे हरे।।
हरे कृष्ण गुरु महाराज,
आपल्या चरणकमळात दंडवत प्रणाम.
जय श्रील प्रभुपाद.
अपल्याला ७६व्या व्यासपुजेच्या शुभेच्छा.

मी 'मेरे प्रभुपाद' पुस्तक वाचले. प्रभुपादांसोबत आपले पत्र व्यवहार आणि चर्चा खूपच आपुलकीचे जाणवते. हे पुस्तक वाचून मला पण हरिसबर्ग मंदिरातले व्यास आसणावर ठेवलेल्या फोटो मधले प्रभुपाद माझेच वाटू लागले. पुस्तकात आपले प्रभुपादांप्रती असलेले समर्पण मलाही विकसीत करायचे आहे. आता मी 'गुरुमुख पद्मवाक्य' पुस्तक वाचणार आहे. दिक्षा झाल्यापासून जीवनात खूप बदल घडत आहेत. मी असे निर्णय घेतोय जे दिक्षे आगोदर अशक्य वाटायचे. आपणच मला बुद्धी आणि शक्ती प्रदान करताय. मला जाणवते की आपण माझ्या जीवनात भक्त पाठवत आहेत. ते भक्त मला काही उपदेश करता, आदेश करता, इत्यादी. ते सुंदर आचरण ठेवता. त्यांचे अनुसरण करत माझे जीवन चालू असते, थोडी सेवा होऊन जाते. आपला आभार.

आता मी श्रीमान राधेश्याम प्रभुंच्या मार्गदर्शनाखाली भक्ती करण्याचा प्रयत्न करतोय. सकाळी उठून भगवद गीतेच्या शलोकांवर प्रभुपादांचे प्रवचन ऐकत तयारी करतो. आठडयातून काही दिवस तुलसी आरती, गुरु पूजा आणि दर्शन आरती करायची सेवा आहे. त्यानंतर मंदिरातील भागवतम कक्षा ऐकतो. बाकी श्रवण, पुस्तक वाचन चालू असते. दुपारी मंदिरच्या इतर सेवा करतो. संध्या आरती करून, प्रसाद घेऊन अपल्या जपा कॉल वर संलग्न होण्याचा परयत्न करतो. अशा रित्या दिवस कसा पूर्ण होतो लक्षात नाही येत. या वर्षी मी प्रभुपादांचे सर्व छोटे पुस्तकं वाचण्याचा प्रयत्न करतोय. मला ठाऊक आहे की भक्ती घोड दौड शर्यत नाही. पण आपण सांगितल्या प्रमाणे असे लक्ष्य ठेवून प्रयत्न केले की मी कायम भक्तीमय असणार. आपले नवीन प्रवचन आले की ते नक्की ऐकतो. श्रीमान राधेश्याम प्रभुंच्या मार्ग दर्शनाखाली पेनस्टेट विद्यापीठात प्रचाराचे व्यवस्थापन करतो. मागील सत्रात पहिल्यांदाच आम्ही महिन्यातून २ कार्यक्रम करत काही मुलांना भक्तीची मुलभुत तत्व समजावण्याचा प्रयत्न केला. त्यातील १ युवक आता जप करतोय. २-३ युवक पुस्तक वाचन करायला एकत्र येतात. हे पाहून मला

परमपूज्य लोकनाथ स्वामी गुरु महाराज आपल्याला कोटी कोटी साष्टांग दंडवत प्रणाम 🙏

आपली कोणत्याही कार्यक्रमात असलेली उपस्थिती हीच आम्हा शिष्यांसाठी फार मोठी उपलब्धी असते. अनेक कार्यक्रमामध्ये ही गोष्ट प्रकर्षाने जाणवते. प्रत्येक वेळी विशेष उल्लेखनीय गोष्टी घडलेल्या आहेत परंतु त्यातही उल्लेखनीय म्हणजे ज्यावेळी आम्ही सर्व देहू ते पंढरपूर दिंडी पूर्ण करुन जेव्हा पंढरपूर इस्कॉन ला पोहोचलो तेव्हा समजले की, आपल्या उपस्थिती मध्ये स्वागत होणार तेव्हा आमचा आनंद अक्षरशः गगनात मावेनासा झाला. कारण आपले मुखकमल दर्शन झाले की आम्ही धन्य होत असतो.

दुसरा प्रसंग आहे आमच्या उभयतांच्या ब्राह्मण दीक्षेवेळचा. वास्तविक पाहता ब्रजमंडल परिक्रमा करुन झाल्याने पुन्हा वृन्दावनला जाणे होणार नव्हते परंतु ब्राह्मण दीक्षा वृंदावन ला होणार आणि आपल्या उपस्थिती मध्ये होणार म्हटल्यावर पुन्हा एकदा आनंदाला उधाण आले आणि आपले प्रत्यक्ष दर्शन घडले.

आपल्या आशीर्वादाने अलिबाग मध्ये एकदिवसीय पदयात्रा फार चांगल्या प्रकारे सुरू आहे. विशेष म्हणजे पदयात्रींमधील काही भक्तांनी मिळून अलिबाग तालुक्यातील छोट्या गावात असलेल्या शाळांमध्ये आम्ही आध्यात्मिक बालविकास प्रकल्पाअंतर्गत भगवद्गीता क्लास सुरू केले आहेत. प्रत्येक वैष्णव फेस्टिवल धुमधडाक्यात साजरा केला जातो. तूर्तास एवढेच!

पुन्हा आपल्या चरणी कोटी कोटी साष्टांग दंडवत प्रणाम! 🙏🙏🙏 **श्रीमान षडभुजगौरांगदास(अलिबाग)**

हरे कृष्णा
ओम अज्ञान तिमिरंधस्य ज्ञानांजनम शलाकया चक्षुरम मिलितम एव तस्मै श्री गुरुवे नमः
ओम नमः विष्णु पदाय कृष्ण प्रेष्टाय भूतले श्रीमते लोकनाथ स्वामी ईतीनामिने....
गुरू महाराज तुमच्या चरणी सादर दंडवत प्रणाम
गुरु महाराज केवळ भगवंताच्या इच्छेनेच तुम्ही आम्हाला भेटलात. आणि माझ्यासारख्या पतीत जिवाचा तुम्ही उद्धार केलात खरंच मी तुमची खूप ऋणी आहे. तुमची अशीच कृपा सदैव माझ्यावरती राहावी. महाराज तुम्ही खूप कृपाळू दयाळू आहात. आई जन्म देते जग दाखवते पण तुम्ही आमचे आध्यात्मिक पालक होऊन आमच्या जीवनाचे ध्येय काय आहे हे सांगितले. माझ्यासारख्या एका दलदलीत अडकलेल्या जीवाला तुम्ही भक्तीचा मार्ग दाखवला. महाराज तुम्हाला जेव्हा जपा टॉक मध्ये पाहते तेव्हा एक नवीन ऊर्जा मिळते. तुम्हाला पाहिल्यानंतर सगळ्या गोष्टीचा विसर पडतो अशीच कृपा नेहमी माझ्यावरती करत रहा. मला प्रचार करण्या साठी आशीर्वाद द्या. माझ्या घरातील सर्व व्यक्तींनी भक्तीमध्ये यावे यासाठी आशीर्वाद द्या. कोणत्याही कारणाने मी भक्तीपासून दूर जाऊ नये यासाठी मला आशीर्वाद द्या. महाराज तुमचा कृष्ण भावनेचा प्रचार आणि प्रसार पाहून मन भारावून जाते. यामध्ये तुमची गुरुप्रती असणारी श्रद्धा दिसून येते. अशी श्रद्धा माझ्या अंगी या यासाठी आशीर्वाद द्या. टकलीयुगामध्ये तारण्यासाठी जो तुम्ही आम्हाला अनमोल ठेवा दिलेला आहे तो म्हणजे
हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे
हरे राम हरे राम राम राम हरे हरे
या महामंत्रामुळे जीवनाचे अंतिम ध्येय प्राप्त झाले. महाराज तुम्ही आम्हाला हा मंत्र देऊन जन्ममृत्यूच्या फेऱ्यातून सुटण्याचा मार्ग दाखवला. मी तुमची खूप ऋणी आहे गुरु महाराज.
महाराज तुमचे गुण गावे एवढी पात्रता माझी मुळीच नाही.
काही चुकी झाल्यास मला क्षमा करावी. महाराज तुम्हाला 76 व्या जन्मदिनाच्या खूप खूप शुभेच्छा. माझे आयुष्य तुम्हाला लाभो तुम्ही दीर्घायुष्य व्हा शतायुष्य व्हा हीच महाप्रभूंच्या चरणी प्रार्थना. हरे कृष्णा
**आपली कृपाभिलाशी मंजिरी महिमा देविदासी इस्कॉन आरवडे शिरढोण सध्या पुणे**

हरे कृष्णा 🙏 गुरु महाराज दंडवत प्रणाम 🌹 🏵 🙏
श्रील प्रभुपाद की जय ! गुरु महाराज की जय 🙏

नम ॐ विष्णुपादाय कृष्णप्रेष्ठाय भूतले । श्रीमते लोकनाथ स्वामिनी नामिन।
नमस्ते सारस्वते देवे गौरवाणी प्रचार । निर्विशेष शून्यवादी पश्चात्य देश तारिणे ।
गुरु महाराज तुम्ही कशा आहात.

गुरु महाराज तुम्हाला 76 व्यस पूजेच्या राधाकृष्णमय, अनंत शुभेच्छा 🏵 🏵 🌷 💐
गुरु महाराज तुमच्या कथा अमृताहुनी गोड असतात तसेच तुमचे सुंदर ते ध्यान उभे विटेवरी हे कीर्तन मला खूप आवडते मी माझ्या दिवसाची सुरुवात कीर्तनापासून सुरू करते
तुम्ही कथा करत असताना सीता मातेची आठवण येते. त्यावेळी असं वाटतं की तुम्हाला ठसका लागला की वाटतं की पटकन पाणी द्यावे.सीता माता येईल तुम्हाला बुका लावेल . खोकला आलाकी वाटतं की सीता मातेची येतिल आणि सुट गोळी देखिल.
गुरु महाराज महासागरासारख्या आहात आणि त्यातील आम्ही मासे . गुरु महाराज तुम्हाला निरोगी आरोग्य लाभो उदंड आयुष्य लाभो हीच राधा शामसुंदर चरणी प्रार्थना. 🙏
गुरुब्रह्मा गुरुविष्णुः गुरुदेवो महेश्वरः । गुरुः साक्षात् परं ब्रह्म तस्मै श्री गुरवे नमः ॥🏵 🌹 💚 🙏गुरुविण नोहे साधू मुनिजन गुरुविण साहू कसे जीवन, गुरुविण नाही नरनारायण गुरुचरिताचे कर परायण...🙏 गुरु महाराज जगी जीवनात आधी गुरुसी वंदावे, प्रत्येक सकाळी नाम त्यांचे घ्यावे, गुरुच मायबाप, नाम घेता हरतील पाप, तो नसे मोक्षदाता, असे तो मार्गदाता, मार्ग देई सत्य, अहिंसा आणि शांतीचा... तोचि आपला गुरू ओळखावा... 💚 🙏 माझं गुरु महाराज जय गुरुदेव.

गुरु महाराज मला दीक्षा हवे आहे खरं घरातील वातावरण भक्तीत अडथळे येतात हे अनर्थ निघून जाऊ द्या नम्र विनंती
मला तुमची शिष्य म्हणून स्वीकार करा गुरु महाराज.
मला तुमच्याबरोबर जपा टैकला जपा करायचे आहेत
त्यासाठी घरात अडथळे आहेत ते दूर होऊ देत.
माझ्यातील काही अवगुण असतंल तर निघुन जाऊ देत.
तसेच वैष्णवाची निताई गौरांगा यांचे चांगल्या प्रकारे सेवा माझ्या हातून होऊ द्या असा आशीर्वाद द्या.
मी 25 जणांना जप दिला आहे.
भागवत गीता वाचन चालू आहे
दहा भगवद्गीता वितरण केले आहेत
माझी जपा साधना चांगली होऊ द्या गुरु महाराज
आयडीसी कोर्स विग्रह सेवा वन लेव्हल त्यात पास झाले आहे.

हर कृष्णा 💐
श्री श्री राधा शामसुंदर की जय
श्रीला प्रभुपाद की जय
श्रीला गुरुगौरांग की जय
नमः ओम विष्णुपदाय कृष्णा प्रेष्टाय भूतले श्री मते लोकनाथास्वामी इति नामीने.

परमपूज्य गुरु महाराज कृपया माझा नम्र दंडवत प्रणाम स्वीकार करावा.🙇🙇🙏🙏
गुरु महाराज तुम्हाला ७६ व्या व्यास पूजेची हार्दिक शुभकामना. 💐💐💐 मी राधा शाम सुंदरजनकडे प्रार्थना करते की तुमचे स्वास्थ्य हे उत्तम प्रतीचे राहो. तुमचा संघ सानिध्य दररोज सर्व शिष्यांना मिळो.

गुरु महाराज मी तुमच्याबद्दल खूप कृतज्ञ आहे. माझ्यासारख्या पतीत जिवाचा तुम्ही स्वीकार केला. आम्हाला राधा श्याम सुंदरजंसारखे कृपाळू विग्रह दिला. धन्यवाद हा शब्द खूप छोटा आहे, तुम्ही केलेल्या उपकारांची मोजमापच नाही आहे.

दरवर्षीप्रमाणे आजही मला या चा उल्लेख करू वाटतो की मी झूम मंदिर चे खूप आभारी आहे. याच्याद्वारे मी तुमचे दर्शन घेऊ शकते. तुम्हाला ऐकू शकते. तुमच्यासोबत जप करू शकते.

गुरु महाराज जपाटाक सोडून जे तुम्ही मध्ये जप करताना हरिनामा विषयी आणि भगवंतांच्या विषयी जे काही बोलता ते मला खूप आवडते अगदी माझा अंतकरणाला स्पर्श करते. जसं की तुम्ही सांगता हरे कृष्ण मंत्र म्हणणे म्हणजे भगवंतांना कॉल करण्याप्रमाणे आहे भगवंत पूर्ण आपला कॉल रिसीव करतात, हरे कृष्ण मंत्र म्हणजे ही आपली भगवंतांशी असलेली पर्सनल मीटिंग आहे. जिथे आपल्याला कधीच दुसरा कोणी भगवंतांशी बोलताना डिस्टर्ब करणार नाही.
गुरु महाराज काही कारणावर मी जरी थोडं उशिरा उठले तरी मी पहिला गडबडीने फोन चालू करते आणि तुमच दर्शन घेते. तुम्हाला समोर बघितल्यावर मला खूप समाधान वाटतं आधार वाटतो आणि खूप मोठा कॉन्फिडन्स मिळतो. की आज मला गुरु महाराजांचे दर्शन झाले आणि माझा दिवस हा खूप मंगलमय जाणार.
कधी काही कारणास्तव तुम्ही नसता आणि फक्त तुमच्या जवळचं रेकॉर्डिंग दाखवलं जातं त्या वेळेला मी तुम्हाला खूप मिस करते.

गुरु महाराज मला आशीर्वाद द्या की तुमच्या सानिध्यात रोज मला जप करायला मिळो. रोज तुमचे दर्शन मिळो. गुरु महाराज तुम्ही ज्या वेळेला जप करत असता त्या मंत्रामधील स्पष्टता, त्या मंत्रामधील आर्तता आणि त्या मंत्रामधील शरणागती यामुळे मी ध्यानपूर्वक जप करू शकते.

गुरु महाराज मला अजुन एक सांगायचं की जे रोज जपा टॉक होते ते आमच्या आध्यात्मिक जीवनासाठी खूप पोषणदायक आहे.

हरे कृष्ण गुरुमहाराजजी,

ॐ अज्ञानतिमिरांधस्य ज्ञानांजनशलाकया चक्षुरुन्मीलितं येन तस्मै श्रीगुरवे नमः ।।
नमो ॐ विष्णुपादाय कृष्णप्रेश्रष्ठाय भूतले श्रीमते लोकनाथ स्वामिन इनि नामिने ॥
श्रील प्रभूपाद की जय हो.
श्रील गुरू आणि श्रीगौरांगकी जय हो.

परमपूज्य गुरुमहाराज जी,
आपल्या चरणकमली आमचा प्रणाम स्विकार करावा. आपणास ७६ व्या व्यासपुजा निमित्त हार्दिक शुभेच्छा.
गुरुमहाराज जी आपल्या अनंत गुणांचे वर्णन करणे आमच्यासाठी निश्चितच कठीण आणि अशक्यही आहे परंतू तरीहि या सुवर्ण संधीचा लाभ घेऊन आम्ही आमच्या भावना व्यक्त करण्याचा प्रयत्न करीत आहोत.

परम पुज्य गोपाल कृष्ण महाराजजी आपल्या एका प्रवचनात सांगत होते की एकेवेळी श्रीला प्रभुपादजी डल्लास अमेरिकेमध्ये प्रवचन देत असताना सांगितले की
यवन लोक आलेत आणि तलवारीच्या जोरावरती धर्म परिवर्तन केले.
इसाई लोक आलेत आणि पैशाच्या जोरावरती धर्म परिवर्तन केले.
पण मी वयोवृद्ध व्यक्ती आलो आहे तुमच्या देशात आणि माझ्याकडे तलवार पण नाही आणि पैसे ही नाही तरीही तुम्ही हरिनाम घेत आहात का? कारण हरिनाम सर्वआकर्षक आहे. कृष्ण हे सर्वआकर्षक आहे आणि या हरिनाम धनाचा साठा आम्ही रोज पहाटे ब्रह्ममुहूर्ताच्या वेळी जपाटॉकच्या माध्यमातून एकत्रित करीत आहोत.

गुरुमहाराजजी आपण आम्हाला अखंडीतपणे जपाटॉकच्या माध्यमातून पहाटे नित्य दर्शन देता याबद्दल शतशः धन्यवाद. हे खरच आमचे अहोभाग्य आहे की रोज पहाटे आमच्या गुरुमाऊलींचे दर्शन घडतात आणि सर्व वैष्णवानसोबत आम्ही जप करतो, यामुळे आमचा पूर्ण दिवस उल्लासित आणि आनंदाने जातो आणि हे सर्व आपल्या दया आणि कृपे शिवाय शक्य नाही.

गुरुमहाराजजी आम्ही नेहमी आणि सदासर्वदा आपले ऋणी आहोत कारण आपण आम्हाला प्रामाणिक गुरुपरंपरेचा आश्रय दिला. गुरुमहाराजजी आपल्या चरणकमली हीच प्रार्थना आहे की आम्ही ध्यानपूर्वक जप करून आपल्या कृपेने जी सेवा मिळेल ती सेवा योग्यभावनेत करू शकू आणि आमच्याकडून सदैव आपली आणि वैष्णवांची सेवा व्यावी आणि वैष्णव अपराध घडूनये हिच प्रार्थना आम्ही आपल्या चरणकमळी करू इच्छितो. आपले आरोग्य नेहमी चांगले, निरोगी आणि स्वस्थ रहावे हिच राधा श्यामसुंदरजी,नरसिंह भगवंताच्या आणि जगन्नाथ, बलदेव, सुभद्रा माई यांच्या चरणी आमची अंतःकरणापासुन प्रार्थना आहे.
आपले सेवक,

हरे कृष्णा

॥ परमपूज्य गुरुमहाराज श्रील लोकनाथ स्वामी महाराजांना कोटी कोटी प्रणाम ॥ ॥ शब्दांजली ॥

माझी गुरुमाऊली, कृपेची सावली, गुरु आज्ञेचे महत्त्व जाणली. तन-मन-धनाने प्रचाराला सरसावली, आपले संपूर्ण जीवन गुरूंना समर्पित केली. ॥धृ॥

दिन पतीतांच्या दुःख दुर केले, दीक्षा देऊन कृतार्थ केले. हरिनाम वदवूनी, भागवतसेवेत लावले, सर्वसामान्यांची जीवनदिशा सुधारले ॥१॥

साधनेसाठी गावोगावी मंदिरं बनविले, पदयात्रेने सुरू करून जनसामान्यांपर्यंत पोहोचले. मधुर संकीर्तनाने जणांना नाचविले, हरेकथामृत पाजून भक्तांना मुग्ध केले. ॥२॥

जपामंदिरात रोज दर्शन घडवले, उत्साहाच्या मूर्तीने उत्साहीत केले. गुरु-दर्शनाने आनंदाला उधाण आले, असा गुरु "मी" कधी न पाहिला. ॥३॥

अशा गुरूंनी मला शिष्यत्व दिले, या पतित जीवाचे जीवन उध्दारले. त्यांच्याच कृपेने लिहिले चार शब्द, माझ्या गुरुचरणी मी विसावले. ॥४॥

॥ शुभं भवतु ॥

**– विद्यामुर्ती देवी दासी गणेशनगर, श्री श्री राधा श्यामसुंदर मंदिर, इचलकरंजी जिल्हाः कोल्हापूर, महाराष्ट्र (विजया यशवंत गोडबोले)**

**व्यासपूजेच्या शुभमुहूर्तावर कृतज्ञतेने भरलेले अर्पण — श्रीगुरुदेव की जय** 🙇 🌸

*सर्वप्रथम श्रीगुरुपादपद्मांना माझे कोटी कोटी नम्र प्रणाम.* 🙏
*आपण माझ्या जीवनात श्रीकृष्णाची कृपा म्हणून प्रकट झाला आहात.* ✨

**आपण केवळ गुरू नाही, तर संकीर्तन यज्ञाचे महान आचार्य आहात.**
आपल्या **कीर्तनाने** हजारो जीवांचे हृदय परिवर्तन झाले आहे.
*आपल्या मधुर, भावपूर्ण आवाजातून जणू स्वयं श्रीनाम प्रकट होतो.* 🎶 💞
*आपल्या करतालांच्या गजरात आणि मृदंगाच्या निनादात भक्तीचा सागर उसळतो.* 🪘 ✨

*आपल्या संकीर्तनात असलेली तीव्रता, निरपेक्षता, आणि भगवद्भावना — आमच्यासाठी प्रेरणास्रोत आहे.* 💧
आपले कीर्तन हे केवळ संगीत नाही, ते *शुद्ध भक्तीचे माध्यम आहे.*

**आपण आम्हाला कीर्तन म्हणजे 'हृदयाची सेवा' काय असते हे शिकवलेत.**
आपल्या प्रत्येक कीर्तनात श्रीचैतन्य महाप्रभूंचे प्रेम प्रकट होते. 🌊 💓

*आपण जेव्हा 'हरे कृष्ण महामंत्र' गाता, तेव्हा जणू वैकुंठाचे दरवाजे उघडतात.* 🕊️ 🕉️

---

*आपल्यासारख्या गुरूचे चरण मिळणे ही आमच्यासाठी अनंत सौभाग्याची गोष्ट आहे.*
**व्यासपूजेच्या या दिवशी, आपल्या पवित्र चरणकमलांना कोटी कोटी प्रणाम.** 🌼 🏵️

*॥ श्रील गुरुदेव की जय!! श्रील प्रभुपाद की जय! ॥* 🎉 🎶 हरे कृष्ण हरे कृष्ण, 🙏
कृष्ण कृष्ण हरे हरे। 💫
हरे राम हरे राम, ✨
राम राम हरे हरे॥ **Bhakt Abhishek Rathod(Umarga)**

हरेकृष्ण दंडवत प्रणाम गुरुमहाराज
गौरांग पांडुरंग । श्रीश्री राधा पंढरीनाथ की जय । श्री श्री विठ्ठल रखमाई की जय ।
गुरु महाराज तुमची असीम कृपा मला प्राप्त झाली . ठाणे जगन्नाथ मंदिर उद्घाटनप्रसंगी रेवतीरमण प्रभुंच्या कृपेमुळे मला तुमच्या साठी प्रसाद बनवण्याची सेवा करण्याचे महत भाग्य लाभले . मी भक्ती शास्त्री करत आहे गुरु महाराज , मी तुम्हाला प्रार्थना केली की ' मी भक्ती शास्त्री चांगल्या प्रकारे लक्षपूर्वक अभ्यास करून करू शकेल असा आशिर्वाद दया . तेव्हा तुम्ही माझ्यावर आपला कृपा कटाक्ष टाकला आणि स्मीत हास्य करत म्हणाले की करा चांगल्या रीतीने करा . मी धन्य झाले गुरुमहाराज आणि माझ्या शरीरावर रोमांच उभे राहिले आणि डोळ्यातून आनंदाश्रू आले तो क्षण माझ्या जीवनातील अविस्मरणीय क्षण आहे गुरुमहाज . खूप खूप धन्यवाद . सदैवअसेच कृपा आशिर्वाद असूद्या . आपल्याला निरोगी आणि शतायुषी आयुष्य लाभो हीच राधा पंढरीनाथांच्या चरणी प्रार्थना आहे .

**आपली अपात्र शिष्या**
**सर्वदर्शनी देवी दासी ' एरंडोल** Kolhapur



# मराठी

नमः ओम विष्णुपदाय कृष्ण पृष्यय भूतले
श्रीमते लोकनाथ स्वामी स्वामीन इती नामिने

गुरु महाराज की जय, श्रील प्रभुपाद की जय, गुरुगौरांग की जय.

हरे कृष्णा गुरु महाराज प्रथम मी आपल्याला साष्टांग दंडवत प्रणाम करतो व आपल्याला 76 व्या व्यास पूजे निमित्त हार्दिक हार्दिक शुभेच्छा

महाराज मला खूप खूप अभिमान वाटतो की मी आपला शिष्य आहे व तुम्ही आम्हाला मार्गदर्शन करण्यासाठी दररोज झूम मीटिंग वरती मार्गदर्शन करण्यासाठी हजर असता तुम्ही आता आमचे आध्यात्मिक आई-बाबाच आहात तशी तुम्ही आमची काळजी घेता झूम मध्ये जगा तील सर्व शिष्य एका छता खाली हजर असल्यासारखे दिसतात व त्यामध्ये वेगवेगळी मार्गदर्शन आम्हाला दररोज लाभते व त्यावर आपले लक्षही असते

गुरु महाराज तुम्ही आपल्या शिष्यांची काळजी घेता व इतरही गुरु महाराज जे आता भौतिक जग सोडून गेलेले आहेत त्यांच्या शिष्यांचीही आपण तितकीच काळजी घेता याचं मला कौतुक वाटते त्यांनाही तुमच्या रूपात आपले गुरु महाराज मार्गदर्शन करण्यासाठी हजर आहेत असेच वाटते तशी तुम्ही त्यांना आपुलकी देता

व आपण प्रवचनामध्ये एक आणि एक शब्दांचा चांगला खुलासा करता ते मला खूप खूप आवडते आपला साधेपणा व आपण इतके करुणा अवतार आहात की आपली इतकी वय झाली असताना सुद्धा आपल्या शिष्यांना मार्गदर्शन करण्यासाठी आपण कुठेही असला तरी झूम मंदिरामध्ये आपण हजर असतात हे आम्हाला खूप खूप प्रेरणादायक आहे त्यामुळे आम्हा भक्तामध्ये खूप उत्साह वाढतो असेच आपले स्वास्थ्य चांगले राहू व आपल्याला दीर्घायुष्य लाभो हीच राधा श्याम सुंदर चरणी प्रार्थना करतो

व आपल्या कृपा आशीर्वादामुळेच मी श्री श्री राधा श्याम सुंदरांच्या चरणी सेवा करण्याची संधी सहस्त्रनाम प्रभुजी व दामोदर सखा प्रभुजी यांच्या मार्गदर्शनाखाली मिळत आहे हाच आपला मला आशीर्वाद आहे असे मी समजतो

व आपल्याला पुन्हा एकदा व्यास पूजेनिमित्त हार्दिक हार्दिक शुभेच्छा

परम पूज्य लोकनाथ स्वामी महाराज की जय

**आपलाच दास**
**सीता पती रामदास**
**संदीप वसंत कोरे**
**गाव-रेंदाळ, तालुका हातकणंगले, जिल्हा कोल्हापूर**

ओम् अज्ञान तिमिरांधस्य ज्ञानांजल शलाकया
चक्षुरुन्मिलितंयेन तस्मैै श्री गुरवे नम:
 परम वंदनिय गुरुदेव आपणास शहात्तराव्या व्यास पुजेच्या व जन्मदिनाच्या हार्दिक शुभेच्छा
 जसे आचार्य म्हणतात.

माझ्या विठोबाचा कैसा प्रेम भाव
आपणच होय देव गुरु॥

गुरुदेव आपण या तुच्छ जीवाच्या उद्धारासाठी जन्म घेतलात असे वाटतें या संसार सागरात तळमळणार्या जीवासाठी आपणच दिपस्तंभासारखे आहात आपल्या कदून हरीनाम दिक्षा घेऊन हा पतीत जीव पावण झाला आहेच परंतू या पामराची पात्रता नसताना आपली कृपा झाली ही या तुच्छ जीवासाठी एक अनमोल देणच आहे.

संतजण म्हणतात
सतगुरु वाचुन सापडेणा सोय
धरावे ते पाय आधि आधि

खरोखर गुरुदेव आपले चरण हे माझ्यासाठी चारी धामाहुु श्रेष्ट आहेत आपल्या कृपा प्रसादाने या जीवाचा उद्धार झाला असे मी मानतो.

गुरु महाराज या संसारातील पातीत जीवांच्या उद्धारासाठी आपण काय काय करता याची यादी करावी तेवढी थोडी आहे. सतत हरीनाम चिंतन ,कथा भागवत ,पदयात्रा तिर्थस्थळांना भेट हरीनाम संकीर्तन ,रथयात्रा ,मंदिरे निर्मिती ,आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन झुम मंदिर निर्मिती त्याद्वारे भक्तांना संग सानिध्य व जपा टॉक अशाअनेक उपक्रमांचा उपयोग भक्तांच्या अध्यात्मिक प्रगतीसाठी सतत प्रयत्न करता.कार्य प्रवण राहता.प्रभुपादांच्या प्रसन्नतेसाठी.रथयात्रा ,पदयात्रा ग्रथ वितरण यासाठी अहोरात्र झटता.

महाराज आपण सर्व भक्तांच्या उद्धारासाठी खुप प्रयत्न करता.

गुरुमुख पद्मवाक्य चितेते करिया ऐक्य
या पंक्ती आपण आपल्या जीवनामध्ये उतरल्या आहेत.

जार देखो तार कहो कृष्ण उपदेश
या संत वचणाचा आपल्या जीवनात अंगीकार केला आहात. आपणासारखे थोर गुरु लाभणे हे या जिवाचे परम सौभाग्य मानतो.ाथखरच गुरुदेव मला माझ्या भाग्याचा हेवा वाटतो.आपले गुणवर्णन करताना मला संत ज्ञानेश्वरांची पंक्ती आठवण येते

मज पामराशी काय थोरपण
पायीची वहाण पाय बरी

दर रोज झुम मंदिरातील आपली उपस्थितीि मंगलमय असते
गुरु महाराज आपल्या निरोगी .मंगलमय आयुष्या साठी श्री कृष्ण चरणी प्रार्थना करतो व वाणीस पुर्ण विराम देतो .
 हरे कृष्ण॥

**आपलाच**

🌷 हरे कृष्ण दंडवत प्रणाम आदरणीय परम पूज्य गुरु महाराज जी🙏

🌷 आपणास आपल्या ७६व्या वाढदिवसानिमित्त अनेकानेक गोड-गोड हार्दिक शुभेच्छा...तसेच आपल्या या पुढील निरामय आरोग्या सोबत दीर्घायुष्यासाठी देखील अनेक शुभकामना.

🌷 परमपूज्य गुरु महाराजजी आम्ही जेव्हा आपले दर्शन घेतो तेव्हा आम्हाला श्रील प्रभुपाद यांचे अवश्य स्मरण होते. ज्याप्रमाणे श्रील प्रभुपाद यांनी त्यांचे गुरु महाराज यांची सेवा केली त्याचप्रमाणे आपण देखील श्रील प्रभुपाद यांचे उद्दिष्ट की जे भगवन्नाम प्रचार, पुस्तक वितरण तसेच भक्तांमधील प्रेम संबंध यांच्यासाठी आपण अतुलनीय, हृदय विहंगम असे कार्य पुढे नेत आहात.

🌷 आपल्या श्रीमुखातून दिलेले प्रत्येक प्रवचन, उपदेश, जपा टॉक यांनी भक्तांच्या हृदयात सकारात्मक परिवर्तन केले आहे, त्यांना भगवत भक्त बनवले आहे. गुरुदेव आपल्या गुणांविषयी बोलणे म्हणजे एखाद्या सुंदर बागेतील विविध फुलांपैकी कोणते फुल अधिक सुंदर आहे कोणते जास्त सुगंधी आहे याबद्दल आपण जसा निर्णय घेऊ शकत नाही तसा आपल्या अनेकानेक गुणांपैकी कोणते गुण वर्णन करावे याचा निर्णय आम्ही आपले शिष्य घेऊ शकत नाहीत.

🌷 गुरुदेव माझ्या जीवनात जे सकारात्मक परिवर्तन झाल्याचे मी मानतो त्याच्यामध्ये आपले मुल्यवान ग्रंथ, मधुर हरिनाम संकीर्तन, पदयात्रेकरिता व पदयात्री भक्तांकरिता असणारे आपले प्रेम, दररोज सकाळी नियमितपणे आपली झूम मंदिरातील उपस्थिती यांचा सिंहाचा वाटा आहे.

🌷 गुरुदेव मला आपल्या प्रवचनातील सर्वात जास्त आवडलेली गोष्ट म्हणजे आपल्या प्रत्येक प्रवचनांमध्ये श्री श्री गौर निताई, आचार्य परंपरा व श्रील प्रभुपाद यांचे गुणांनुवर्णन यांचा जरूर उल्लेख असतो.

🌷 आपल्या उपदेशांमधील काही माणिक-मोती असे आहेत:- सहनशील बना, वर्तमानात रहा, इस्कॉन कधीही सोडू नका, श्री प्रभुपाद यांचे ग्रंथांचा अभ्यास करा, सर्व भक्तांनी एकमेकांशी प्रेमाने वागा, आपली नियमित साधना प्रामाणिकपणे करा इत्यादी.

🌷 परमपूज्य गुरु महाराज जी आपल्यामध्ये असणारी गुरुभक्ती, निष्ठा, सेवाभाव माझ्या अंगी कणभर तरी यावा अशी आपल्या चरणाशी प्रार्थना करून आपल्या यापुढील स्वस्थ आयुष्यासाठी श्री श्री विठ्ठल रखुमाई यांच्या चरणी प्रार्थना करतो🙏 हरेकृष्ण 🌷

आपला दासदासानुदास,
**🌷 अमल प्रेम दास,**
**रामपेठ, जळगाव-**

👣हरे कृष्ण👣

ॐ अज्ञान तिमिरान्धस्य ज्ञानाञ्जन शलाकया । चक्षुरुन्मीलितं येन तस्मै श्री गुरवे नमः ।।
आदरणीय गुरु महाराजांच्या चरणी माझा कोटी कोटी दंडवत प्रणाम. सर्वप्रथम ७६ व्या आविर्भाव दिना निमित्त आपणास खूप खूप शुभेच्छा. आपणास उदंड आयुष्य लाभो हीच भगवंतांच्या चरणी प्रार्थना.

गुरू महाराज झूम मंदिराच्या माध्यमातून दररोज आपले दर्शन होते, सर्व भक्तांच्या सोबत जप करण्याची संधी मिळते हे सर्व आपल्या कृपा आशीर्वादाने मिळत आहे.

असाच भक्तांचा सांग आणि आपला कृपा आशीर्वाद सदैव आम्हा सर्वांना मिळत राहो हीच भगवंतांच्या चरणी प्रार्थना.

**आपली कृपाभिलाशी,**
**शामाहरा देवी दासी,**
**(सुनंदा बारी)**
**हरे कृष्ण नामहट्ट प्रचार केंद्र, पिंप्राळा, जळगाव**

हरे कृष्ण,
परम पूज्य श्री गुरुदेवांच्या ७६ व्या व्यासपूजेनिमित्त,
त्यांच्या चरणी कोटी कोटी नम्र प्रणाम.

परमपूज्य गुरुमहाराज,
आपल्या कृपेमुळेच माझ्या या जीवनाला एक दिव्य दिशा मिळाली. आपण आम्हाला केवळ शास्त्र शिकवले नाही, तर जीवन कसं जगायचं, सेवा कशी करायची आणि कृष्णप्रेम कसं अनुभवायचं? हे शिकवलं. प्रभुपादांच्या आज्ञेच्या पालनासाठी तुम्ही तुमचं संपूर्ण जीवन अर्पण केलं. आमच्यासारख्या सामान्य जीवांना तुम्ही भक्तीचा खरा अर्थ शिकवलात. आपण त्यांच्या इच्छांचे खरे उत्तराधिकारी आहात. आपण आमच्यासाठी केवळ गुरु नाही, तर एक प्रेरणा आहात, दीपस्तंभ आहात, जो अज्ञानाच्या अंध:कारात प्रकाश देतो.
आपण online zoom meeting द्वारे आम्हाला दररोज सकाळी भक्तीत प्रोत्साहित करत असता. आपल्या कृपेमुळे लाभलेल्या या मार्गासाठी मी अनंत आभारी आहे. आपले कीर्तन, लेक्चर, प्रचार, इत्यादी आमच्यात एक नवीन उत्साह निर्माण करते.
आज आपल्या कृपेने पंढरपूरमध्ये 'प्रभुपाद घाट' चे उद्घाटन होत आहे यासाठी खूप खूप शुभेच्छा!
आज या पवित्र व्यासपूजेच्या दिवशी, मी तुमच्या पायाशी एकच प्रार्थना करते.
"हे गुरुदेव, तुमच्या चरणकमळांशी माझं जीवन अखंड जोडलेलं राहो. तुमच्या सेवेत, तुमच्या कृपेच्या आश्रयात, माझे हे आयुष्य जावो."
आपल्याबद्दलची ही शब्दांजली केवळ शब्द नाहीत, ती माझ्या अंत:करणाची कृतज्ञता आहे.

आपल्या चरणी अखंड सेवा करायची इच्छा बाळगणारी,
**आपली सेविका,**
**भक्तिन रसिका.**
**ठाणे (प) ४०० ६०६**
**हरे कृष्ण |**

हरे कृष्ण !
आदरणीय श्रील प्रभूपाद श्री गुरु श्रील गौरांग यांस माझा साष्टांग नमस्कार!

आदरणीय गुरुमहाराज आपणास माझा साष्टांग नमस्कार.
आपल्या पंच्यातराव्या व्यास पूजे प्रित्यर्थ माझ्या आदरांजलीचा आपण स्वीकार करावा अशी मी आपणास नम्र विनंती करत आहे.
श्रील प्रभुपाद यांनी लावलेल्या कृष्ण भावनामृत आंदोलनाच्या कल्पवृक्षाचे आपण आपल्या अथक परिश्रमाने विशाल आणि विराट अश्या वटवृक्ष मधे रूपांतर केले आहेत.त्यासाठी तुम्ही संन्यस्त जीवन जगला आहात.आपण करत असलेल्या कामाची महती सांगण्यास आमचे शब्द अपुरे पडत आहेत.
जसे की “ दिव्यत्वाची जेथ प्रचिती तेथे कर माझे जुळती “
सर्व भक्तासाठी रोज ब्रम्ह मुहुर्तावर आपण देत असलेल्या आपल्यादर्शनाने व महामंत्र चा जप करांयाची संधी आम्हा सर्वांना उपलब्ध करून आपण आम्हाला उपकृत करत आहात त्याबद्दल आपले शतश आभार 🙏
आपण घडवलेल्या आपल्या असंख्य शिष्यवृंदा मार्फत मलाही भगवद्गीता गीता समजुन घ्यायची संधी मिळाली.
माधवी गोपी माताजी आणि माधव हरी प्रभुजी यांच्या मार्गदर्शना खाली ठाणे हाईड पार्क येथील गणपती मंदिर मधे होत असलेल्या कार्यक्रमामध्ये सहभागी होता आले आहे.माझ्या जीवन मधे खूप सकारात्मकता आली आहे.मनशांती होत आहे.
मी सध्या रोज ५ माला महामंत्राचा जप करत आहे.
आपणास उत्तम निरोगी आरोग्य आणि सुख शांती लाभो.आपल्या सर्व इच्छा पूर्ण होवोत अशी सदिच्छा करते आहे त्याचा स्वीकार करावा.

**आपले कृपाभिलाषी**
**भक्तीन सौ वर्षा दिलीप कुलकर्णी**
**ठाणे हाइड पार्क**

हरे कृष्ण, श्रील प्रभुपदजी, गुरुमहाराज आणि सर्व वैष्णवांना माझा सादर दंडवत प्रणाम, माझ्या गुरुममहाजबद्दल बोलण्याची माझी एवढी योग्यता. नाही. महाराजांचे प्रथम दर्शन मला वृंदावन येथे माझी दिक्षा होण्याच्या आधी 2021 साली वृंदावन येथे झाली . महाराजांना पहाताच मझ्या डोळ्यात अश्रूच येऊ लागले, मी महाराजांना आमच्याकडून चांगली भक्ती आणि सेवा करून घ्या. त्यांची आम्हा भक्तांवर खूप असीम कृपा आहे

महाराज आमच्यासारख्या बध्द जीवांसाठी खूप महान कार्य करत आहेत. गेल्या 6 वर्षापासून निरंतर zoom japa talk महाराजांनी आम्हा भक्तांसाठी चालू केले आहे, ज्यामध्ये महाराज स्वतः 2 ते 3 हजार भक्तांसोबत सकाळी 5 वाजल्यापासून जप करीत असतात त्यानंतर. कधी महाराज स्वतः, तर कधी त्यांचे अनुयायी झूम द्वारे प्रवचन देत असतात, याचा आम्हा सर्वांना खूप छान लाभ होत असतो. भक्तांसाठी महाराज किती कष्ट घेत असतात याची प्रचिती येते. प्रभुपादजींनी महाराजांना बैलगाडीतून पायी यात्रा गावोगावी काढायला सांगितल्या, ती सेवा अविरतपणे खंड न पडता अविरतपणे महाराजांनी चालू ठेवली आहे. महाराजांची अनेक पुस्तके प्रकाशित झाली आहेत. महाराजांचे भुवैकुंठ पंढरपूर हे स्वप्न आहे, त्यासाठी ते अविरतपणे कष्ट घेत आहेत. आपल्या भक्तांची गुरुमहाराज सदैव काळजी करत असतात याची मला पदोपदी जाणीव होत असते. अशा या माझ्या गुरुमहराजना माझे कोटी कोटी प्रणाम.

हरेकृष्ण

**श्रीमती लक्ष्मीप्रिया देवीदासी**
**ठाणे भक्ती वृक्ष sarita kambli**

**Goldenpark, D Wing,**
**Flat no. 1205, Muktainagar**
**Thane (W).**

नमः ओं विष्णू पदाय कृष्ण प्रिष्ठाय भूतले श्रीमते लोकनाथ स्वामिन् इति नामिने ।
हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे। हरे राम हरे राम राम राम हरे हरे।।
परम् पूज्य लोकनाथ स्वामी गुरु महाराजांच्या चरणी कोटी कोटी दंडवत प्रणाम, पंचांग प्रणाम.
प्रिय गुरु महाराज, आपल्याला व्यास पूजेच्या खूप खूप शुभेच्छा. खर तर आपल्याला शुभेच्छा देण्याची माझी लायकी नाही, परंतु तुमची शिष्या आणि मुलगी या नात्याने तुम्हाला खूप खूप शुभेच्छा आणि प्रेम देते.
तुमचे जपा talk रोज नाही परंतु नेहेमी ऐकते, सकाळी नाही जमल्यास, नंतर घरातली कामे करता करता युट्यूब वरून नक्की ऐकते. तुमची कृपा आहे म्हणून थोडे थोडे संस्कृत शब्द पण आणि त्याच्या मागचा अर्थ पण समजतो आहे, त्याचा उपयोग मुलाचा शाळेचा अभ्यास घ्यायला पण होतो आहे. मुलांसोबत त्याच्या मित्रांना सुद्धा समजावता येत आहे, ही सगळी तुमचीच कृपा आहे.
तुमचे किर्तन ऐकत ऐकत भगवत धामात असल्याचा अनुभव येतो, भगवद धामात सुद्धा असेच किर्तन रोज चालत असेल.
तुमच्या कृपेने सासूबाई, नवरा आणि मुलाला घेऊन पंढरपूरच्या विठोबा चे दर्शन झाले, त्यांच्याकडून अजून काही नाही झाले तरी चालेल, असे वाटते, कारण त्यांनी माझ्या सांगण्यावरून विठोबाच्या दर्शनाला तयार झाले आणि आयुष्यात एकदा तरी विठ्ठलाच्या चरणांवर आपले मस्तक ठेवले, आता पुढचे विठोबा आणि आपण बघून घ्याल.
16 माळा जप आणि 4 नियमांचे पालन, भगवंतांसाठी आणि तुमच्या साठी भोग लावून प्रसाद घेणे आणि तुमचे आणि श्रील प्रभुपाद यांच्या पुस्तकांचे वाचन, एवढेच माझ्याकडून तुमच्या कृपेने होत आहे. या पलीकडे मुलाला आणि त्याच्या मित्रांना थोडा फार प्रचार झाला तर होतो आहे, तुम्ही नाव दिल्या प्रणामे तुळशी मातेची सेवा होत आहे. ही सगळी तुमचीच कृपा आहे.
तुमची कृपा दृष्टी नेहेमी अशीच राहू द्या.
भक्ती मध्ये दृढता यावी आणि शास्त्र यांच्या मार्गाने भगवंतांना जाणून इतरांना सुद्धा या मार्गावर आणता यावे या साठी तुमच्या चरणी प्रार्थना करते.
आपल्या व्यासपूजे निमित्त आपणास दीर्घायुष्य लाभो आणि आपली आणि आपल्या माध्यमातून भगवंतांची किर्ती सर्वत्र प्रसारित होवो ही प्रार्थना.
आपली सेविका **तुळशी सेविनी देवी दासी** **(Thane)**

ॐ विष्णुपादाय कृष्णश्रेष्ठ्य भुतले। श्रीमने लोकनाथ स्वामी इनिनामिते ।। ऊ अज्ञान तिमिरान्ध्य नानाजनशलाक्या चक्शुर्मीलिन येन तस्मै श्रीगुरवे नमः ।॥

परमपुज्य गुरुदेव,

प्रातस्मरणीय गुरुदेव आपल्या चरणी कांचन माताजीचा कोटी कोटी दंडवन प्रणाम🙏

माजा जन्म अज्ञानमय अंधकारात झाला होता मला मी कोण आहे ? भगवंत कोण आहेत भक्ती काय आहे , यांचे मला मान मुळीच ज्ञान नव्हते परंतु आपल्या भगवंताच्या कृपेने इस्कॉन मधील सहभागी होण्याची संधी मिळाली. त्यामध्ये आमच्या शिक्षा गुरुचे मार्गदर्शन लाभले .त्यांच्या मुखातून आपली महती ऐकण्याची संधी मिळाली. आपल्या सारखे थोर भक्त माझी गुरु होण्याचे भाग्य मला लाभले.
तुमचा मुळे मला पूर्णजीवनच मिलाले आहे. त्याबद्दल मी खूप आभारी तर आहेच पण जे तुमचे माझ्या वरचे ऋण आहे ते मी किती ही तर आहेच पण हे तुमचे माझ्यावरचे कितीही जन्म घेतले तरी त्यातून उताराई होऊ शकत नाही -
गुरुमहाराज मी आपल्या चरणी कृपेची याचना करित आहे🙏 आणी माझ्या हृदयान आपले आणी भगवंताचे चरणाचे सदैव स्मरण राहू दे. माझ्या मध्ये असलेले अनर्थ निघुन जाऊ दे.
लोकनाथ स्वामी महाराज की जय श्री प्रभुपाद की जय🙏
आपली **कृपाभिलाषी कांचन माताजी (कोमलांगी सीतादेवी दासी ) - तासगांव**

नमः ओम विष्णुपादाय कृष्णप्रेष्ठाय भुतले !
श्रीमते लोकनाथस्वामीन् इति नामिने !!

हरे कृष्ण
प्रिय गुरुदेव ,
कृपया आपल्या चरणी माझे सादर प्रणाम स्विकार करा. आपण प्रभुपाद आणि भगवान श्रीकृष्णाच्या आदेशाचे पालन करुन पतित जिंवाचा उद्धार करत आहे भक्ती मार्गाने आणि लोकांमध्ये भंगवताप्रति प्रत्येकाच्या हृदयामध्ये प्रेम आणि भक्ती जागृत करत आहात आणि जगातल्या सर्व लोकांना प्रेम, भक्ती, दया, करुणा आणि भंगवताप्रति समर्पण व्हायला शिकवत आहात आणि प्रेरणा देत आहात .
गुरुरुपे कृष्ण कृपा करेन भक्तगणे !!
प्रिय गुरुदेव आम्ही आपल्या रुपातच भगवान श्रीकृष्णचे दर्शन करतो आणि आपण प्रत्येक पतित जिवांचे उध्दार करत आहात
आपल्या या व्यासपुजेच्या शुभ प्रसंगी आपल्या चरण कमळाशी माझे सादर प्रणाम आणि मी आपले प्रेमपुर्वक, मनःपूर्वक आणि हृदयपुर्वक आपल आभार मानतो.
आपण श्रीलप्रभुपादच्या ध्येयाप्रति आपले अटळ प्रेम आणि समर्पण आपल निर्मळ मनाने गायले जाणारे किर्तन हे प्रत्येकाच्या हृदयामध्ये आपल्याप्रति भंगवताप्रति आणि श्रीलप्रभुपादप्रती प्रेम आणि भक्ती जागृत करते आणि आपले हे मंत्रमुग्ध किर्तन हे दर्शवत आहे की आपल भक्ताप्रति, भंगवताप्रति आपले शुध्द प्रेम आहे आणि आपले मधुर मधुर किर्तन प्रत्येकाच्या हृदयामध्ये भक्तीभाव आणि प्रेम जागृत करत आहे.
प्रिय गुरुदेव आपल्या व्याख्यानामधुन आणि ग्रंथामधुन मला भक्तावर आणि भंगवतावर आणि जिवजंतुवर प्रेम कसे करावे हे शिकायला मिळाले आपला साधेपणा दया करुणा प्रितीपुर्वक प्रेम आणि आपला विनम्र भाव आध्यात्मिक अंतदृष्टीने खरा वैष्णव कसा जगतो आणि भंगवताची, भक्ताची आणि आचार्याची सेवा करतो याची मला आठवण करून देते.
प्रिय गुरुदेव मी आपल्या आशिर्वादाने आणि कृपेने सत्य आणि धर्माच्या मार्गावर चालण्याची प्रेरणा मिळाली .
प्रिय गुरुदेव मी आपल्या आरोग्यासाठी भंगवतचरणी प्रार्थना करतो आपले आरोग्य स्वस्थ राहो. आणि असेच आम्हाला आपण सर्वांना मार्गदर्शन करत रहाल.
प्रिय गुरुदेव मला आपल्या ध्येयाची प्रामाणिकपणे सेवा करण्याची आणि आपल्या सुचनांचे पालण करण्याची क्षमता द्या.

हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे !
हरे राम हरे राम राम राम हरे हरे !!

**आपला कृपाभिलाषी**

हरे कृष्ण माझे प्रिय गुरु महाराज
कृपया माझे विनम्र अभिवादन तुमच्या कमळ चरणाशी स्वीकार करा.
नम ॐ विष्णुपादाय कृष्णप्रेष्ठाय भूतले श्रीमते लोकनाथ स्वामी इति नामीने.
गुरु महाराज तुमच्या ७६ व्या व्यासपूजेबद्दल तुम्हाला मनपूर्वक शुभेच्छा . गुरुमहाराज माझी पात्रता तर नाही पण कृष्ण बंधू मुळे मला तुमच गौरव करायला मिळतय ते भाग्य मला तुमच्यामुळेच लाभलय. गुरु महाराज तुमच्याकृपेमुळे मी कृष्ण बंधू शी तर जुळली आणि त्यांच्याकृपेने मला पंढरपूर धाम यायला मिळाल श्री श्री राधा पंढरीनाथ तुमच संग सानिध्य प्राप्त झाल. गुरु महाराज जस विठ्ठल माऊली आहे तसच तुम्ही पण माऊली आहात. तुम्ही पंढरपूर धाम ला असले की वाटत तुम्ही जवळ आहात कारण तुम्ही पंढरपूर ला माहेर अस नेहमी मनत असता. गुरु महाराज तुमच्या मध्ये जस सहनशील, नम्रता, प्रेम भाव सर्वांप्रती आहे आणि साधेपणा कधीतरी मी तुमचे गुण माझ्यात आत्मसात करायला हवे.गुरु महाराज ज्याप्रमाणे तुम्ही तुमच्या गुरु ला समर्पित होऊन त्यांनी सांगितलेल प्रत्तेक कार्य पूर्ण निष्ठेने करताय. मी थोडी तरी सेवा माझ्या गुरु च्या आनंदासाठी करावं. मी तुमच्या कृपेची याचना करते गुरु महाराज मी बुक डिस्ट्रीब्यूशन सेवा प्रिचिंग सेवा करण्यास समर्थ व्हावी तुमची कृपा असुद्या. आणि श्रीला प्रभुपाद, गौरांग महाप्रभु च्या मोहीम मधे छोटीशी सेवा देऊ शकेल माझ पूर्ण आयुष्य इस्कॉन च्या सेवेत जाव . गुरु महाराज माझा मुलगा यथार्थ आजारी आहे तो बरं असताना मॉर्निंग जपा आणि जपा टॉक रोज ऐकायचं मी तुम्हाला एकदा प्रार्थना केली त्याला माझ्यासोबत उठून बसून माल करू द्या आणि खरच तो उठला गुरु महाराज त्याच्यावर तुमची कृपादृष्टी असावी अस मनात होत तर २ दा झूम जपा मधे झाली आणि पंढरपूर धाम मध्ये सुद्धा मी मनापासून आभारी आहे . माझ्या मुलाला पण मला कृष्णभावनामृत मधे कार्यरत करायचं आहे. गुरु महाराज खूप खूप आभारी आहे मी तुमच्या कृपेने मला श्रीला प्रभुपाद, गौरांगमहाप्रभु आणि इस्कॉन मिळाल. गुरुमहाराज माझ्यावर तुमची कृपादृष्टी कायम असुद्या हीच तुमच्या चरणी विनंती करते. एचजी रत्नावली गोपी दासी माताजी आणि सुंदर वामन प्रभुजी यांच्यासारखे शिक्षा गुरु लाभले जे निरंतर तुमच्या प्रसन्न तेसाठी कार्यरत असतात. गुरुमहाराज तुम्ही नेहमी उदाहरण देतात आई वडील लेकराना कधी विसरत नाही. तुम्ही पण मला तुमची लेक मनुन स्वीकार करा. गुरुमहाराज तुम्ही दररोज न चुकता तुमच्या सर्व शिष्यांना तुमच संग सानिध्यात देताय. श्री श्री राधामाधव श्री पंचतत्व च्या चरणी प्रार्थना करते की तुम्हाला छान आरोग्य लाभू दे . आणि श्री श्री राधा पंढरीनाथ आणि नागपूर च लोटस टेम्पल च कार्य सुरळीत लवकरात लवकर पार पडू द्या.. हरी बोल ... माझी काही चूक झाली असेल तर माफ करा.
हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे हरे राम हरे राम राम राम हरे हरे

आपली सेविका
**भक्तीन प्रणाली ठाकरे**
**नागपूर महाराष्ट्र**
**कृष्ण बंधू**

हरे कृष्ण
परम पूज्य लोकनाथ स्वामी महाराज की जय
गुरू म्हणजे ज्ञानाचा झरा , प्रेरणेचा स्त्रोत, अंधकरात प्रकाश दाखवणारा दीप. अशेच माझे गुरू महाराज कृपेचा सागर जणू ,गुरू महाराजांबद्दल बोलावे तेवढे कमीच ,रोज सकाळी जप सत्र घेणे , प्रत्येक मंदिरात भेट देणे आणि सर्व भक्तांना मार्गदर्शन करणे, श्रीला प्रभुपादांच्या शिकवणी पालन ,प्रतेकांविष्यी करुणा,दया , समत्वाची भावना या सर्वच गोष्टींचे महाराज सदैव पालन करतात .
त्यांचे सुमधुर कीर्तन ऐकून नेहमी त्यात तल्लीन राहावे वाटते ,कथा आणि प्रवचने जणू ज्ञानाचा भांडार ,अगदी सोप्या समजेल आश्या भाषेत सर्व काही समजावणे यात महाराज निपुण
आज मी बोलेल तेवढे कमीच आहे
आश्य महान वैष्णव गुरूंना माझे कोटी कोटी दंडवत **भक्त जय पदमन -(नातेपुते**)

*हरे कृष्ण दंडवत प्रणाम*

*परमपूज्य गुरुदेव लोकनाथ स्वामी महाराज यांना ७६ वे व्यासपूजा निमित्त हार्दिक शुभेच्छा व कोटी कोटी दंडवत प्रणाम*

*१) गुरु महाराज, आपण वयाच्या ७६ वे वर्षे देखील कृष्णभावनेचा प्रचार करत प्रत्येक दिवस प्रयत्नांची पराकाष्टा करत आहात व इस्कॉन संस्थापक आचार्य श्रील प्रभुपाद यांच्या चेहऱ्यावरील स्मित हास्य कायम ठेवण्यासाठी कृष्णभावनेचा प्रचार प्रत्येका पर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न करत आहात आपले प्रचार कार्या साठी 'प्रयत्न' एखाद्या तरुणाला देखील लाजवणारे आहेत.*

*२) गुरु महाराज, आपल्यातील "करुणा" प्रत्येक बद्ध जीवाला जन्म मृत्यूच्या चक्रातून सोडवण्यासाठी आपल्या प्रयत्नातून निदर्शनास येत आहे.*
*प्रत्येक क्षणाचा कृष्णभावने मध्ये कसा उपयोग करावा हे आपल्या कृती मधून "अव्यर्थ कालत्वम्" या तत्त्वाचे दर्शन घडत आहे.*

*३) गुरु महाराज, इस्कॉन संस्थापक आचार्य श्रील प्रभुपाद यांनी आपल्याबद्दल काढलेले उद्गार जसे १)आपले कार्य संत तुकाराम महाराज यांच्या प्रमाणे आहे. २)आपण पहिल्यापासूनच संन्यासी आहात. ३) तुमच्यासारख्या आणखी भारतीय शिष्यांची मला गरज आहे हे उद्गार आपण आपल्या कृतीने सिद्ध केलेले आहेत.*

*४) गुरु महाराज, संपूर्ण विश्वातील इस्कॉन जगत बैलगाडी पदयात्रा पाहिल्यानंतर आपलीच आठवण काढते. त्याचप्रमाणे जेथे कोठेही हरे कृष्ण महामंत्राचे संकीर्तन चालू असते तेव्हा "किर्तन सम्राट" म्हणून आपलीच आठवण काढते.*
*पंढरपूर येथील "श्रील प्रभुपाद घाट" व विठ्ठल भक्ती विशेषता "माझे माहेर पंढरी" हा अभंग आपण संपूर्ण विश्वात प्रसिद्ध केला आहे. आपल्या हृदयातील "भूवैकुंठ पंढरपूर" हा प्रकल्प संपूर्ण विश्वाला विठ्ठल भक्तीने प्रकाशित करेल यासाठी आपण करत असलेले प्रयत्न हे सदैव सर्वांना प्रेरणा देणारे आहेत.*

*५) गुरुमहाराज आम्ही अत्यंत भाग्यवान आहोत की आम्हाला आपल्यासारखे दीक्षा गुरु महाराज प्राप्त झाले आहेत भगवंत आपल्याला चांगले आरोग्य प्रदान करोत हीच भगवंतांच्या चरणी प्रार्थना!*
*गुरुदेव आम्हाला आपल्या कृपा आशीर्वादाची अत्यंत गरज आहे त्यामुळेच आम्ही भक्तीत टिकून राहून काही सेवा करण्याचा प्रयत्न करू शकतो.*
*पुन्हा एकदा आपणास ७६ वे व्यासपूजा निमित्त कृष्णमयी शुभेच्छा!*

*आपला सेवक*
***वंशीवदन ठाकूर दास***

हरे कृष्ण,
नमः ॐ विष्णुपादाय कृष्णप्रेष्ठाय भूतले श्रीमते लोकनाथ स्वामीन् इति नामिने।।
प.पु.गुरूमहाराजांना 76 व्या व्यास पूजेच्या खूप खूप कृष्णभावनाभावित हार्दिक शुभेच्छा.
खरे तर गुरू महाराजांविषयी कितीही लिहिले आणि बोलले तरी ते कमीच आहे .प्रेमाच्या अथांग सागराने व्याप्त करुणामयी विशाल हृदयी असे माझे गुरु महाराज आहेत. माझ्यासारख्या पामराला ह्या अलौकिक सागराचा संग लाभून भौतिक जीवनाचा हा भवसागर पार करून जाण्याचे भाग्य मला माझ्या गुरु महाराजांमुळे लाभले आहे .माझे गुरु महाराज भगवंतांच्या मुकुटातील पारसमणी आहेत .त्यांचा ह्या भूतलावर येण्याचा उद्देश फक्त माझ्यासारख्या पामरांना हा भवसागर तरुन जाण्याचे मार्गदर्शन करणे हाच आहे. यापेक्षा मोठे भाग्य माझ्या दृष्टीने दुसरे काय असू शकेल?
संत तुकाराम महाराज गुरूंची महिमा वर्णन करताना म्हणतात
गुरुचरणी ठेविता भाव। आपोआप भेटे देव ।
म्हणूनी गुरुसी भजावे। रूप ध्यानाशी आणावे ।
देव गुरूपाशी आहे। वारंवार सांगू पाहे।
तुका म्हणे गुरु भजनी। देव आहे जनीवनी।।
जर आपण आपल्या मनात गुरुदेवांच्या चरणी भक्तीभाव ठेवला, तर आपोआपच आपल्याला भगवंतांचे दर्शन मिळेल, भगवंतांचा अनुभव येईल. गुरुदेवांच्या चरणी भाव ठेवून, आपण त्यांच्या मार्गदर्शनाचे पालन केले, तर ते आपल्याला भगवंतांपर्यंत पोहोचवतील.आपल्या मनात गुरुदेवांबद्दल भक्ती आणि श्रद्धा असावी.
अशीच दृढ श्रद्धा महाराजांच्या हृदयात त्यांच्या गुरु महाराजांबद्दल म्हणजेच श्रील प्रभूपादांबद्दल आहे. म्हणूनच श्रील प्रभुपादांच्या आज्ञेने गुरु महाराज जगाच्या कानाकोपऱ्यात बैलगाडी द्वारे हरिनामाचा अखंड प्रचार प्रसार कित्येक वर्षापासून करत आहेत. गुरु महाराज श्रील प्रभूपादांच्या व चैतन्य महाप्रभूंच्या सर्व उपदेशांचे व आज्ञांचे पालन आपल्या कृतीतून पूर्णपणे तंतोतंत करीत आहेत.
बोले तैसा चाले, त्याची वंदावी पाऊले।
या ऊक्ती प्रमाणे महाराजांचे संपूर्ण जीवन भरलेले आहे. आपल्या शिष्यांवर व आपल्या गुरुबंधूंच्या शिष्यांवर मायेच्या भावनेने प्रेम करणारे गुरु महाराज ब्रह्म मुहूर्तावर सर्व भक्तांना जप करण्यास प्रेरित करतात व स्वतःही भक्तांबरोबर जप करतात .भक्तांच्या अनेक प्रश्नांची उत्तरे जपा सेशन मधुन दिली जातात .म्हणून इस्कॉन परिवारात महाराजांनी आपले एक वेगळे स्थान निर्माण केले आहे.
प.पु. महाराजांचे कीर्तन म्हणजे स्वर्गीय आवाजाची व आनंदाची अनुभूती आहे. म्हणूनच श्रील प्रभुपाद महाराजांना इस्कॉन चे संत तुकाराम महाराज म्हणतात. आपल्या कीर्तनाने लाखो भक्तांना हरिनामाचे वेड लावणारे व हरिनामाच्या कीर्तनात आनंदाने चिंब होऊन नाचायला लावणारे गुरु महाराज म्हणजे परमेश्वराची एक महान देणगी आहे .भगवत प्रेमाच्या अथांग सागरात गुरु महाराज भक्तांना न्हाऊ घालतात. भौतिक सुखदुःख विसरून महाराजांच्या कीर्तनात भक्त तल्लीन होतात व आध्यात्मिक प्रेमाची अनुभूती प्राप्त करून घेतात .मागुरु महाराज अतिशय करुणामयी व विशाल हृदयी आहेत .रणरणत्या उन्हात वाळवंटात फिरताना कुठेतरी पाण्याचा छोटासा झरा दिसावा त्याप्रमाणे या तप्त भौतिक जीवनात प्रवास करताना अध्यात्मिक प्रेमाचा अथांग सागर मिळावा अशीच अवस्था माझी झाली आहे.
आजच्या या शुभ दिनी मी श्री श्री राधा मदन गोपाल जी, श्री गौर निताई, श्री श्री विठ्ठल रुक्मिणी, श्रील प्रभुपाद व सर्व गुरुपरंपरेच्या चरणी

हरे कृष्ण दंडवत प्रणाम

परमपूज्य गुरुमहाराज आपणास व्यासपूजा निमित्त शुभेच्छा व कोटी कोटी दंडवत प्रणाम!

१)मला आपल्यासारखे गुरु महाराज मिळाल्यामुळे मी रिटायरमेंट नंतर इस्कॉनला जोडल्या गेलो त्यामुळे प्रोत्साहित होऊन मी पंढरपूरचे पायी चालत पाच वाऱ्या पूर्ण केल्यात आता माझे वय किती ८० आहे मला जास्त स्मरण होत नाही परंतु मी दररोज न चुकता जपा सेशन व जपाटॉक मध्ये उपस्थित राहतो त्यामुळे माझी रोजची साधना आपल्यामुळे व्यवस्थित होत आहे त्यामुळे मी आपला ऋणी आहे आभारी आहे .

२) मी रिटायरमेंट नंतर नाशिक रोड येथील भक्तांच्या संपर्कात आलो त्यामुळे मला जीवनाचा उद्देश समजला व त्यामुळे मी सध्या दररोज भगवद् गीता व श्रीमद् भागवत या ग्रंथांच्या अध्ययन करत माझे उर्वरित आयुष्यात भक्ती करण्याचा प्रयत्न करत आहे मला आपल्या आशीर्वादाची गरज आहे व आपल्या प्रेरणेनेच मी वयाच्या ८० वर्षात देखील चांगले आरोग्य ठेवून दररोज अध्ययन करत आहे.

३) माझ्या पत्नीचे पाच वर्षांपूर्वी निधन झाले त्यामुळे मी एकाकी झालो होतो परंतु आपल्या कृपा आशीर्वादाने मला भक्तांचा संग व दररोज झूम जपा मध्ये आपला संग प्राप्त होत आहे त्यामुळे मला एकाकीपणा कधीही वाटला नाही व मी माझ्या मानवी जीवनाच्या उद्दिष्टा करता आता उर्वरित आयुष्य हरे कृष्ण महामंत्राची साधना व शास्त्र अध्ययन करत आहे.
आपणास पुन्हा एकदा व्यासपूजेचे निमित्त शुभेच्छा!

**दीक्षित नाव : सारथी कृष्ण दास**
**भौतिक नाव : (श्रीमान संतोष सुजगुरे)**
**नासिक रोड**



# मराठी

. मी कृष्णकृपामूर्ती श्रीमद् प.पू. लोकनाथ स्वामी गुरु महाराजांना सादर नमस्कार करतो, जे भगवान श्रीकृष्णांचे अत्यंत प्रिय आहेत, कारण त्यांनी त्यांच्या चरणकमळांचा आश्रय घेतला आहे. माझा जन्म अज्ञान अंधकारात झाला होता परंतु माझ्या आध्यात्मिक गुरूंनी प्रकाशमय ज्ञानाने मला दृष्टी प्रदान केली आहे. मी त्यांना सादर प्रणाम करतो.

. गुरु महाराजांच्या कृपेनेच आपण भौतिक महासागराला पार करू शकतो. तथापि, श्रीकृष्णांचीही प्राप्ती करू शकतो.

. श्रीलं प्रभुपाद नेहमी सांगत असतात की, अनेकदा मुलांमध्ये वडिलांचे गुण दिसून येतात. हीच गोष्ट श्रील प्रभुपादांचे शिष्य असलेले गुरु महाराज यांना खरी ठरते. श्रील प्रभुपाद त्यांचे अध्यात्मिक वडील होते आणि ते त्यांचे पुत्र होते. यास्तव, त्यांच्यात देखील श्रील प्रभुपादांसारखेच गुण दिसून येतात.

. गुरूंच्या वचनांप्रति निष्ठा, हरिनामात रुची, वैष्णवांची सेवा, बद्ध जीवांप्रती करुणा, प्रचार करण्यासाठी प्रचंड उत्साह.... इत्यादी आणि काही बाबतीत गुरु महाराज आपल्या पित्यास्वरूप श्रील प्रभुपादांच्याही पुढे निघून गेलेत, जे पाहून श्रील प्रभुपादांना निश्चितच प्रसन्नता होत असेल.

. गुरु महाराजांचा विचार करता मी अनेकदा आश्चर्यचकित होत असतो की, श्रील प्रभुपादांनी अशी कोणती जादू केली की, गुरु महाराजांनी आपले सर्वस्व त्यांच्या सेवेत समर्पित केले.

. श्रील प्रभुपाद आणि त्यांच्या आंदोलनाप्रति गुरु महाराजांची वचनबद्धता आणि कृतज्ञता, आपले सर्व शिष्य तसेच जनसामान्यांप्रती एक आदर्श भक्ताची छबी प्रस्तुत करून श्रील प्रभूपादांची केलेली सेवा, तसेच या जगातील बद्ध जीवांना कृष्णभावनामृत देण्यासाठी आपल्या गुरूंना मदत करण्याचा संकल्प, ही त्यांची महान कार्य म्हणजे आपल्या सर्व शिष्यांसाठी प्रेरणा आहे. जोपर्यंत भक्त पूर्णपणे दास दासानुदास भावनेत नसेल तोपर्यंत तो अशा प्रकारे समर्पित होऊन कार्य करू शकत नाही.

. प.पू. लोकनाथ स्वामी गुरु महाराज उत्तम कोटीचे असे पुत्र आहेत, ज्यांनी आपले शाश्वत पिता श्रील प्रभूपादांचा गौरव संपूर्ण विश्वामध्ये पसरविला आहेत. श्री चैतन्य चरित्रामृतात सांगितले आहे की, भगवंतांची शक्ती प्राप्त झाल्याविना कोणीही दुसऱ्याचे हृदय परिवर्तन करू शकत नाही. श्री प्रभूपादांनी तीच शक्ती प्राप्त करून लाखो लोकांचे हृदय परिवर्तन केले आणि हीच परंपरा पुढे नेत गुरु महाराज हेच कार्य करत आहेत. गुरु महाराज नेहमी सांगतात की, माझ्या गुरूंनी मला गोलोकातील धन "हरिनाम संकीर्तन" प्रदान करून धनवान बनविले आहेत. या धनाविना या भौतिक जगातील कोणतेही धन आपणास धनवान बनू शकत नाहीत. या धनाविना असलेले लोक आध्यात्मिक दृष्टीने निर्धन असतात. अशा प्रकारे गुरु महाराजांनी आपल्या सर्वांना धनवान बनविण्याची परंपरा पुढे चालविली आहेत.

. माझे सौभाग्य आहे की, मला श्री चैतन्य महाप्रभू आणि श्रील प्रभूपादांच्या सेवेतील गुरु महाराजांसारख्या महान योद्धांचा शिष्य बनण्याची संधी प्राप्ती झाली व ज्यामुळे मला त्यांचा संग प्राप्त झाला आहे व त्यांच्या अद्भुत जीवन कार्यांनी मी प्रेरित झालो आहेत. गुरु महाराजांच्याप्रति हीच प्रार्थना आहे की, त्यांच्या दिव्य वैष्णव गुणांचा एक अंश मला प्राप्त व्हावा जेणेकरून त्यांच्या प्रेरणेची ही परंपरा पुढे नेता येईल आणि माझे जीवन इतरांच्या परम कल्याणाकरिता सार्थकी करता येईल.

. प.पू. लोकनाथ स्वामी गुरु महाराज की जय,

.श्रील प्रभुपाद की जय,

.अनंत कोटी वैष्णवृंद की जय.🙏 **Srinath Pandit Das (Nashik)**

---

हरे कृष्ण दंडवत प्रणाम गुरु महाराज जी मी इस्कॉन च्या संपर्क 2012 साली आलो त्यानंतर 2013 मध्ये नाशिक ला कुंभमेळा होता त्यामध्ये आपला इस्कॉन मंदिराचा पेंडल पण होता तेव्हा नाशिक ला कुंभहरे कृष्ण दंडवत प्रणाम गुरु महाराज जी मी इस्कॉन च्या संपर्क 2012 साली आलो त्यानंतर 2013 मध्ये नाशिक ला कुंभमेळा होता त्यामध्ये आपला इस्कॉन मंदिराचा पेंडल पण होता तेव्हा नाशिक ला कुंभ मधे परमपूज्य लोकनाथ स्वामी गुरु महाराज आले होते तेवहा मला त्यांच्यकडुन प्रेरणा मिली तेवहा पासुन मी गुरु महाराज यांचे यू ट्यूब ला भगवतम् संकीर्तन. एकायला लागो तसे मला अजुन प्रेरणा मिलत गेली नतर मी आमच्या येथिल मंदिरात जान्यास सुरुवत केली त्या नंतर मी गुरु महाराज यानापले गुरु कर्ण्याचे निर्णय केला आणि श्री श्री राधा दामोदर नाशिक इस्कों च्य ा सर्व प्रभुजी यांचे आशीर्वादाने माझी दीक्षा हि जुलै १६, २०२४ रोजी वृंदावन येथे परमपूज्य लोकनाथ स्वामी गुरु महाराज यांचे कडूं वृंदावन येथे परमपूज्य लोकनाथ स्वामी गुरु महाराज यांचे कडूं न मिलाली हे माझे भाग्यच. असेच आशीर्वाद प्राप्त झाले हरे कृष्ण परमपूज्य लोकनाथ स्वामी गुरु महाराज की जय असेच सर्व वैष्णवांचा आशीर्वाद माझ्यावर राहो ही प्रार्थना हरे कृष्ण हरे कृष्ण - **उद्धव शाम दास** **Nashik**

नमो ओम विष्णु पादाय कृष्ण कृष्ठाय भूतले
श्रीमते लोकानाथ स्वामी इति नामिने

गुरुमहाराजांना दंडवत प्रणाम

माझ्यासारख्या पतित जीवाला आश्रय दिल्याबद्दल मी तुमची सदैव ऋणी आहे गुरुमहाराज. गुरुमहाराज मी सर्व प्रथम इस्कॉन नाशिक मध्ये तुमच दर्शन घेतल, तुमच प्रवचन ऐकल तेव्हापासून एक वेगळाच संबंध मला वाटू लागला जनू तेव्हाच गुरु शीक्षाच नात निर्माण झाल असाव पण मला ते नंतर समजल. तुमचा अतिशय दयाळू , प्रेमळ स्वभावाने मन नेहमी भारावून येत .

माझ्या आयुष्यातील भौक्तिक अडचणी हळू हळू तुमच्या येण्याने कश्या दूर झाल्या मला समजल पण नाही आणि त्यामुळे मी भक्तीमधे अजून पक्के बनत गेले त्यासाठी मी सदैव तुमची ऋणी आहे. भगवंतांची भक्ती, त्याच प्रेम, त्यांच्यावरचा विश्वास हळू हळू वाढतोय आणि ते फक्त म्हणजे तुमच्या आर्शिवादाने गुरुमहाराज. जेव्हा पण मी
कीर्तन ऐकते आणि तुम्हाला कीर्तन करताना बगते माझ मन खूप प्रसन्नित आणि एकाग्र होत, भगवद भक्तीचा आनंद मला त्यातून भेटतो. माझी एवढीच प्रार्थना आहे तुमच्या चरणी की मी तुम्हाला प्रचार कार्याला मदत करू शकेल, भगवंतांच्या, प्रभुपार्दाच्या आणि तुमच्या सेवेत प्रामाणिक पणे मग्न राहण्याचा मी प्रयत्न करेल. कळत नकळत माझ्या कडून काही चुका होत असेल तर त्यासाठी मला माफ करा गुरुमहाराज व त्या चुका सुधारण्यासाठी कृपया मला मार्गदर्शन करा .
गुरुमहाराज तुम्हाला उदंड आयुष्य लाभो व तुम्ही नेहमी निरोगी रहावे हीच भगवंतांच्या चरणी प्रार्थना: गुरु महाराज तुमची अशीच कृपा असू दया, हीच तुमच्या चरणी प्रार्थना.

आपली नम्र शिष्या
**नम्रता ठाकरे, नासिक**

ॐ श्रीगुरुभ्यो नमः।
।।नमः ओम विष्णूपादाय कृष्ण प्रेष्ठाय् भूतले श्रीमते लोकनाथ स्वामी इती नामीने।।

परमपूज्य गुरु महाराज यांच्या चरणी माझे कोटी कोटी दंडवत प्रणाम.

सर्व प्रथम मी महाराज तुम्हाला ७६ व्या व्यास पूजेच्या हार्दिक शुभेच्छा देऊ इच्छितो व त्याचबरोबर मी श्री श्री राधा गोविंदजींच्या व श्रीलप्रभुपाद् यांच्या चरणी प्रार्थना करतो की तुम्हाला उत्तम आरोग्य व दीर्घायु लाभो व आम्हाला तुमचे मार्गदर्शन तुमचे कृपा आशीर्वाद यांचा वर्षाव आमच्यावर अखंड होत राहो.
गुरु महाराज मी भक्ति शास्त्रीचा आभ्यास करताना प्रतेक ग्रंथा मध्ये जेव्हा गुरुची महिमा बद्दल वाचतो तेवा मी स्वताला खूप भाग्यशाली समजतो की माला तुम्ही गुरु रूपात भेटलात. भक्तिरसामृतसिंदू या ग्रंथा मध्ये तर गुरुची खूप महिमा वर्णन केल आहे.
तुकाराम महाराज म्हणतात :
"वेदपाठीला वैकुंठ न दिसे
गुरु भेटल्यावरी बोधा ये तोऽसे
अज्ञान झडले ना उरे संशय
पांडित्य मिरवू नका॥"
“तुकाराम महाराज सांगतात की, पांडित्य किंवा वेदांचे वाचन हे आत्मबोधासाठी पुरेसे नाही. खरा बोध गुरुच्या सान्निध्यात आणि कृपेमुळेच होतो. गुरुच आपल्या अज्ञानाचा नाश करून, शुद्ध श्रद्धा आणि समजुतीची अनुभूती देतो.”

हे गुरुदेव, आपल्यामुळे आम्हाला बोध झाला आहे की, ग्रंथ वाचनाने, आपली कृपा, आपलं सान्निध्य, आणि आपली आज्ञा पाळल्यानेच खरे आध्यात्मिक जीवन सुरू होते.
"गुरु बिनं गती नाही
गुरु बिनं त्राता नाही
गुरुचि शक्ती, गुरुचि भक्ती
गुरुचि परमेश्वर ॥"
“या अभंगामध्ये गुरुचं स्थान सर्वश्रेष्ठ म्हणून सांगितलं आहे. भक्त, भक्ती, शक्ती, उद्धार, मोक्ष — हे सर्व गुरुच्या कृपेशिवाय अपूर्ण आहेत. परमेश्वराचे दर्शन होण्यासाठी गुरुच माध्यम आहे.”

संत तुकाराम, नामदेव, एकनाथ, ज्ञानेश्वर ह्यांनी ज्या ‘गुरु तत्वा’ची स्तुती केली आहे, ती आज आम्हाला आपल्यामध्ये अनुभवास येते आहे. आपल्या प्रत्येक वाक्यातून ज्ञानाचा अमृतधारा वाहतो. तुमचं कीर्तन, प्रवचन, जपा टॉक च्या माध्यमातून माजी आध्यात्मिक पुसटी होत आहे. आपण आम्हा शिष्यांच्या अंतरात्म्याला स्पर्श केला आहे. आपल्या प्रभावामुळे, जीवनाचे खरं प्रयोजन कळू लागले आहे — सेवा, समर्पण

हरे कृष्णा दंडवत प्रणाम
परमपूज्य महाराजांचे चरणी दंडवत प्रणाम
महाराजांना 76 व्या व्यासपूजे निमित्त हार्दिक शुभेच्छा.
महाराज खूप प्रेमळ आहेत आमची खूप काळजी घेतात. महाराजांना गुरुकुल आवडते ते गुरुकुल मध्ये भेट देतात. माझी आई बाबा मला गुरुकुल मध्ये राहण्यासाठी सांगतात. गुरु महाराज किर्तन खूप छान करतात मला गुरू महाराजांमुळे कीर्तनाची आवड लागली आहे म्हणून मी कीर्तन करतो माझे आचार्य जगन्नाथ कृपा प्रभुजी मला हार्मोनियम शिकवतात मी कीर्तन करतो सीता माताजी सुद्धा खूप जपायच्या आम्ही मंगला आरतीला जायचो.. महाराज म्हणायचे वेड्या बहिणीची वेडी माया.. गुरु महाराज ही काळजी घेतात .. **भक्त राम ज्ञानेश्वर कासार पाटील पंढरपूर**

नमः ओम विष्णू पादाय कृष्ण प्रेष्ठाय भूतल।
श्रीमते लोकनाथ स्वामीन इति नामीने॥

हरे कृष्ण गुरु महाराज तुमच्या चरण कमळांवरती माझा साष्टांग दंडवत प्रणाम !

गुरु महाराज आपणास 76 व्या व्यास पूजेनिमित्त कृष्ण भावनाभावित शुभेच्छा !

गुरु महाराज तुमच्या कृपा आशिर्वादाने गेली 6 वर्ष मी आंतरराष्ट्रीय कृष्णभावनामृत संघाशी जोडलेलो आहे. मी सुरुवातीला कॉलेजला असताना गोपाळपूर बेसला राहत होतो. तो बेस श्रीमान गोकुळपती प्रभूजी चालवत होते. श्रीमान गोकुळपती प्रभूजी व श्रीमान मुकुंद मुरारी प्रभूजी यांनी मला भक्तीमध्ये टिकून राहण्यासाठी खूप सहकार्य केले. गुरु महाराज मी गोपाळपूर बेस वरती राहत असताना एकदा श्री श्री राधा पंढरीनाथ मंदिरामध्ये
नृसिंह आरती गात होतो त्यावेळेस मला असा साक्षात्कार झालता की माझा नृसिंह भगवंतांशी गाढ संबंध आहे. तसेच गुरु महाराज मला एकदा मुतखडा झालता तेव्हा पण रात्री खूप त्रास झाला होता पण भगवंतांनी मला बुद्धी दिली व मी तुमचे कीर्तन ऐकले व माझा त्रास हळूहळू कमी झाला. त्यावेळेस मला कळून चुकले की गुरुशिवाय आपले या जगात कोणीही नाही.

गुरुमहाराज मी छत्रपती संभाजीनगर मध्ये राहत असताना काही महिने भक्तांच्या संघापासून माझ्या मनाच्या अल्प स्वातंत्र्यामुळे दूर गेलो होतो. त्यावेळेस बाहेर गेल्यानंतर माझ्याकडून पापकर्म झाल्यामुळे मला खूप त्रास झाला. मग नंतर मी भक्तांच्या संघामध्ये आलो. त्यावेळेस माझ्यावरती प्रारब्ध मोठ्या प्रमाणात कोसळले होते व मी पूर्णतः गोंधळलेल्या अवस्थेत होतो. त्यावेळेस मला योग्य निर्णय घेता येत नव्हता. त्या गोंधळलेल्या स्थितीमधून मी भगवंतांच्या कृपेमुळे, गुरु महाराज तुमच्या कृपेमुळे, तेथील भक्तांच्या कृपेमुळे, श्रीमान जीवदया प्रभूजींच्या कृपेमुळे, श्रीमान रामानंद
प्रभूजींच्या कृपेमुळे,श्रीमान मुकुंदमुरारी प्रभूजींच्या कृपेमुळे व श्रीमान कृष्णअनुराग प्रभूजींच्या कृपेमुळे मी त्यातून बाहेर निघालो. त्यावेळेस मला कळून चुकले की हरिनामाचे व भगवंतांच्या भक्ताच्या संघाचे महत्व किती असते ते.

गुरुमहाराज सध्या मी जे एस पी एम व्हॉइस वरती राहून भक्ती करण्याचा प्रयत्न करत आहे. गुरु महाराज माझा युवकांना प्रचार करण्याकडे कल आहे तरी तुम्ही मला त्यासाठी शक्ती व बुद्धी द्यावी. तसेच मला तुमच्याकडून लवकरच दीक्षा घेण्याची इच्छा आहे, त्यासाठी तुम्ही या पतित जीवावरती कृपा करावी तसेच गुरुमहाराज मी आयुष्यभर भक्तांच्या संघामध्ये राहावे यासाठी मला आशीर्वाद द्या व या पतित जीवावरती कृपा राहू द्या.

गुरुमहाराज मी श्री श्री राधापंढरीनाथांकडे प्रार्थना करतो की तुम्हाला चांगले स्वास्थ्य लाभावे.



# मराठी

**श्री लोकनाथ स्वामी महाराजांच्या ७६ व्या व्यासपूजेचा भावपूर्ण शब्दांजली अर्पण**

**जय जय श्रील प्रभुपाद!
जय जय श्रील लोकनाथ स्वामी महाराज!**

हे कृपासिंधु गुरुदेव,

आज आपल्या पावन चरणकमलांच्या ७६ व्या व्यासपूजेच्या या पुण्यप्रद दिवशी, आपल्या लीलामृताचा अमृतघट माझ्या अक्षम हृदयाने अर्पण करतोय. *"आमुचे लोकनाथ"* या ग्रंथाने जशी माझी भक्ती प्रगट केली, तसेच मीही आपल्याला माझं सर्वस्व अर्पण करतो.

**हे कीर्तनाचे महासागर,**
आपल्या मृदु हास्यामध्ये गुरु-वैष्णवांची कृपा प्रकटते.
आपल्या प्रत्येक कीर्तनात गोलोक वृंदावनाची छटा दिसते.
आपल्या प्रवचनांमध्ये श्रीमद्भागवताचा सार समाविष्ट आहे.

**हे वंद्य गुरुदेव,**
आपण मला शिकवलंत:
"एकच ध्येय - श्रीकृष्णची सेवा"
"एकच मंत्र - हरे कृष्ण महामंत्र"
"एकच गती - गुरुदेव आणि वैष्णवांची शरणागती"

माझी विनंती:
*"स्वामीजी! मला आपल्या सेवेचं एक क्षुद्र साधन बनू असा आशीर्वाद असू द्या.
माझं जीवन, मन, वाणी सर्व काही श्रीराधा-कृष्ण आणि गुरुवर्यांच्या चरणसेवेला अर्पण व्हावं!"*

**आपला अत्यंत क्षुद्र सेवक,**
**भक्त सुमित पवार (पंढरपूर)**
**(आपला दास)**

**॥ हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे

नमो ओम विष्णू पदाय कृष्णप्रेसटये भूतले श्रीमते लोकनाथ स्वामी इते नमीने..... परम पूज्य लोकनाथ स्वामी गुरु महाराज आपणास 76व्या व्यास पूजा मोहतस्वा निमित्त हार्दिक शुभेच्छा व्यास पूजे निमित्त दोन शब्द लिहिण्याची बुद्धी दयावी हिच महाराजांच्या चरणी प्रार्थना करते. प्रिय गुरु महाराज तुंम्ही खूप कृपाळू तसेच दयाळू आहात. गुरु महाराज आपणास पहिल्यावर अध्यत्माची जाणीव होते. कृष्ण प्रेमाची जागृती होते. रोज पहाटे झूम च्या माध्यमातून तुमचे दर्शन घडते. हे गुरुदेव आपण करुणासागर आहात आपण आमच्या साठी विष्णू दूत म्हणून आमचा उद्धार करण्यासाठी अवतारीत झाले आहात. या पतित जीवाचा ह्या भव सागरातून उद्धार करावा. अध्यात्मिक प्रगती साठी कृपा प्रदान करावी. आशीर्वाद दयावा.......
आपली. **दासी चिन्मयी रुक्मिणी देवी दासी राहता (गोगलगाव ) (PimpLas)**

परम प्रिय परम पुज्य गुरुमहाराज,,,आपल्या चरणी,,आणि प्रभुपादजीं घ्या चरणी त्रिवार पंचांग प्रणाम,,आपल्याला 76,व्या व्यासपूजेनिमित्त मनापासून फार फार हार्दिक शुभेच्छा,,आपण इस्कौन चे किर्तन सम्राट आहात,,हे प्रत्येक दिवसी सिद्ध करता आहात,,रोज पहाटे जपा सेशन पूर्वी विविध मंदिर मधे मंगल आरती चे गायन,,आरती ओवाळणे,,करुन,जपा सेशन मध्ये हजर तर असतातच,,पण लगेचच मधून मधून पवित्र तिथींना जपाटोक,,लगेच भागवत क्लास,घेऊन,नवीन डिटी स्थापनाचे अभिषेक आरती करुन आपल्या सुमधूर वाणीत किर्तन गायन करता,,,खरंचच आपण किर्तन सम्राट आहात,,.आपण इस्कोन चे कुंभमेळा चे महंत आहात,,प्रयाग राज ला प्रचंड गर्दी असतांना सुद्धा आपण शांतपणे त्रिवेणी संगम ला दंडवत प्रणाम करुन,,जल सेवन करुनच स्नान करुन आपल्या गुरुंना प्रभुपादजींना शांततेत स्नान घातले,,खरंचच आपण महंत आहात,,.आपल्या अध्यक्षतेखाली,,आणि आपल्या कृपेने जगभर पदयात्रेच्या माध्यमातून गावोगावी घरोघरी हरिनामाचा प्रचार,,अनेक पुस्तकांचे वितरण,,अनेकांना प्रसाद वितरण होत आहे,,ब्रज मंडल परिक्रमा,,नवद्विप मंडल परिक्रमा म्हणजे परदेशी भक्त आणि भारतीय भक्त यांच्या मिलनाने होणारा साधू संगतीचा आणिहरिनामाचा,महासागरी जणू,,,तसेच पंढरपूर मध्ये भूवैंकुठ हा भव्य दिव्य महान प्रकल्प म्हणजे आपले स्वप्न पूर्ण करण्यासाठी आपण आम्हांला प्रत्येकाला सेवा करण्याची महान संधी च दिली आहे,,आमच्या सर्वांच्या हातून जास्तीत जास्त सेवा होऊन आपले हे स्वप्न लवकर पूर्ण होवो,,,असी विठ्ठल रुक्मिणी देवीं घ्या चरणी प्रार्थना करते,,आपल्या हातून सतत असीच सेवा घडत राहो,,आणि आपल्याला उत्तम ,निरोगी ,दिर्घ आयुष्य लाभो,,हिच राधा पंढरीनाथ यांच्या चरणी प्रार्थना करते,आणि पूर्ण विराम देते,,हरे कृष्ण,,.....**लिलास्वरुपिनी देवी दासी,,लता कामथें..राधा गिरी धारी मंदिर,भेकराई नगर,हडपसर,पुणे**

!! ॐ अज्ञान ति मिरान्धस्य ज्ञानाजन शलाकया चक्षुरून्मीलित येन तस्मे श्रीगुरवे नमः !!

माझा जन्म अज्ञानमय अंधकारात झाला होता , परंतु माझ्या गुरूंनी मला प्रकाशमय दृष्टी प्रदान केली , मी त्यांना सादर प्रणाम करतो!

परमपूज्य लोकनाथ स्वामी महाराज आपणास 76 व्या व्यास पूजे निमित्त हार्दिक शुभेच्छा !
"गुरु माझी माऊली , आम्हा भक्तांची सावली"
गुरु महाराज आपले हरिकीर्तन पाहून मी थक्क होऊन जातो , आपल्या वाणीतून जे दिव्य स्वर निघतात ते ऐकून आत्मा तृप्त होते . मी निरंतर पुण्यात आपल्या येण्याची आतुरतेने वाट पाहत असतो , आपल्याच कृपेने मला थोडेफार मृदंग वाजवायला यायला लागले . श्री श्री राधा वृंदावन चंद्र मंदिरात भगवंतांच्या प्रसन्नतेसाठी मी मंदिरात मृदुंग सेवा करण्याचा प्रयत्न करतो . तसेच काही इतर लहान सेवा शिकण्याचा प्रयत्न करत आहे .

आपण माझे प्रिय गुरु महाराज आहात. मला आपल्यासारखे प्रेमळ , ज्ञानी , गुणमय गुरू लाभले म्हणून आनंद होत आहे .
गुरु महाराज दरवर्षी तुम्ही भागवत कथा करत असता . तुमच्या भागवत कथा मला फार आवडतात . आपण माझे नाव लक्ष्मण ठेवले आहे . माझे आई वडील दीक्षित आहेत . माझे वय दहा वर्ष आहे . मलाही आपल्याकडूनच दीक्षा हवी आहे माझे हे स्वप्न आहे . तसेच आपला पंढरपूरला प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण होऊन आपली भव्य व्यास पूजा हो अशी श्री राधा पंढरीच्या चरणी प्रार्थना आहे.
आपणास सदैव आरोग्य कृष्ण प्रेम मिळावे.भगवंतांची दिव्यदृष्टी सदैव आपल्यावर राहावी तसेच आपल्या चरण कमळांशी मला दिव्य स्थान मिळावे हीच प्रार्थना आपणास 76 व्या व्यास पूजेच्या आपणास हार्दिक शुभेच्छा !
!परमपूज्य लोकनाथ स्वामी महाराज की जय !
!!श्रील प्रभुपाद की जय !!
!! हरे कृष्णा हरे कृष्णा कृष्णा हरे हरे हरे राम हरे राम राम राम हरे हरे !!

**लक्ष्मण पुरुषोत्तम हिंगे**
**कात्रज ,कोंढवा ,पुणे**





नम ॐ विष्णु-पादाय कृष्ण-प्रष्ठाय भूतल
श्रीमते लोकनाथ-स्वामिन् इति नामिने ।
हरे कृष्णा,
श्रील प्रभुपादांना सर्व गौरव !
परम पूज्य लोकनाथ स्वामी महाराज आपल्या चरण कमळी कोटी कोटी दंडवत प्रणाम !
परम पूज्य गुरू महाराज आपणास ७६ व्या व्यासपूजे निमित्त हार्दिक शुभेच्छा !

श्री श्री राधा पंढरीनाथ तुम्हाला उत्तम आरोग्य आणि आनंद प्रदान करो. भक्तीमध्ये उत्साह न सोडण्यासाठी तुम्ही आम्हाला प्रत्येक वेळी प्रेरणा देता. तुमचे सर्व किर्तन आम्हाला दररोज अधिक ऊर्जा देते विशेषतः गौर पौर्णिमा, कृष्ण जन्माष्टमी इत्यादी खास दिवशी. सुंदर ते ध्यान, गोकुळीच्या सुखा हे अभंग तर खुप आवडतात. तुमचा किर्तन करण्याचा हा उत्साह आम्हाला नेहमी किर्तनाच्या तालावरती नाचण्याचे सुख देतो. आपण तर किर्तन सम्राट आहात त्यामुळे अभक्तही आपल्या किर्तनाचा परम आनंद घेऊन भक्ती मार्गात येतात. आपली ही सेवा गुरू गौरंग यांना नक्कीच खूप आवडत असणार.

रोज सकाळी जपा सेशन असल्यामुळे आम्हालाही आपल्या बरोबर जप करण्याचा लाभ मिळतो. आरवडे मंदिरापासून प्रेरणा घेऊन आता खूप सेंटर सुरू होत आहेत आणि श्रील प्रभूपाद तसेच आपल्या कृपेमुळे खूप भक्त जोडले जात आहेत. या सेंटरमध्ये आमची भरपूर सेवा होऊ देत व अजून भक्त जोडले जाऊ देत असा आशीर्वाद असावा.

तुमची खरी ओळख मला कृष्ण बंधूमुळे झाली. जेव्हा आपण संगम २०२४ मध्ये आम्हा सर्वांना प्रेम आणि कृपा दिली त्याबद्दल खूप आनंद होतो. जेव्हा तुम्ही "आय लव कृष्ण बंधू" म्हणाला तेव्हा तो अनुभव खूप सुखकारक होता. तसेच चंद्रभागा नदीच्या काठी जे किर्तन झाले त्याचा आनंद कधीही विसरता येणार नाही. असेच खुप संगम होवो अशी कृपा असुदे. आजची तरुण पिढी आपली कृष्ण बंधू वरती असलेल्या विशेष प्रेमामुळे भक्ती मार्गाकडे वळत आहे, ऑनलाईन जोडली जात आहे. प्रत्येक वर्षी नवीन लक्ष्य घेऊन मग ते पुस्तक वितरण असो की, अधिक जप करणे असो किंवा कोणतीही ऑनलाईन ऑफलाईन सेवा, फक्त आपल्या आशीर्वादामुळे पूर्ण होत आहे. ही सेवा अशीच मिळत राहो व दरवर्षी लक्ष्य पूर्ण होत राहो हीच आपल्या चरणी प्रार्थना.

जेव्हा तुम्हाला संत तुकाराम महाराज यांची उपाधी दिली जाते तेव्हा मला धन्य झाल्याचे वाटते.
संत तुकाराम महाराजांचा अभंग आहे की

चंदनाचे हात पाय ही चंदन । परिसा नाहीं हीन कोणी अंग ॥१॥
दीपा नाहीं पाठीं पोटीं अंधकार । सर्वांगें साकर अवघी गोड ॥ध्रु.॥
तुका म्हणे तैसा सज्जनापासून । पाहातां अवगुण मिळे चि ना ॥२॥

तुम्ही चंदना प्रमाणे दिव्य आहात कारण तुमची प्रत्येक सेवा, गुरू समर्पण आणि भक्तांवरती असलेली विशेष कृपा चंदनाच्या सुगंधाप्रमाणे पसरत आहे. गुरू महाराज तुम्ही आमच्या जीवनात परिसापेक्षाही महत्वाचे आहात. आमच्यासारखे पतित जीवांचे तुम्ही उद्धारक आहात. तुम्ही तो दिव्याचा प्रकाश आहात जो भक्तीचा उजेड दाखवून आम्हाला अज्ञानातून बाहेर काढू शकतो. जशी साखर गोड असते तसेच आपल्या भक्तीची गोडी सर्वामध्ये पसरत राहू देत.

असे म्हणतात की भगवानाला स्वतःच्या जन्मदिवसापेक्षा आपल्या प्रिय भक्ताचा जन्मदिवस खुप आवडतो. व्यासपुजेच्या या पवित्र

नम ॐ विष्णु-पादाय कृष्ण-प्रेष्ठाय भूतल
श्रीमते लोकनाथ-स्वामिन् इति नामिने ।
हरे कृष्णा,
श्रील प्रभुपादांना सर्व गौरव !
परम पूज्य लोकनाथ स्वामी महाराज आपल्या चरणी कोटी कोटी दंडवत प्रणाम !
परम पूज्य गुरू महाराज आपणास ७६ व्या व्यासपूजे निमित्त हार्दिक शुभेच्छा !
श्री श्री राधा पंढरीनाथ तुम्हाला उत्तम आरोग्य आणि आनंद प्रदान करो.
"माझी गुरुमाऊली कल्पवृक्षाची सावली"
गुरुमहाराज आपल्या कृपेमुळे माझ्यासारख्या पापी जीवात्म्याचा उद्धार होत आहे कारण जोपर्यंत गुरुदेव कृपेने भगवंत मिळत नाहीत तोपर्यंत जीवात्मा या भौतिक जगात जन्म मृत्युच्या चक्रात अडकून दुःख भोगत राहतो. श्रील प्रभुपादांनी भगवंत विषयी जे ज्ञान गीता द्वारे दिले आहे ते ज्ञान आपल्या कृपेमुळे सहज सोप्या पद्धतीने मिळत आहे.गुरुमहाराज आपण नेहमीच अतिशय नम्र, सहनशील, करुणामय आणि सदैव गुरुनिष्ट आहात, श्रीला प्रभुपदांकडून आदेश प्राप्तीनंतर आपण पदयात्रा, नवीन मंदिर उभारणे तसेच हरीनाम संकीर्तन, भागवत कथा यासारख्या सेवा उत्तम रीतीने पार पाडत आहात.गुरुमहाराज आपल्यामधली अशी एक गोष्ट आहे जी मला मंत्रमुग्ध करणारी आणि शरीरावर रोमांच आणणारे असे आपले “किर्तन” महाराज आपले किर्तन इतके मनाला भावते कि, कधी त्यावर भक्त नाचायला लागतात कळतही नाही. गुरुमहाराज रोज सकाळी आपण आपल्या शिष्यासांठी न चुकता व कोणतीही परिस्थिती असेल किंवा कुठेही असाल, आपण कधीच जपा सेशन, जपा टॉक ची सेवा चुकवत नाही. आणि आम्हाला त्यातून प्रेरणा मिळते, आपली निरंतर सेवा पाहून अनेक भक्तांना भगवंताची गोडी निर्माण झाली आणि पूर्ण जगभरातून भक्त आपल्याशी जोडले जातात.
गुरुमहाराज आपल्या कृपेमुळे अनेक छोट्या छोट्या गावामध्ये सुद्धा सेंटर उभा राहत आहेत त्याचा लाभ मला मिळतो आणि भक्तांचा संग मिळतो तसेच महाराज मी कृष्ण बंधू या ऑनलाईन प्लॅटफॉर्म ला जोडले गेलेले होतेच आणि खरंतर तेंव्हापासून माझे शिक्षागुरु हिस ग्रेस सुंदर वामन प्रभुजी आणि हर ग्रेस रत्नावली गोपी देवी दासी यांच्यामुळे मला तुमच्याशी भेटण्याची आणि जवळून जाणून घेण्याची संधी मिळाली. ते नेहमीच महाराज तुमच्याबद्दल बोलत असतात, तुमचं गुणगान करत असतात, त्यांच्या मनात तुमच्याबद्दल सतत सेवा भाव तयार असतो, त्यांच्या अश्या भावनेने व उत्साहाने कृष्ण बंधूमधील प्रत्येक भक्तांमधें आदर आणि सेवाभाव जागृत होतो. गुरुमहाराज आपलेही कृष्ण बंधू वरती किती नितांत प्रेम आहे हे संगम २०२४ मध्ये पहिले, जेंव्हा आपण सर्व कृष्ण बंधूना आपला वेळ, कथा, किर्तनाचा आनंद दिला आणि “आय लव्ह कृष्ण बंधू” बोलून आपण आपले प्रेम व्यक्त केले खरेच खूप खूप छान वाटले. महाराज, आपले कृपा आणि प्रेम असेच राहू द्या आणि आपल्या आशीर्वादाने कृष्ण बंधूचे अनेक संगम होत राहोत आणि खूप भक्त जोडले जावोत. महाराज जेंव्हा आपण गौरंगा पांडुरंगा बोलता तेंव्हा वेगळीच ऊर्जा मिळते. पंढरपूर मधे श्री राधा पंढरीनाथांचे भव्य दिव्य मंदिर आपल्या कृपेमुळे उभा राहत आहे त्याबद्दलची आपली असलेली उत्सुकता पाहून खूप छान वाटते.गुरुमहाराज लहान तोंडी मोठा घास, माझ्याकडून काही चुकून चुकीचे बोलले गेले असेल तर माफ करा आणि मी श्री राधा गोपाळ यांच्या चरणी एकच प्रार्थना, आपणास उदंड दीर्घायुष्य लाभो आणि आम्हाला सतत मार्गदर्शन आणि प्रेरणा देत राहोत आणि आम्हाला महाराजांना सेवा देता येत राहोत. भगवान श्री कृष्णाचे नाव सर्वत्र होण्यासाठी आपण आपले आयुष्य समर्पित केले तसेच आमच्या सर्व भक्तांच्या हातून सेवा होत राहू देत कारण आपण आमच्यासाठी खूप

!! श्री गुरुगौरांग जयते !!
नमः ॐ विष्णू पदाय कृष्ण प्रेष्टाय भूतले !!
श्रीमते लोकनाथ स्वामिनी इति नामिने !!
हरे कृष्ण गुरु महाराज जी आपल्या चरणी कोटी कोटी दंडवत प्रणाम आपणांस 76 व्या व्यासपूजा निमित्त खूप खूप हार्दिक शुभेच्छा आपणांस पुढील आयुष्य सुख समृद्धीचे आरोग्यमय जावो अशी कृष्ण चरणी प्रार्थना करीत आहे.
गुरु महाराज जी आपण या अज्ञान रुपी अंधकारणाने अंध झालेल्या माझ्या नेत्रांना प्रकाशित करून मला या विपदाय भौतिक संसारातून बाहेर काढले आणि माझे कृष्णशी अतूट नाते जोडून दिले. त्यामुळे माझा मला मी खूप भाग्यवान समजतो. गुरु महाराज जी जर आपला संघ मला लाभला नसता तर माझे हे जीवन भौतिक संसारात अंधकरामय झाले असते मी आपल्या चरण कमळाचा आश्रय घेतल्यामुळे या भावसागराला निश्चित पार करेन अशी अपेक्षा करीत आहे हे गुरू महाराज जी आपण एकमेव आमचे आश्रयस्थान आहात. या त्रिभुनातून सुटका करणारे आहात. गुरु महाराज जी आपण करुणा सागर, दिनबंधू, प्रेम सागर आहात. माझ्यासारख्या बद्ध जीवाला पावन करणारे आहात.
गुरुमहाराज जी आपण आपल्या भक्ताच्या उद्धारासाठी रात्रंदिवस झगडत आहात. आपण पदयात्रा काढल्या अनेक मंदिरे बांधली आणि आता आपण पंढरपूर धाम येथे भू वैकुंठ मंदिर अंदाजे 150 करोड असे भव्य दिव्य मंदिर बांधकाम चालू आहे ,सदर मंदिरास मी नंदनकृष्ण दास व महामंत्र महिमा देवीदाशी आम्ही एक लाख रुपये देणगी दिलेली आहे. गुरु महाराज जी आपले झूम मंदिरात मी व महामंत्र महिमा देवीदाशी दररोज हजर असतो. आम्हास गुरु महाराजांचे दररोज दर्शन भेटते आम्ही खूप भाग्यवान आहोत.आपली कृपादृष्टी आमच्यासाठी सर्वस्व आहे. परमपूज्य श्री लोकनाथ स्वामी महाराज की जय !! परमपूज्य श्रील प्रभुपाद की जय !! व्यास पूजा महाउत्सव की जय !!
**नंदन कृष्णदास, श्री श्री राधा कुंजबिहारी मंदिर कॅम्प पुणे**

| |
|---|
| **श्री गुरु गौरांग जयते**<br>नमः ऊ विष्णु पदाय कृष्ण प्रेष्टाय भूतले श्री मते लोकनाथ स्वामींनी इति नामीने<br>हरे कृष्ण गुरु महाराज जी माझा आपणास कोटी कोटी दंडवत प्रणाम आपणास 76 व्या व्यासपूजा निमित्त खूप खूप हार्दिक हार्दिक शुभेच्छा. आपली वाणी ऐकण्यासाठी माझे कर्ण विचारतात की , मिला दो शाम से उद्धव तेरे गुण हम भी गायेंगे गुरु महाराज जी आपल्यासाठी आजच्या परममंगली मी भगवंताकडे व श्री श्री राधा राणीकडे एकच प्रार्थना करते की माझ्या गुरू महाराजांना दीर्घायु लाभो तसेच त्यांची प्रकृती स्वास्थ्य आनंदी उत्साही उत्तम राहो जेणेकरून या भौतिक संसारामध्ये माझ्यासारख्या असंख्य बद्धजीव आहेत. त्यांच्यावर आपली कृपा होवो अशी प्रार्थना करते.<br>हे गुरू महाराज जी आपण एकमेव आमचे आश्रयस्थान आहात या त्रिभोवनातून आमची कोणीही सुटका केली नसती आम्ही अनेक जन्ममरणाच्या या भौतिक जंजाळात कितपत पडलो असतो परंतु केवळ आपल्या कृपेमुळेच आम्ही भगवंताची भक्ती करण्यास यशस्वी झालेले आहे खरोखरच गुरु महाराज जी आपण करुणासागर आहात दीनबंधू आहात प्रेम सागर आहात म्हणून मी आपली वाणी ऐकण्यासाठी भगवंताकडे प्रार्थना करीत होती.अखेर भगवंतांनी माझी मनोकामना पूर्ण केली आणि आपण आपल्या मुखार बिंदू द्वारे झूम मंदिर येथे महामंत्र देविदाशी म्हणालात आणि हसलात त्यावेळी माझे करुणांनी भारवलेल्या ह्रदयाचे आणि आनंद अश्रू शरीरातील कंपाचे वर्णन मी करू शकत नाही. माझा आनंद गगनात मावेनासा झाला आपली कृपादृष्टी माझ्यावर अशीच राहू द्या ही विनंती.<br>महामंत्र महिमा देवीदाशी<br>**माधवी नवनाथ पवार**<br>**पुणे शहर** |
| नमः ओम विष्णू पादाय कृष्ण पृष्ठाय भूतले श्रीमते लोकनाथ स्वामी इति नामिने<br><br>परमपूज्य लोकनाथ स्वामी महाराजांना कोटी कोटी प्रणाम मी 2014 सालापासून इस्कॉन शी जोडले गेले तेव्हापासून मी मंदिरात जात आहे 2018 पासून रेग्युलर चार नियमांचे पालन आणि सोळा माळा जप करत आहे एकदा असेच परमपूज्य लोकनाथ स्वामी महाराज जेव्हा एनव्हीसीसी पुणे मंदिरात आले तेव्हा त्यांचे मला दर्शन झाले त्यांची भगवंतांविषयीची मनात अंतरिक असलेली आहे त्यांच्या ह्रदयात कृष्ण प्रेमाची खरी असलेली व्याकुळता आणि दयाळूपणा कृष्ण प्रेम शुद्धचित्त शांत समजूतदारपणा हे सर्वश्रेष्ठ गुण महाराजांच्या ठाई असल्यामुळे मी त्यांना मनोमन गुरु करायचे ठरवले महाराजांची पदयात्रा परिक्रमा ग्रंथ लेखन कथा संकीर्तन भागवत क्लास इत्यादी माध्यमातून गुरु महाराजांचा सत्संग घेण्याचा मला लाभ मिळाला त्यांचे प्रवचन व संकीर्तन ऐकून मला अजून प्रेरणा मिळाली त्यानंतर त्यांची पुस्तके वाचायला सुरुवात केली युट्युब वर सतत त्यांचे प्रवचन ऐकू लागले मग मी ठरवले की हेच गुरु करायचे त्याप्रमाणे मी वाटचाल सुरू केली आणि मी इस्कॉन मधील कौन्सिलर ग्रुप मध्ये त्यांचा मदतीने सहभागी झाले आणि मला श्री राधा वृंदावन चंद्र आणि गुरु महाराज यांच्या आशीर्वादाने दीक्षाग्रहण करण्याचा योग आला आहे त्यांची अशीच कृपा असावी हीच प्रार्थना माझ्या आणि माझ्या कुटुंबावर कृपा ठेवावी व त्यांना माझा दंडवत प्रणाम श्री राधा वृंदावन चंद्र आणि नित्यानंद गौरांग माझी प्रार्थना आहे की महाराजांना दीर्घायुष्य लाभो आणि त्यांची मला सेवा आणि वैष्णव आणि गुरु महाराजांचा संघ मिळत राहो ही श्री राधा वृंदावन चंद्र कमलचरण इथे प्रार्थना<br>हरे कृष्णा हरे कृष्ण कृष्ण कृष्णा हरे हरे<br>हरे राम हरे राम राम राम हरे हरे **Deepali Joshi Pune** |





हरे कृष्ण गुरुमहराज, दंडवत प्रणाम.
प्रथमतः आपणास आपल्या अमृत महोत्सवी जन्मदिनाच्या अनंत शुभेच्छा!!

काही लोकांचं आपल्याला कौतुक करावं लागतं तर काही लोकांचं करावसं वाटतं. आणि ज्याचं करावसं वाटतं त्यांच्याबद्दल बोलतांना, लिहिताना, ऐकताना ते संपू नये असं वाटतं किंवा काय करावं, सांगावे, लिहावे हे कळत नाही. तसंच आज काहीसे माझे झाले आहे.

शब्दांजली म्हंटले की त्या व्यक्तीचे गुणगौरव हेच समीकरण आहे. मीही गेली कित्येक वर्षे तेच करते आहे. आज ही मी तेच करणार आहे, कदाचित जे मी आज लिहिणार आहे ते मी या आधीही लिहिलेलं असेल पण आज परत व्यक्त करणार, बोलणार आहे कारण मला ह्या वेळी त्याची नितांत गरज आहे.ते करून मला खूप काही मिळणार आहे.

तसं पाहिलं तर एखादा भौतिक वादी मनुष्य देखील त्याच्या वयाची ५० वर्षे पूर्ण दृढतेने, कार्यक्षम होऊन, समर्पणाने,प्रामाणिकपणे कुठल्यातरी कारणासाठी खर्च करतो. उदा. एखादी स्त्री आपल्या संसारासाठी,घरातल्यांसाठी तर एखादा पुरुष एखाद्या संस्थेसाठी; एखादा शिक्षक त्याच्या शाळेसाठी, विद्यार्थ्यांसाठी तर एखादा डॉक्टर त्याच्या रोग्यांसाठी.
आणि ह्यामुळे त्याला समाजात ओळख,मान, प्रतिष्ठा मिळते.एखादे घर-गाडी तो घेऊ शकतो आणि कदाचित समाधानही मिळते.

पण तुम्ही आणि या संस्थेतील इतर अनुयायी केवळ समाजाचे काही चांगले करू शकुत आणि परमेश्वराची प्रसन्नता या दोन गोष्टीने भारावलेले खरंच खूप वेगळे आहात.आपले आचार्य, संत मंडळीही सतत प्रबोधन करत असतात. खरतर हे एक वेगळे कार्य आहे पूर्णपणे सामाजिक नाही पण अध्यात्मातून समाज प्रबोधन. ईश्वरावर विश्वास ठेवून प्रत्येक आव्हानाला समोर जाणे हे खूप अवघड असतं आणि त्यात ओळख तर दूर,स्वतःच असे ही काही नसते.पण समाधान तुडूंब असते, कदाचित भौतिक सुखांपेक्षा जरा जास्तच कारण हे तुम्ही तुमच्या मनाचे ऐकून केलेलं आहे आणि ह्याचच मला आश्चर्य वाटत आहे. हाच तो गुण ज्यात स्वतःला झोकून देऊन, प्रत्येक आव्हानाला सामोरे जाणे, कधी कौतुक तर कधी अपमान, तिरस्कार सहन करणे,नव नवीन जबाबदाऱ्या घेणे आणि त्यासाठी कशाचीही तमा न बाळगणे.. खरंच खूप अवघड आहे.

खरंतर काहीही न घेता देत राहणं खूप कठीण असतं. माझ्या आयुष्यात तुम्ही १५-१६ वर्षांपूर्वी आलात. तेव्हापासून ते आज पर्यंत आणि त्यापूर्वीचे तुम्ही ह्याबद्दल मी बरंच काही ऐकलं,वाचलं.या संस्थेतील तुमच्या ५० वर्षात बरेच चढ उतार तुम्ही पाहिलेत आणि तरीही याच मार्गावर अग्रसर आहात ह्याचं नवल वाटतंय. बऱ्याचदा सेवा करताना असं काही घडतं, दिसतं, ऐकू येतं ज्यामुळे मनात दुसरे विचार येतात पण तुम्हाला पाहिले की पुढे चालत राहण्याची इच्छा होते, बळ येते. ह्याच शक्तीची मला आत्ता गरज आहे आणि तुम्हीच ती देऊ शकता. जेणेकरून माझ्या भक्तिमार्गावर आलेलं नैराश्य घालवून नवीन ऊर्जेने मी पुन्हा चालत राहीन. तुमचा हाच गुण ज्याला आपण समर्पण, प्रेम, जिद्द, धाडस, ध्यास, विश्वास हे सर्व काही म्हणू शकतो, मला घ्यायचा आहे. विनयपूर्वक आपणास यासाठी याचना करीत आहे. तुमचा लोभ असावा.

प्रिय गुरु महाराज
कृपया माझा विनम्र प्रणाम स्वीकार करा

मी पहिल्यांदाच आपल्या व्यासपुजे साठी शब्दांजली लिहीत आहे . मला हे लिहिण्याचा अनुभव नाही . पण आपल्या प्रसन्नतेसाठी काही लिहीन .
महाराज माझा पहिला परिचय खर तर आपल्या किर्तनांशी झाला , ते म्हणजे मी एकदा लहाणपणी NVCC मंदिरात आलो असताना काही भजन माझ्या मेमरी कार्ड मध्ये टाकू इच्छित होतो , त्याच भजन सुची मध्ये आपले " उठी उठी गोपाला " भजन ऐकलं .
त्यानंतर आपल्या विषयी ऐकण्याचा योग आता तो म्हणजे " श्री हरी विठ्ठल " या युट्युब वरीस चॅनलवर अधुनिक संत या मालिकेत -> असे संत ज्यांनी दिंडी १०० हुन जास्त देशात पोहचवली .
त्यानंतर आपला "माझे माहेर पंढरी " तसेच "सुंदर ते ध्यान " हे अभंग ऐकले .

प्रत्यक्षात आपले दर्शन मोहिनी एकादशी २०२२ ला इस्कॉन NVCC च्या गुरुपुजेत किर्तन करत असतांना घडले . व पहिल्यांदा प्रत्यक्षात "श्री रुक्मिनी कथा " श्रवण करण्याच परम सौभाग्य प्राप्त झाले .

माझा आपल्याशी अश्या प्रकारे काही वेळेस पदिल्यांदा सुसंपर्क आला ।

मला आपल्या विशेष सेवा नेहमीच आकर्षित करीत राहिल्या त्या म्हणजे -> पदयात्रा , गावा कडे प्रचार , पंढरपुर , किर्तन व संस्कृत अध्ययन ।

पंढरपुर :- पहिल्यांदा पंढरपुरात आल्यावर पुंडलिकाचे दर्शन घेण्याची प्रथा आहे ; पण आपल्या प्रयत्नांमुळे पुंडलिकाचे दर्शन घेवुन लोहदंड कडे लक्ष जाताच भव्य "प्रभुपाद घाटाचे " दर्शन होते

किर्तन :- आपल्या किर्तना विषयी तर एक अभंग डोळ्या समोर येतो तो म्हणजे "अबीर गुलाल उधळीत रंग नाथा घरी नाचे माझा सखा पांढुरंग " यात माझ्यासाठी " नाथ " म्हणजे श्रील "लोकनाथ " स्वामी महाराज की जय !!

आपल्या चरणी माझ्या अनेक अपराधांना क्षमा करा व आपल्या , प्रभुपाद आणि भगवंताच्या सेवेत रुजु करा ही नम्र विनंती

आपला दास
**भक्त हृषिकेश**
**(पुणे)**

नम ॐ विष्णु पादाय
कृष्ण प्रेष्ठाय भूतले
श्रीमते लोकनाथ स्वामी
ईती नमीने
गुरुमाऊलींच्या चरणी कोटी कोटी दंडवत प्रणाम
माय गुरु महाराज हे आपले लाडके वाक्य आहे, त्याचप्रमाणे आपले शिष्य देखील अत्यंत गर्वाने म्हणू शकतात “माय गुरु महाराज”.
आपली कार्य कुशलता, गुरु आज्ञा पालन, साधेपणा, किर्तन कुशलता, संस्कृत वरील प्रभुत्व, शास्त्रांवरील प्रभुत्व, शास्त्र समजावून सांगण्याची सहज सुलभ पद्धती, वयाला हरवणारी स्फूर्ती, वाक् चातुर्य, या आणि इतर अनेक गुणांमुळे आणि आपल्या प्रेमळ स्वभावामुळे आपण सदैव माझ्यासाठी “माय गुरु महाराजच” असणार आहात.
गुरुदेव आपण मला शिष्य म्हणून स्वीकारले ह्याला एक वर्ष पूर्ण झालेले आहे. वास्तविक पाहता आपले गुरु शिष्याचे नाते हे अनंत काळाचे आहे पण ते मागच्या वर्षी पुनर्स्थापित केले गेले.
मी मागच्या वर्षी एप्रिलमध्ये वानप्रस्थ स्वीकारला आहे आणि एन व्ही सी सी मंदिरामध्ये बालाजी बॅकअप, इस्त्री सेवा, तसेच बुक स्टॉल वरती बुक डिस्ट्रीब्यूशनची सेवा करत आहे. आपल्या आणि आम्हा सर्वांच्या अत्यंत जिव्हाळ्याचा भूवैकुंठ प्रोजेक्ट मध्ये मी एमइपी कॉर्डिनेटर ची भूमिका करत आहे.
आपला जन्मजन्मांतरीचा दास,
**नारद ऋषी दास**
**न्यू वैदिक कल्चरल सेंटर पुणे**

|| प•पु• श्रील लोकनाथ स्वामी शब्दांजली ||
आंतरराष्ट्रीय कृष्णभावनामृत संघ पंढरपूर
श्रील लोकनाथ स्वामी व्यास पूजा विशेष

!! वंदे गुरो: श्री चरणा रविदं. !!
यांच्या चरणी माझा साष्टांग दंडवत प्रणाम

नम:ॐ विष्णु पादाय कृष्ण प्रेष्ठाय भुतले|
श्रीमती लोकनाथ स्वामी इति नामिने. ||

मी भगवंतांची भक्ती सुरू करून पाच वर्षे झाली भक्तीची माझी सुरुवात पंढरपूर मधून झाली माझे शिक्षा गुरु आदरणीय धर्मराज प्रभू जी यांनी मला सहकार्य केले.

सुरुवातीला माझी सेवा राधा गोपीनाथ मंदिर सिकंदराबाद येथून झाली आता सध्या मी इस्कॉन केंद्र हडपसर येथे कार्यरत आहे.

गुरु महाराज जी आपण मला २०२२ मध्ये दीक्षा दिली त्यामुळे मी तुमची खूप खूप आभारी आहे

मी आपला सत्संग झुममार्फत दररोज प्राप्त करते आपल्याबरोबरच मी माझ्या १६ माळा पूर्ण करते

अलीकडे आपला सत्संग इस्कॉन केंद्र हडपसर मध्ये गौर पौर्णिमा या कार्यक्रमाच्या निमित्ताने झाला त्यावेळी तुमच्या हस्ते गौरनिताई अभिषेक आणि आपले प्रवचन खूप छान झाले.

सध्या भुवैकुंठ मंदिराचा प्रकल्प आपल्या मार्गदर्शनाखाली चालू आहे लवकरच या मंदिराचे उद्घाटन आपल्या हस्ते होईल तो सोहळा पाहण्याचे भाग्य लाभेल अशी मी चरणी प्रार्थना करते

आपण माझे दीक्षा गुरु आहात याचा मला अभिमान आहे

मी आपल्या इस्कॉन चा प्रचार प्रसार करण्याचे कार्य मी सर्वतोपरी करण्याचा प्रयत्न करेन

मी राधा पंढरीनाथ आणि विठ्ठल रुक्मिणी मातेला प्रार्थना करते की माझ्या दीक्षा गुरूंना उदंड आयुष्य मिळो तुमच्या सहवासाची सार्थ आणि आशीर्वाद भरा हात माझ्या मस्तकावर सदैव राहो एवढीच प्रार्थना

**इस्कॉन सेवक**
**दास दासानुदास**
**महाविष्णू प्रिया देवीदासी पुणे**



# मराठी

परमपूज्य लोकनाथस्वामी (गुरु महाराज) यांना ७६ व्या व्यासपूजाच्या कोटी कोटी दंडवत प्रणाम
प्रभुपाद यांनी त्यांना सांगितले की तुम्ही गावोगावी जाऊन बैलगाडीतून प्रचार करा.आज महाराज गुरूंचे आज्ञेचे पालन करत आहेत. त्यांच्या प्रचार आपल्याला दिसत आहे.आज ऑल इंडिया पदयात्रा बद्रीनाथ येथे गेलेली आहे.व संपूर्ण देशांमध्येही परिक्रमा पदयात्रा चालू आहे .तसेच अनेक राज्यांमध्ये महाराजांनी पदयात्रा चालू केले आहेत.तसेच देहू देहू ते पंढरपूर आळंदी ते पंढरपूर आरवडे ते पंढरपूर सोलापूर ते पंढरपूर आशा अनेक महाराजांनी पदयात्रा चालू केलेले आहेत.त्यामुळे गुरूंचे आज्ञेचे महाराज काटेकोरपणे पालन करीत आहेत.
माझी काही पात्रता नसून मला गुरु महाराजांनी शिष्य म्हणून त्यांच्या ओंजळीत घेतलेला आहे.मी  पात्र नाही.
माझे गुरु महाराज दयाळू आहेत व माझ्यावर व सर्वांवर विशेष कृपा करत आहेत आलेल्या भक्तांची सेवा करण्याची आम्हाला संधी मिळत आहे ती केवळ गुरु महारांच्या कृपेमुळेच आहे.त्यांनी सांगितले होते की आलेल्या भक्तांची सेवा कर दिंडीची सेवा कर या सर्व गुरु महारांच्या कृपेमुळेच होत आहेत.गुरु महाराज भेटल्यावर जवळ घेतात व ओळखताच स्माईल करतात हीच आमच्यावर विशेष कृपा आहे.आम्ही काही कुठली मोठी सेवा करत नाही.परंतु गुरू महारांचा दयाभाव सर्वांवर असाच आहे.गुरु महाराजांनी जपा टॉक सुरु केलेल्या मुळे रोज उठण्याची सवय लागलेले आहे.तर अनेक महाराजांचे व वैष्णवांचे प्रवचन आम्हाला सकाळी ऐकायला मिळत आहे. तसेच जिथे जिथे जातील येथील धाम के दर्शन रोज होत आहे. श्री बद्रीनाथ चे दर्शन कधी आम्हाला मिळाले नसते.
गुरु महाराज त्यांच्या गुरु बंधूंवर विशेष प्रेम करतात सर्वांशी त्यांचे बंधुत्वाचे नाते आहे.एवढ्या वयात सुद्धा ते इस्कॉनचे मोठे मोठे प्रोग्राम जिथे जिथे होतात.तिथे उपस्थित असतात.व आपल्या कीर्तनाद्वारे सर्व भक्तांना नाचवतात ते कीर्तन सम्राट आहेत. ते महाराष्ट्राचे संत तुकाराम महाराज आहेत. अशी पदवी श्रील प्रभुपाद यांनी दिले आहे.
ही सेवा त्यांना त्यांच्या गुरूंनी दिलेले आहे. कीर्तनकार पदयात्रा त्यामुळेच त्यांच्यावर त्यांच्या गुरूंची विशेष कृपा आहे.आहे श्रील प्रभुपद गुरु महाराजांना महाराष्ट्राचे संत तुकाराम म्हणत.
गुरु महाराजांनी अनेक मंदिरे आणि उभे केले आहेत पंढरपूर व नागपूर येथे नवीन मंदिर बांधण्याचा मोठा प्रकल्प आहे यातून त्यांची आपल्याला तळमळ दिसते की सर्वांना कृष्णभक्ती मिळाली पाहिजे व भगवंताचे दर्शन मिळाले.पाहिजे
ते प्रवासामध्ये सुद्धा जपा टॉक चालू ठेवतात जपा टॉक चालू झाल्यापासून आज पर्यंत त्यांनी सकाळी कधीही विश्रांती घेतलेली नाही रोज ते आपल्याला सर्वांना दर्शन देत आहेत. श्रीमती सीताराणी यांची आमच्या कुटुंबावर खूप खूप आहे त्यांनी तीन महिन्यापूर्वी देह सोडला व त्या गोलक धाम मध्ये गेल्या. ज्या वेळेस आमच्या आई वडील पंढरपूरला जातील त्यावेळेस श्रीमती सीताराणी ह्या सेवा करत असत. त्यांना मी भेटल्यावर घरातील सर्वांची विचारपूस करत असत. त्या गेल्यामुळे आम्हाला खूप दुःख होत आहे. त्यांचे दर्शन झाले म्हणजे आम्हाला गुरु महाराजांचे दर्शन झाल्या असे वाटायचे. यावर्षी आमच्या घरी येऊन गेल्या होत्या.गुरु महाराज यांच्या कृपेमुळेच मला आत्ता नोकरी लागली आहे. तसेच माझ्या मुलगा वेदांत याला मेडिकलला चांगले मार्क मिळाले हे गुरु महाराजांची कृपा आहे
गुरु महाराजांचे आरोग्य चांगले चांगले राहावे त्यांना दीर्घायुष्य लाभो हीच श्री श्री राधा पंढरीनाथ चरणी प्रार्थना
आपला
**उग्रसेन दास व परिवार (Baramati)**

---

हरेकृष्ण
परम पूज्य श्रील लोकनाथ स्वामी गुरु महाराज की जय
श्रील प्रभुपाद की जय
गुरु महाराज मी परम भाग्यशाली आहे की आपण मला शिष्य म्हणून स्वीकारलात.जर तुम्ही मला शिष्य म्हणून स्वीकारला नसता तर अनेक अनेक जन्मापर्यंत या दुःखमय भवसागरात अडकून पडलो असतो.गुरुदेव आपण पतित जीवांचा उद्धार करण्यासाठी प्रकट झाला आहात. आपल्या अहैतुकी कृपेमुळे लाखो जीव भक्त बनत आहेत.
गुरुदेव आपण कीर्तन सम्राट आहात. आपले कीर्तन हृदयाला स्पर्श करणारे आहे. माझ्या भक्तिमय जीवनाची सुरुवात आपले कीर्तन ऐकूनच झाली आहे. जेंव्हा आपली कीर्तनरुपी मधुर वाणी मी ऐकतो तेंव्हा मला हे भौतिक जगत सुद्धा सुखालय वाटते.
गुरुदेव आपल्या परम कृपेमुळे आपण झूम मंदीर सुरु केले आहे. झूम मंदीरच्या माध्यमातून आपण सर्व शिष्याना आपला दिव्य संग प्रदान करता. या आपल्या दररोजच्या दिव्य संगामुळे आमचे मायेपासून संरक्षण होते. अन्यथा मायेला तरून जाणे खूप कठीण आहे.
गुरुदेव कृपया मला सदैव आपल्या छत्र छायेखाली ठेवा. लवकरात लवकर माझी या भौतिक जबाबदारीतून सुटका होऊन आपल्या सेवेत सदैव माझे सर्वस्व लागू दे. आणि हरीनामा मध्ये माझी रुची निरंतर वाढुदे.
जय गुरुदेव
जय प्रभुपाद **Bhavgrahi Janardan Das (Belgaon)**

हरे कृष्ण
प्रिय गुरु महाराज
श्रील प्रभिपदंच जय हो

आपल्या ७६ व व्यास पूजेंचा तुम्हाला खूब खूब अभिनंदन

गेल्या तीन _चार वर्षां पासून गुरू महाराजना पंढरपूर ला येऊन तुमचे प्रत्यक्ष
दर्शन करण्याची ईच्या आहे .

२०२१ मध्ये जेव्हा मला इस्कॉन
बदल माहीती पडल. इस्कॉन हे काय आहे हे मला काहीच माहीती नव्हत तेव्हा मी एका प्रभुजीनच्या.माध्यमातून कृष्ण बंधू ग्रूप मद्या जोडली गेली.
२२ १२ २०२१ मध्ये श्रीमान सुंदर वामन प्रभुजी .आणि श्रीमती रत्नावली गोपी माता जीच्या माध्यमातुन मि कृष्ण राधारणी, प्रभूपाद, गुरु पर आणि सकशम गुरु परमपरा विषयी जानल . आणि १६ मला करण्यास सूरुवत झाली . शिक्षा गुरुच्या कृपेणे तुमच्या पर्यात पोहचली गुरुमहारा.

मि खूप स्वतला खूप भ्याग्याशाली समजते की मला गुरुमहाराज मिळाले .आसुष्या मध्ये खूप अशा अडचणी आल्या त्याने मला भक्ती पासून दुरु केल पण मि तुमच्या कृपेने परत भक्ती मध्य आली.
रोज आमच्या साठी जापा talk
ठेवता आहात तुमचे आम्हाला रोज दर्शन मिलते गुरुदेव ज्याच्या मुले आमचा पुर्ण दिवस सुखाने जातो.

तुमच्या बदल करही ही लीन्या योग्य नाही आहे मी खुप ,पापी अधयमी आहे
तरीही माझी छोटी शी प्राथना स्वीकार करा. गुरुमाहाराज. तुमची सेवा करण्याचे
भाग्य माझ्या नशिबी ही येऊदे गुरू देव.... आणि मला शिष रूपा मधे स्वीकार करा गुरू महाराज.

**नूतन**
**महाराष्ट्, व्रजेश्वरी**

---

हरे कृष्णा,
गुरुमहराज चरणी दंडवत प्रणाम, या भौतिक जगातून आध्यात्मिक जगताकडे जाण्याचा मार्ग केवळ गुरु महाराजांच्या महाराजांची मधुर प्रेमळ, अभ्यासू, जिज्ञासापूर्वक शब्द कानावर पडताच मनस्वी समाधान वाटते.
शास्त्राची सखोल माहिती, आपल्या जीवनाचे अंतिम उद्देश काय? आपण कुठून आलो? आपल्याला कुठे जायचं ? सर्व काही गुरु महाराजांच्या जपा टाक सेशन मधून श्रवण करायला मिळते.
गुरु महाराजांचा असाच आशीर्वाद अशीच कृपा आणि अधिकाधिक संघ घडावा हीच राधा श्याम संघ!

हरे कृष्णा! **अरविंदाक्ष गोविंदास (Malegoan)**





।।हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे।।
।।हरे राम हरे राम राम राम हरे हरे।।

हरे कृष्ण गुरु महाराज।
माझे परम पूजनीय आदरणीय गुरु महाराज आपल्या कमळचरणी माझा विनम्र प्रणाम स्वीकार करावा।

प्रिय गुरु महाराज सर्वप्रथम आपल्याला 76 व्यासपूजेसाठी मनपूर्वक अभिनंदन महाराज आपल्या वर नेहमी श्रील प्रभुपादांचे आशीर्वाद बसावे आणि श्री श्री राधा माधव, श्री श्री राधा पंढरीनाथाच्या कृपेने आपल्याला उदंड आयुष्य आणि स्वास्थ लाभी, अशी प्रार्थना भगवतंच्या चरणी करते।
जणेवरून आपली कृपा आमच्यासारख्या बद्ध जीवांवर असावा महाराज. मी आपल्या बद्दल काही लिहावे/लिहू शकेल इतकी योग्यता माझ्यात नाही परंतु आपल्या कृपेने थोड लिहिण्याचा प्रयत्न करते महाराज कृपा करावी

महाराज आपण इतके कृपमयी दयाळू आहात कि मी ह्याचा प्रत्यक्ष अनुभव घेतला आहे. महाराज खरच आपण आमच्या सारख्या अज्ञान बद्ध जीवांवर इतकी कृपा करता याची काही मर्यादा नाही. आपल्या कृपाचा मी प्रत्यक्ष अनुभव घेतला तो असा कि महाराज मला कृष्णभावनामृत मधे जुळायला जास्त वेळ झाला नाही कमीकमी एक ते दीड वर्ष झाले. असे असतांना महाराज मी एकदा पहल्यांदा आपले कीर्तन युट्यूबवर ऐकत होते. ऐकतांना मला मनात असेवाटले कि मी तुम्हाला कधी मिळेल का? महाराजांचे प्रत्यक्ष कीर्तन ऐकायला आणि मला एकदम राहीवरून आले आणि त्याच दोन तीन महिन्यानंतर महाराज आपण कृपा केली. त्यावेळी आपण ठाण्याला इस्कॉन जगन्नाथ मंदिर इथे आपले पदार्पण झाले आणि मला माझ्या गुरुदेवांचे दर्शन घडले आणि मी कीर्तनमध्येही सहभागी झाले. आपल्या या कृपामुळे मी कृष्णभावना मध्ये कसे आले काही कळलेच नाही. धन्यवाद महाराज मी हा प्रसंग कधी विसरणार नाही. महाराज मी खूप मंद बुद्धी म्हणा किंवा अभागी म्हणा कि मला भक्तीमध्ये यायला वेळ लागला आयुष्य ची 38 वर्ष मी अशीच वाया घातली याचे मला खूप वाईट वाटते असो.

महाराज मी सध्य भक्ती मध्ये खूप मागे आहे जपही व्यवस्थित करू शकत नाही आहे परंतु महाराज आपल्या चरणी प्रार्थना करते की थोडका होईना आपल्यासाठी आणि इतरांसाठी कृष्णभावनेचा प्रचार करू शकू आशीर्वाद असावा कि महाराज कमीकमी आपल्या घरच्यांना जरी मी कृष्णभावनेत आणू शकेल तर माझ्यासाठी खूप मोठी गोष्ट आहे. बस जास्त काही नाही फक्त एक इच्छा आहे की मी आपली शिष्या हो शकू महाराज. माझ्यात इतकी आपल्या शिष्यप्राप्ती साठी ( दीक्षा प्राप्तीसी) योग्यतातर नाही तरी आपल्या कृपा आशीर्वादाने मी भक्ती मधे पुढे वाढू शकू अशी आपल्या कमळचरणी प्रार्थना करते महाराज. लिहितांना माहीत नाही काही चुकले असेल तर मला माप करा . महाराज मी आपली शिष्य बनण्यास पात्र आहे कि नाही हे माहीत नाही.

प्रिय गुरु महाराज जास्त काही लिहू शकत नाही लिहितांना खूप गहीवरून येत आहे माहीत नाही का ते? बर असो काही चुकल्यास मला माप करा अशी आपल्या कमळचरणी प्रार्थना करते.

---

🙏हरे कृष्ण🙏

ॐ अज्ञान तिमिरान्धस्य ज्ञानाञ्जन शलाकया । चक्षुरुन्मीलितं येन तस्मै श्री गुरवे नमः ।।

आदरणीय गुरु महाराजांच्या चरणी माझा कोटी कोटी दंडवत प्रणाम. सर्वप्रथम ७६ व्या आविर्भाव दिना निमित्त आपणास खूप खूप शुभेच्छा. आपणास उदंड आयुष्य लाभो हीच भगवंतांच्या चरणी प्रार्थना.

माझी पात्रता नसताना सुद्धा आपल्या कृपे मुळेच मला भक्तांचा संग आणि प्रचाराची संधी मिळत आहे. इस्कॉन खारघर मंदिर उद्घाटन प्रसंगी आपला संग आणि आशीर्वाद मिळाला आणि त्यातून एक नवीन ऊर्जा मिळाली.

सध्या अणुशक्ती नगर येथे युथ प्रोग्राम तसेच साप्ताहिक सत्संग च्या माध्यमातून HG गोकुलेश्वर प्रभुजी यांच्या मार्गदर्शनाखाली प्रचार तसेच वेग वेगळ्या सेवा करण्याची संधी मिळत आहे.

सेवा आणि साधना दोघांमध्ये अशीच प्रगती होत राहो हीच आपल्या चरणी प्रार्थना.

आपला कृपा आशीर्वाद सदैव आम्हा सर्वांना मिळत राहो हीच भगवंतांच्या चरणी प्रार्थना.

**आपला सेवक,**
**ध्रुव चरित्र दास**
**(धिरज बारी)**
**बी ए आर सी भक्त समूह,**
**मुंबई (इस्कॉन जुहू)**



# मराठी

नमः ओम विष्णु पादाय कृष्णप्रिष्ठाय भुतले श्रीमते लोकनाथ स्वामी इथे नामने नमस्ते सरस्वती देवी गौरव आणि प्रचारीने निर्विशेष शून्य वादी पाश्चात देश तारेने
माझे परम आदरणीय परमपूज्य प्रातःस्मरणीय गुरु महाराज श्री श्री लोकनाथ स्वामी महाराज यांचे चरणी कोटी कोटी दंडवत प्रणाम गुरु महाराज तुम्हाला आपल्या ७६व्या व्यास पूजेच्या अगदी अंतकरणातून खूप खूप शुभेच्छा गुरु महाराज आपण आपल्या अवैतुकी कृपेने दीक्षा देऊन उपकृत केलेला आहे 2012 स***** आपण माझ्यावर कृपा केली होती या एक तपाच्या कालावधीमध्ये आपण माझे आध्यात्मिक तयारी करून घेतली त्याबद्दल आपले किती आभार मानावे तेवढे कमीच आहे रोजचा झूम मंदिर मध्ये आपण आम्हाला प्रबुद्ध करत आहात तसेच कृष्ण भावनेमध्ये प्रगती करून भगवंताच्या चरण कमलाची प्राप्ती कशी करायची हेही सांगत आहात तसेच पदयात्रा आपले जीव की प्राण आहे श्री श्री चैतन्य महाप्रभू जा रे देखो तारे कहो कृष्ण उपदेश हे ब्रीदवाक्य प्रसार करण्यासाठी आपण ठीक ठिकाणी पदयात्रा चालू केल्या व चैतन्य महाप्रभू चा संदेश सर्व जगात प्रचार करत आहात ही सर्वसामान्य अज्ञानीजनासाठी भगवंतापर्यंत पोहोचण्यासाठी एक सुविधाच आहे तसेच भू वैकुंठा प्रकल्प सुरू करून ही ही पण आमच्यावर एक कृपाच आहे व्यास पूजेच्या दिवशी मी अशी शुभेच्छा देते की आपले स्वास्थ्य ठीक राहो आपणास उदंड आयुष्य लाभो तसेच माझे उर्वरित आयुष्य ही तुम्हाला लाभो ही राधा गोविंदाच्या चरणी प्रार्थना करते गुरु महाराज आपले चरण कमळ हेच माझे आश्रयस्थान आहे कृपया या चरणापासून मला दूर करू नका या गुरुचरणाची सेवा करण्याची संधी द्या आपल्या आदेशाप्रमाणे आम्ही ग्रुपमध्ये श्री प्रभूपादांची तसेच आपले ग्रंथ वाचन सुरू आहे गुरुदेव कृपा बिंदू दिया करो येई दासे तृणपेखा अति हिन हरे कृष्णा हरे कृष्णा गुरु महाराज पुन्हा एकदा तुमच्या चरणाशी कोटी कोटी दंडवत प्रणाम हरे कृष्णा हरे कृष्णा कृष्णा कृष्णा हरे हरे हरे राम हरे राम राम राम हरे हरे **Shrinagar Darshani DD (Mumbai)**

---

हरे कृष्ण दंडवत प्रणाम गुरुदेव ,
आपणास व्यासपूजेच्या अनंत शुभेच्छा
माझी कुठलीही पात्रता नाही की मी आपल्या बद्दल काही बोलू शकेल माझ्या बुद्धीत आणि लेखणीत ती क्षमता नाही
हे गुरुदेव आपण अत्यंत दयाघन आहेत केवळ आपल्या कृपेमुळे माझ्यासारख्या खालच्या पातळीच्या मला योग्य मार्ग मिळाला आज मला माझी ओळख फक्त तुमच्या मुळे पालघर इस्कॉन मध्ये माझी राजभोग सेवा असते तिथे सुरवातीला विचारलं तुमचे गुरू कोण

मी बोलली माझे बाबा माझे गुरुदेव परमपूज्य लोकनाथ स्वामी महाराज ते बोलले अरे वाह छान. मला खूप आनंद झाला.

हे गुरुदेव जेव्हा प्रवचन करतांना आपण बोलता की तुम्ही सगळे माझे पुत्र आणि पुत्री आहेत
स्वतःला स्वतःचा अभिमान वाटावा आणि हेवा वाटावा अस होत खूप खूप आभार माझा पुत्री म्हणून स्वीकार केला मला रोज आपली दृष्ट काढावी असे वाटते आणि रोज भगवंताला एकच मागणं माझ्या गुरुदेव ला नेहमी आरोग्य धन संपदा लाभो अस माझ रोज देवाकडे गाऱ्हाणं
जय गुरुदेव..हरे कृष्ण जय विठ्ठल श्री विठ्ठल
जय कीर्तनसम्राट आणि आमचे तुकाराम परमपूज्य लोकनाथ स्वामी महाराज की जय **Shri indulekha Devi dasi (Mumbai)**

---

👣हरे कृष्ण👣

ॐ अज्ञान तिमिरान्धस्य ज्ञानाञ्जन शलाकया । चक्षुरुन्मीलितं येन तस्मै श्री गुरवे नमः ।।
आदरणीय गुरु महाराजांच्या चरणी माझा कोटी कोटी दंडवत प्रणाम. सर्वप्रथम ७६ व्या आविर्भाव दिना निमित्त आपणास खूप खूप शुभेच्छा. आपणास उदंड आयुष्य लाभो हीच भगवंतांच्या चरणी प्रार्थना.

गुरू महाराजांचे रोज झूम द्वारे आशीर्वाद मिळतो, गुरू महाराजाना बघून भक्ती ची ओढ लागते गुरू महाराजांचे तेज बघून भगवंतांप्रती प्रेम वाढते भक्ती करण्याची उत्सुकता वाढते

आपला कृपा आशीर्वाद सदैव आम्हा सर्वांना मिळत राहो हीच भगवंतांच्या चरणी प्रार्थना.

**आपली कृपाभिलाशी,**
**परमसुंदरी सखी देवी दासी,**
**(प्रियंका बारी)**
**बी ए आर सी समूह,**
**मुंबई( इस्कॉन जुहू)**





हरे कृष्ण..🙏

नमः विष्णुपादाय कृष्ण-प्रेष्ठाय भूतले
श्रीमते लोकनाथ स्वामीन इति नामिने।

गुरुदेव, माझं काही चुकलं असेल तर मला क्षमा करा.

७६व्या व्यास पूजा महोत्सव निमित्त
परम आदरणीय, परम पूज्य लोकनाथ स्वामी महाराजांच्या चरणी कोटी कोटी प्रणाम।

या आनंददायी दिवशी,
भगवान श्री श्री पंढरीनाथ, गौर निताई आणि जगद्गुरु श्रील प्रभुपाद यांच्या चरणी माझी हीच प्रार्थना आहे की —
गुरु महाराज पूर्णपणे स्वस्थ, निरोगी आणि दीर्घायुष राहावेत.

मी जवळजवळ तीन वर्षांपासून ISKCON शी जोडलेली आहे, आणि मला याचा अत्यंत अभिमान आहे.
ही माझ्यासाठी परम भाग्याची गोष्ट आहे की मी भक्तीच्या या सुंदर मार्गावर ISKCON च्या माध्यमातून चालू शकते.

पूजनीय लोकनाथ स्वामी महाराज,
तुमचं जीवन,आणि श्रीकृष्णप्रेमा तुमची कीर्तनसेवा ही लाखो भक्तांसाठी प्रेरणादायी आहे.
तुमचं प्रत्येक शब्द आमच्यासाठी वचन आहे, आणि प्रत्येक कृती एक मार्गदर्शक आहे.

तुम्ही जसं अखंड श्रीकृष्ण नाम प्रचारासाठी तुमचं आयुष्य अर्पण केलं,
तसंच आम्हीही तुमच्या चरणी निष्ठा ठेवून, श्रीकृष्णच्या सेवेसाठी जीवन समर्पित करू यासाठी कृपा करा.

आज या व्यासपूजेच्या पवित्र प्रसंगी, माझा हा संकल्प आहे की
भक्ती, सेवा आणि नामस्मरण या मार्गावर मी स्थिरतेने, नम्रतेने आणि निष्ठेने वाटचाल करीन.

गुरु महाराज, माझ्यावर अशी कृपा करा की मी भक्तीमध्ये उन्नतीवर जाऊ शकेन.
असा तुमचा आशीर्वाद मला द्या.

---

दिनांक-२६/०५/२०२५

शब्दांजली

नमो ओम विष्णुपादाय कृष्ण श्रेष्ठाय भूतले ।। श्रीमते लोकनाथ स्वामिं इति नामिने ।।

परम पुज्य गुरुमहाराज आपल्याला साष्टांग नमस्कार.

मी भौतिक जगामध्ये खितपत पडलो होतो, परंतु आपला कृपा कटाक्ष हरीनामामृत मिळाल्यामुळे भगवंत प्राप्तीचा या मार्ग मिळाला आहे. त्यामूळे खरोखरच मी भाग्यशाली जीव आहोत.

झूम जपण आमच्या सारख्या जीवांना हे वरदान ठरले आहे. आपले दर्शन आपल्या संग सकाळी मिळतो. त्या उत्साहाने दररोजची सकाळ सुरू होते. आपले प्रवचन रसभ्रशित असते. सतत तुमची वाणी कानावर पडावे असे वाटते आपन ज्यविघ्ने राधामाधव सुंदरते ध्यान भजन म्हणता, त्यविली आम्ही आनंदी होतो आपल्यासारखे गुरु आम्हाला मिळाले खरोखर आम्ही शून्य आहोत, सुखःशांतीचा यविनि आम्हाला अनुभव होत आहे.

भगवंता शिवाय सर्व काही शुन्य आहे. याची प्रचिती होत आहे. माझ्यावर असा कृपा कटस राहो महाराज आपनास कोटी कोटी प्रणाम...

आपला शिष्य,

**तुकाराम भक्त दास, शिरढोण,**
**राधागीवाल मंदिर, आरवडे**

शब्दाजंली

२६/५/२०२५

नमो ओम विष्णुपादाय कृष्ण श्रेष्ठाय भूतले । श्रीमते लोकनाथ स्वामिं इति नामिने ।

परम पूज्य गुरुमहाराज आपल्या चरणकमलावर माझा साष्टांग नमस्कार

गुरु महाराज तुम्ही अंधारातून प्रकाशाकडे जाण्याचा मागे आइहाला दाखिवला है मी माझे रोज भाग्य समजते. सकाळी जपाटॉकच्या वेळी तुम्ही आसनावर सर्व आणि अस्ता तुम्हाला पाहुन समाधान वाटते. व उत्सव आनंद वाटतो. या आम्ही तुमची कथा आईकतो जनु काही लिलाच घडतात असे वाटते. तुमच्या मुळे आम्ही चार थाम केल्या साचे समाधान मिळाले भगवंताची सेवा व भक्ती कशी करावी हे अम्हाला समजले. सूर्व श्रेय महालक्ष्मी मात्ताजीचे आहे. आज त्यांच्यामुळेच मी आध्यात्मिक मागावर आले. त्या आमच्या शिझा गुरु आहेत. त्यांनी आम्हाला गुरु चे महत्व सांगितले हरीनामाभूत मिळाल्यामुळे भगवंत प्राप्तीचा मागे मिळाला आहे. आपल्या सारखे गुरु आम्हांला मिळाले. खरोखरच आम्ही धन्य आहोत. माझ्याबूर असाच कृपाकटाच राहो, माझ्या हातून राधागोपालची सेवा होवो हाच अभिलाषा

**आपली शिष्या**
**अरुंधती देवी दासी**
**शिरढोण**
**राधा गोपाल मंदिर इस्कॉन आरवडे.**

नम ओम विष्णु पादाय कृष्णप्रेष्ठाय भूतले
श्रीमते लोकनाथ स्वामीन इती नामीने.

सर्वप्रथम गुरू महाराज आज ६जुलै २०२५ तुमची ७६ वी व्यासपूजा आजच्या दिवशी राधा पंढरीनाथ, राधा गोपाल, श्री श्री विठ्ठल रुक्मिणी यांना प्रार्थना करते
की ,तुम्हाला उत्तम आरोग्य आणि दीर्घायुष्य लाभो.

गुरु महाराज तुमचा व्यक्तिगत संग ७५ व्या व्यासपूजेनंतर श्रीधाम पंढरपूर येथे वनभोजनाच्या कार्यक्रमा वेळी मिळाला भू वैकुंठ प्रकल्पाविषयी असणारे तुमची तळमळ पाहून आम्हालाही काहीतरी या प्रकल्पासाठी फुल ना फुलाची पाकळी मदत करावी अशी इच्छा निर्माण झाली पण काय द्यावे आणि आपण देऊ शकू का याची मनात भीती होती पण त्यानंतर काही वेळाने आमचे वरिष्ठ गुरुबंधू श्रीमान इष्टदेव प्रभू यांनी तुम्ही थोडंसं का होईना द्या असं म्हणल्यानंतर लगेच गुरु महाराज हो म्हणून तुमच्या चरणांचा स्मरण करून मी प्रभुजींना कमिटमेंट दिली आणि तुमच्या आशीर्वादाने ती कमिटमेंट पुढील दोन महिन्यात लगेच पूर्ण करू शकले.

दररोज झूम जपा टॉक मध्ये तुमच्या संग मिळतो अनेक भक्तांबरोबर जप करण्याची संधी मिळते गुरू महाराज ज्यावेळी तुमच्याबरोबर जप करतो त्यावेळी जप थांबव असा वाटत नाही आणि जप करताना काही छोट्या छोट्या टिप्स देता त्याचा आध्यात्मिक भक्ती वाढवण्यासाठी आणि वैष्णवांची सेवा खूप फायदा होतो आणि सेवा करण्यासाठी उत्साह वाढतो.

गुरु महाराज मागील एप्रिल महिन्यात 16 तारखेला माझे ऑपरेशन झाले त्यावेळी गुरू महाराज दुसऱ्या दिवशी माझा जपा होईल की नाही याबद्दल मला मनोमन भीती वाटत होती पण रात्री झोपताना गुरु महाराज मी तुमच्या चरणांचा स्मरण करून झोपल्यामुळे दुसऱ्या दिवशी सकाळी तुम्ही सकाळी सव्वापाच वाजता दोन्ही हात वर करून आशीर्वाद दिल्यामुळे माझा पूर्ण जपा झाल्यानंतर ऑपरेशन झाले आणि मी ज्यावेळी शुद्धीवर आले त्यावेळेस सुद्धा मला जगन्नाथ त्यांचा दर्शन मिळालं तो दिवस मी कधीच विसरणार नाही आणि ज्यावेळी मी शुद्धीवर आले त्यावेळी छोट्याशा रथातून हात हलवत जगन्नाथ पुढे जाताना दर्शन दिले.

गुरु महाराज तुम्ही मला शिष्य म्हणून स्वीकारला त त्यामुळे आम्हाला आरवडे, राधा गोपाल मंदिर, भक्ती ,वैष्णवांची सेवा, धर्म ,संस्कार, वरिष्ठांचा आदर इत्यादी सर्व गोष्टी शिकण्यास मिळाल्या परवाच मी हरे कृष्णा दिंडी सुद्धा एक दिवसासाठी सहभाग घेतला आणि पाच किलोमीटर चालण्याचा पहिल्यांदा अनुभव मिळाला त्यावेळी प्रत्येक क्षणी मी तुमचे नाव घेऊन एक एक पाऊल टाकत होते हे सर्व काही तुमच्याच कृपेमुळे होऊ शकले आणि तुमचं वाक्य सतत मला स्मरणात येत होतं जायच्या आधी एकदा जायला पाहिजे म्हणूनच हे धाडस फक्त माझ्या गुरुमाऊलींच्या कृपेने करू शकले पुन्हा एकदा ७६ व्या व्यास पूजेच्या हार्दिक शुभेच्छा परमपूज्य लोकनाथ स्वामी गुरु महाराज की जय

**Samvitshakti DD (Sangali)**



# मराठी

आदरणीय माझे गुरु महाराज तुम्हाला कोटी कोटी दंडवत प्रणाम सर्वप्रथम तुम्हाला व्यास पूजेच्या खुप खुप शुभेच्छा मी आज जी काही भक्ती मध्ये टिकून आहे ती केवळ तुमच्या कृपा आशीर्वादामुळे. तुमच्या सारखे थोर गुरु महाराज मला मिळाले हे माझे भाग्यच आहे. तुम्ही सर्वच शिष्यवरती कृपा करता. भक्ताच्या कल्यानाकारीता, भगवंतांच्या प्रचाराकरिता तुम्ही खुप सारी मंदिरे बांधली आहेत. पंढरपूर धाम प्रोजेक्ट हा पण लवकर पूर्ण होउदे ही भगवंतांच्या चरणी प्रार्थना करते. गुरु महाराज तुम्ही आजही न थकता अखंड हरी नामाचा प्रचार प्रसार करीत आहात. मलापण भगवंतांची सेवा करण्याची, भक्तांची सेवा करण्याची बुद्धी होउदे शक्ती मिळूदे असा कृपा आशीर्वाद द्या. गुरु महाराज तुम्हाला उदंड आयुष्य व चांगले आरोग्य लाभो हीच भगवंतांच्या चरणी प्रार्थना तसेच आपन झूम मंदिर बनवून आम्हा साऱ्या भक्तांवर कृपा केली आहे. 23 तारखेच्या एकादशीला सांगली भक्तांसामवेत तुमचे जवळून दर्शन घडले व आशीर्वाद पण मिळाला आणि त्या मुळेच आम्हा सर्वाना श्री श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे चरण दर्शन घडले. माझे प्रिय गुरु महाराज तुमच्या चरणी कोटी कोटी प्रणाम

**उद्धव गीता देवी दासी सांगली महाराष्ट्र**

---

हरे कृष्ण

गुरु महाराजाच्या चरणी माझा कोटी कोटी दंडवत प्रणाम. गुरू महाराजाना त्यांच्या 76 वी व्यासपूजा निमित्ताने कृष्णभावनाभावीत लाख लाख शुभेच्छा.

परम पूज्य गुरुमहाराज यांच्याबद्दल सांगायचे झाले तर मागील व्यास पूजा व दीक्षा समारंभात गुरु महाराजाच्या मुखातून मी एक वाक्य ऐकले होते,ते खूप प्रभावित करून गेले. आणि यातून माझे गुरु महाराज किती कृपाळू आणि दयाळू आहेत ते दिसून येते.ते वाक्य असे होते की " संन्याशाला मुल नसतात पण तुम्ही सगळे माझे मुलच आहात ,तुम्ही माझे परिवार आहात " गुरु महाराजांनी , या वाक्याद्वारे तेथे उपस्थित सर्व भक्त गण पात्र आहेत किंवा अपात्र आहेत याचा विचार न करता गुरु महाराजांनी आपल्या मुलाच्या रूपात स्वीकार केला. आपण प्रत्यक्ष भगवंताकडे पोहचू शकत नाही,परंतु आपल्या गुरुच्या द्वारे आपण नक्कीच भगवंताकडे नक्कीच पोहचू शकतो.
माझे गुरू महाराज त्रिकाल दर्शी आहेत त्यांचा कीर्तनाची अदभुत महिमा संपूर्ण जगात पसरली आहे , संपूर्ण जगच नाही तर याचे स्वर गोलोक धामांपर्यंत पोचली आहे. गुरु महाराजाच्या कीर्तनाची महिमा एवढी अपार आहे की स्वयं भगवान श्री कृष्ण व राधाराणी बरसाना येथे भक्तांच्या रूपात अवतरले आणि गुरु महाराजाच्या कीर्तनाचा आनंद घेतला ,,हरी बोल!!!

माझा अनुभव गुरू महाराजांबद्दल सांगायचे म्हणजे . माझ्या जीवनात अनेक समस्या होत्या परंतु ज्यावेळेस गुरू महाराजांनी मला शिष्य म्हणून स्वीकारले तेंव्हा पासून माझे आयुष्य मंगलमय झाले आहे.त्यासाठी गुरु महाराजांचे खूप खूप शेतश्यः आभार आणि कोटी कोटी प्रणाम.

गुरु गुरुमहाराजासाठी मी भगवंताकडे हिच प्रार्थना करते की जसे गुरु महाराजांना भागवतांनी या भूतलावर विशिष्ट आशीर्वाद देऊन अनेक पतित जीवांचा उद्धार करण्याकरिता पाठवले आहे.तर हीच भगवंतांचि कृपा गुरू महाराजाना जन्मोजन्मी मिळावी. प्रभूपाद आणि गुरु महाराजाच्या या हरे कृष्ण आंदोलनात मला सदैव सेवा व सहभाग लाभु दे अशी माझी गुरु चरणी प्रार्थना. धन्यवाद.

**सीता सेव्या देवी दासी**
**इस्कॉन विजय नगर सेंटर सांगली.**

---

हरे कृष्ण,जय गुरुमहाराज दंडवत प्रणाम 🌷 🌷 🌷 🌷 🌷 🌷, 🌷
व्यासपूजेसाठी गुरुमहाराजाना हार्दिक हार्दिक शुभेच्छा, गुरुमहाराजांची वाणी, किर्तन, प्रवचन मनाला मंत्रमुग्ध करून सोडते व सारखे सारखे ऐकावे असे वाटते,
जेंव्हा जेंव्हा आम्ही गुरुमहाराजांचे प्रवचन ऐकले तेंव्हा आम्हाला भक्तीमध्ये प्रगती होण्यासाठी काय काय करावे याचे उत्तम मार्गदर्शन झाले आहे.
गुरुमहाराज यांना उत्तम स्वास्थ्य व दीर्घायुष लाभो, व आम्हास त्यांचे मार्गदर्शन, सहवास मिळावा यासाठी भगवंताकडे प्रार्थना करतो.
गुरुमहाराजांचा आम्हास कृपाशीर्वाद मिळावा म्हणुन त्यांची प्रार्थना करतो.

**गुलाबराव पाटील,सांगली**







हरे कृष्ण, दंडवत प्रणाम,

परमपूज्य गुरु महाराजांच्या चरणी कोटी कोटी दंडवत प्रणाम.
परमपूज्य गुरु महाराजांना व्यासपूजा निमित्त खूप खूप हार्दिक शुभेच्छा. गुरु महाराजांचं दररोज दर्शन घेतल्याशिवाय आमचा दिवस सुरू होत नाही.

त्यांच्या सानिध्यात जप केल्याने मनातली सगळी निगेटिव्हिटी दररोजच्या दररोज बाहेर पडते आणि प्रसन्न मनाने नवीन दिवसाला सुरुवात होते. ही गुरु महाराजांची खूप मोठी देणगी आहे. न चुकता जपा टॉकला उपस्थिती असल्याने आम्हाला खूप खूप आनंद होतो. ह्या वयात ही त्यांची आमच्या प्रति असलेली तळमळ दिसून येते आणि आपण योग्य छत्रछाया खाली आहोत याची खात्री पटते.
महाराजांना खूप खूप आयुष्य लाभो, आरोग्यपूर्ण आयुष्य असावे, भगवंतांची सेवा त्यांच्याकडून अशीच उत्तरोत्तर होत जावी हीच भगवंत चरणी प्रार्थना.

**हरे कृष्ण**
**प्रेम संपदा देवीदासी**
**सांगली**

---

नमः ओम विष्णुपादाय कृष्ण प्रेष्टाय भूतले / श्रीमते लोकनाथ स्वामिन् इति नामिने //. गुरु महाराज प्रणाम 🙏🙏🙏🌹🌹🌹 गुरु महाराज खूप कृपाळू आहेत. आपल्या शिष्यावर सतत त्यांचा आशीर्वाद असतो. गुरु महाराज नेहमी रामवर कृपाशीर्वाद देत असतात. गेल्या वर्षी रामचा वाढदिवस होता. तर गुरु महाराजांनी त्याला मायापूरचा प्रसाद दिला. व म्हणाले, की राम आज तुझा वाढदिवस साजरा झाला. गुरु खूप दयाळू असतात. गुरु महाराजांनी सर्व भक्तांना व गुरुकुलच्या विद्यार्थ्यांना घेऊन कीर्तन केले. तेव्हा मला HG ध्रुव महाराज प्रभूजी म्हणाले होते.की राम वर केवढी मोठी कृपा आहे. गुरु महाराजांची, की आज तो गुरु महाराजांबरोबर आहे. त्याच्या वाढदिवसाला गुरु महाराज आहेत . राम किती भाग्यवान आहे.की त्याचा वाढदिवस गुरु महाराजां समोर साजरा होत आहे. गुरु महाराज आशीच कृपा आमच्यावर असू द्या. आज राम गुरुकुल ला जगन्नाथ कृपा प्रभुजींच्या मार्गदर्शनाखाली सेवा,साधना, करत आहे. त्याच्यावर सर्व वैष्णवांचे कृपा आशीर्वाद राहोत, हीच गुरु महाराज व वैष्णवांच्या चरणी प्रार्थना
गुरु महाराजांना 76 व्या व्यास पूजेच्या हार्दिक हार्दिक शुभेच्छा 🌹🌹🌹🙏🙏🙏
गुरु महाराज माझ्यावर व माझ्या परिवारावर तुमचा आशीर्वाद राहू द्या.🙏🙏🙏 हरे कृष्ण धन्यवाद.
**आपली कृपाभिलाशी , उज्वल माधवी देवी दासी . इस्कॉन सांगली**

---

ओम अज्ञान-तिमिरांधास्य ज्ञानांजन-शलाकाया
चक्षुर उन्मिलितां येना तस्मै श्री-गुरवे नमः

नम ॐ विष्णु-पादाय कृष्ण-प्रेष्ठाय भूतले
श्रीमते लोकनाथ-स्वामिन् इति नामिने ।

परमपूज्य पितातुल्य प्रिय गुरु महाराज आपल्या चरणी कोटी कोटी दंडवत प्रणाम
सर्वप्रथम आपल्याला व्यास पूजेच्या हार्दिक शुभेच्छा
आपण हरिनामाचा प्रचार प्रसार जगभर करत आहात व पतित जीवांचा उद्धार करत आहात. श्री श्री राधा गोपाल यांच्या चरणी प्रार्थना करतो की आपल्याला उदंड आयुष्य व आरोग्य लाभो जेणेकरून आमच्यासारख्या पतितजीवांचा उद्धार करीत राहाल.
आमचे परम सौभाग्य आहे की प्रत्येक दिवसाची सुरुवात गुरु वाणी व गुरु दर्शनाने होते झूमद्वारे.
गुरु महाराज आपले सुमधुर कीर्तन व कथा नेहमी ऐकत असतो.
गुरुदेव आपण खूप दयाळू कृपाळू आहात त्यामुळेच माझ्यासारख्या पतित जीवाला आपल्या चरणाचा आश्रय दिला.
पुन्हा एकदा गुरु महाराज आपल्याला व्यास पूजेच्या खूप खूप शुभेच्छा

**आपला दर्शन अभिलाषी सेवक**
**सुंदर विठ्ठल दास**
**सांगली**





प पू लोकनाथ स्वामी गुरु महाराज यांच्या 76 व्या व्यासपुज निमित्त शब्दांजली🙇

नमो ओम विष्णुपदाय कृष्णप्रेष्टाय भूतले।
श्रीमते लोकनाथ स्वामी इति नामीने।
नमस्ते सारस्वते देवे गौरवाणी प्रचारीने।
निर्विषेश शुन्य वादी पाश्चात देश तारीने॥

आदरणीय प पु गुरु महाराज आपल्याला कोटी कोटी दंडवत प्रणाम

वंदनीय गुरु महाराज आपल्या बद्दल काही लिहीण्याची आमच्यात कोणतीही पात्रता नाही पण जसे आई वडिलांना आपल्या छोट्याशा मुलाचे बोबडे बोल ऐकण्याची उत्सुकता असते तसेच आपल्याला पण आपल्या शिष्यांची वाणी ऐकण्याची खूप उत्सुकता असते. आदरणीय गुरु महाराज आपण जे प्रभुपादांचे मिशन अतिशय तळमळीने पुढे नेत आहात त्यावरून असे दिसते की आपले प्रभुपादांवर किती प्रेम आहे, आपला एक क्षण सुद्धा प्रभुपादांच्या मिशन वितिरीक्त वाया जात नाही, या वरुनच कळते की आपली आपल्या गुरु प्रति किती निष्ठा आहे.
आदरणीय गुरु महाराज आपण खूप दयाळू आहात, आपण पदयात्रा काढून खेडोपाड्यात, गावागावात जाऊन देशाच्या कानाकोपऱ्यात जाऊन आपण अगदी अनपड अशिक्षित लोकांना पण आपण कृष्ण प्रेम प्रदान करुन आपण या कृष्ण भावनेच्या प्रवाहात आणत आहात, एवढे दयाळु कोण असू शकते.
आदरणीय गुरु महाराज आपण रात्रीचा दिवस करुन परदेशातील बद्ध जीवांना कृष्ण प्रेम प्रदान केले.
आदरणीय गुरु महाराज आपण जो करोना काळात आपल्या शिष्यांच्या आध्यात्मिक उन्नतीसाठी झूम जपा चालू केला तो अवर्णनीय दुर्मिळ आहे, आज पर्यंत कोणीही एवढे दयाळू आचार्य होऊन गेले नाही जे आपण प्रत्येक शिष्याच्या प्रति एवढी तळमळ करीत आहात, आपण गाडीने प्रवास करत असू, ट्रेन मध्ये असू किंवा हवाई प्रवासात असू तरी तुम्ही दररोज झूम च्या माध्यमातून प्रत्येक शिष्याला सकाळी ब्रम्हमुहर्तावर दर्शन देतात, एवढे कोणाचे भाग्य आहे, पण आम्हीच दुर्भाग्यशाली आहोत जे एवढा सुवर्ण अवसर असून सुद्धा सकाळी उठत नाही.
आदरणीय गुरु महाराज आपण बहुतेक ग्रंथांची रचना केली त्यामध्ये मुख्यत्वे करून *भूवैकुंठ पंढरपूर* आणि *व्रज मंडल परिक्रमा* हे ग्रंथ वाचून घर बसल्या 84 कोस परिक्रमा होते.
आदरणीय गुरु महाराज आपला स्वप्नातील प्रकल्प ड्रीम प्रोजेक्ट *भूवैकुंठ पंढरपूर* खूप सुंदर आहे त्यासाठी आपण दिवस रात्र मेहनत घेत आहात, त्यासाठी आम्ही पण शक्य तेवढी मदत करत आहोत आणि पुढेही करत राहू.
आदरणीय गुरु महाराज आपण कोणतीही विश्रांती न घेता अखंड प्रवास, प्रचार, प्रसार करत आहात आणि इतर भक्तांचे पण आपल्या प्रति खुप प्रेम असल्यामुळे त्यांच्या साठी पण आपल्याला वेळ द्यावा लागतो, आणि म्हणुनच आपली तब्येत आपल्या साथ देत नाही, तरी आपण

नमः ॐ विष्णु-पादाय कृष्ण-प्रेष्ठाय भूतले।
श्रीमते लोकनाथ-स्वामिन इति नामिने॥
गुरु महाराज आपल्या चरणी कोटी कोटी दंडवत प्रणाम ! सर्व प्रथम आपणास ७६ व्या व्यासपुजेच्या खूप शुभेच्छा. तुम्ही कायम निरोगी आणि खूप आनंदी रहा.

गुरु महाराज आपण इतके श्रेष्ठ आहेत की माझ्या मध्ये तेवढा सामर्थ्य सुद्धा नाही की मी तुमची महिमा जाणून घेऊ. गुरु महाराज तुम्ही माझ्या सारख्या मूर्ख, अज्ञान, माया मध्ये लिप्त झालेल्या माणसाला सुद्धा तुमच्या सोबत नाम जप करण्याची संधी दिली त्याच्या साठी तुमचे कोटी कोटी आभार.
गुरु महाराज मी खूप प्रयत्न करेन कधी कोणता जाणून वैष्णव अपराद नाही करणार आणि जरी काही न कळत अपराद होतील त्याच्या साठी तुमच्या चरणी क्षमा मागतो. मला जाणीव आहे की तुम्ही माझ्या सारख्या निच माणसाला ला किती मोठी सुवर्ण संधी दिली आहे मि रोज स्वतःला तुमच्या चारणं जवळ अन्याचा आणि कृष्ण भक्ती मध्ये प्रगती करण्याचा प्रयत्न करेल. तुमचा कृपा आशीर्वाद माझ्या वर कायम राहुद्या.

**तुमचा चरणांचा दास**
**भक्त आर्यन साळुंके**
**ISKCON Solapur**

गुरू महाराज, तुमच्या कृपाने, मी राधारानी, kitchen seva , Vaishnav cooking seva, Janmashtami collection, book Distribution, Rangoli seva , नवीन नवीन भक्तांना जोडायचा प्रयत्न करते, preaching,
आमची हि सर्व IGF Iskcon **Solapur**, पूर्ण मिळून करतो, गुरू आणि गौरंग च्या कृपेने.धन्यवाद गुरु गुरू महाराज. **भक्तिन Priti Jadhav.**

नम ओम् विष्णूपादाय कृष्णप्रेष्ठाय भूतले
श्रीमते लोकनाथाय स्वामिन इति नामिने

परम पूज्य लोकनाथ स्वामी महाराज यांच्या चरणी पंचांग प्रणाम

गुरुदेव मी रुपवतीराधिका दासी आपणास व्यासपूजा दिनानिमित्त शुभेच्छा देत श्री श्री राधादामोदर यांच्या चरणी प्रार्थना करते की, माझे गुरुदेवांचे कृपाशिर्वाद सदैव आमच्यावर असो.

गुरुदेव आपले जीवन म्हणजे तपस्याच आहे. भूवैकुंठ मंदिरासाठी आपली धडपड हे श्रील प्रभुपाद व भगवंतांच्या प्रसन्नतेसाठी आपले जीवन समर्पित केले. श्रील प्रभुपाद यांच्या आदेशानुसार गेल्या 40 वर्षे आपण बैलगाडीवर गावो गावी जाऊन भगवंतांच्या नामाचा प्रचार केला आहे. आणि यासाठीच श्रील प्रभुपाद आपणास संत तुकाराम महाराज म्हणायचे. असे साक्षात तुकाराम महाराज हेच माझे गुरुदेव आहेत. गुरुदेव नुकताच मी आदरणीय अमोघलिला प्रभुजींच्या मुखातून आपले गुणगान ऐकले आहे. त्यांनी आपणास संकिर्तन व नाम प्रचार कार्यामुळे नाम के आचार्य असे संबोधित केले आहे. हे ऐकताच मला खूप आनंद वाटला. व त्यात आपली तपस्या व सेवा बघून मी खूप गहिवरुन आले की हे माझे गुरुदेव आहेत.

गुरुदेव आपण माझे अध्यात्मिक पिता आहेत. मी किती भाग्यशाली आहे जसे "यस्य प्रसादान् भगवत प्रसादो" म्हटल्याप्रमाणे आपण मला श्रीमद् भागवतम आपल्या स्वहस्ताने प्रदान केलात. ही आपली माझ्यावर अहैतुकी कृपाच आहे.

गुरु महाराज आपण मला आदेश दिले होते की, "तुम्ही हरिनाम संकिर्तन प्रचार करा, किर्तन करा, नृत्य शिकवा" यामुळे मी आपल्या आदेशानुसार व आपल्या कृपाशिर्वादाने मी माझे काउंसिलर आदरणीय व्रजवधू देवी दासी माताजींच्या नेतृत्वाखाली प्रचार कार्य करीत आहे. गुरुदेव व्रजवधू माताजींच्या सहकार्याने मी हरिनाम संकिर्तन शिकणे व शिकविणे यावर लक्ष केंद्रीत केले आहे. तसेच प्रचारही सुरू आहे, जसे की, जन्माष्टमी, गौरपौर्णिमा अशा कार्यक्रमामध्ये भगवंतांच्या लिलानाट्य करणे. माताजींच्या आदेशानुसार IGF मुलींसोबत भक्तिवृक्ष वर्ग घेणे, मुलींना करताल व मृदंग वाजविणेकरिता तसेच भगवंतांच्या लिला नाट्य करण्याकरिता सहायता करणे, प्रल्हाद स्कूल मधील लहान मुलांना नाट्य शिकविणे भगवंतांच्या कथा सांगणे इ. सेवा मी आपल्या कृपेने करित आहे. गुरुदेव आपली कृपाबिंदू असेच माझ्यावर सतत राहो, जेणेकरुन मी प्रचार कार्यात सतत व्यस्त राहीन. व माझ्याकडून कोणतेही वैष्णव तथा नाम अपराध घडू नये. आपल्या जीवनाचे आदर्श लक्षात घेऊन मी सतत हरिनाम संकिर्तनात व्यस्त असावे.

**रुपवती राधिका देवी दासी Solapur**

शब्दांजली – व्यासपूजा २०२५
अत्यंत पूजनीय श्रीलोकेनाथ स्वामी महाराज यांना

ओम विष्णुपाद परमंहंस परिव्राजकाचार्य अष्टोत्तरशत श्री श्रीलोकेनाथ स्वामी महाराज की जय!

प्रेममय गुरुदेव,

आपल्या या पावन व्यासपूजेनिमित्त, मी अत्यंत नम्रतेने आणि कृतज्ञ भावनेने आपल्या चरणकमळांमध्ये ही लहानशी शब्दांजली अर्पण करीत आहे.

आपल्या जीवनाकडे पाहिलं, की समजतं की खऱ्या अर्थाने "गुरु" म्हणजे काय. आपली प्रभुपादांप्रती अखंड निष्ठा, भक्तांप्रती दयाभाव, आणि आपली सेवाभावना — ही सर्व आमच्यासाठी केवळ शिकवण नाही, तर एक जिवंत प्रेरणा आहे.

मी व्यक्तिगतरीत्या जेव्हा आपल्याला प्रथम आपले
कीर्तन ऐकलं आणि जेव्हा पहिल्यांदा तुम्हाला पाहिलं, तेव्हा आपल्या आवाजातील स्थैर्य, नेत्रातील करुणा आणि चालण्यातली नम्रता — या तिन्ही गोष्टी माझ्या हृदयात घर करून राहिल्या.

आपण "प्रेमाने सेवा करा" हे केवळ सांगत नाही, तर ते जसं कृतीतून जगता — हे पाहणं हीच माझ्यासाठी आपली सर्वात मोठी दीक्षा आहे.

आपल्या कृपाशक्तीमुळे माझं आयुष्य कधीतरी श्रीकृष्णसेवेसाठी खऱ्या अर्थाने समर्पित होईल, हीच प्रार्थना. याप्रसंगी एक छोटीसी अभंग सुचवते.

लोकेनाथा माझे जीवन तू,
प्रेमे भरले तुझे चरणरू.
द्या कृपादृष्टी, राहो सेवा सततू.

आपल्याशी संबंधीत राहणं, हेच माझं जीवनाचं खऱ्या अर्थाने सौभाग्य आहे. आपण माझ्यावर अशीच कृपा राखावी ही नम्र विनंती. हरे कृष्ण 🙏🙏

**आपल्या चरणकमळांमध्ये,**

---

हरे कृष्ण दंडवत प्रणाम गुरुमहाराज,

प्रिय गुरुमहाराज,

गुरुमहाराज, मी तुमच्या चरणांशी वंदन करतो आणि तुमच्या कृपेने मी सध्या भक्तीमार्गावर आहे. तुमच्या कृपेने मला भक्तांसह सेवा करण्याची संधी मिळत आहे आणि तुमच्यामुळे मला कृष्ण कोण आहेत हे कळाले आहे. तुमचे कीर्तन माझ्या हृदयाला स्पर्श करते, जसे एखाद्या मुलाला आई दहा वर्षांनी पाहते तसे. तुमच्या गातलेल्या वैष्णव गीतांमुळे मला भक्ती करण्याची प्रेरणा मिळते. गुरुमहाराज, तुमचे दैनंदिन विचार मला अधिक प्रमाणात भक्ती करण्यासाठी प्रोत्साहन देतात.

गुरुमहाराज, तुमचे पादयात्रा खरोखरच प्रेरणादायक आहेत. एवढ्या मोठ्या प्रमाणात पादयात्रा करणे हे खरोखरच श्री चैतन्य महाप्रभू आणि श्रील प्रभुपाद यांच्या मिशनला शरणागती आहे आणि हे माझ्याही जीवनात यायला हवे. महाराज, तुम्ही जेव्हा "हरी हरी" म्हणता, तेव्हा आम्हा सर्वांना मोठी प्रेरणा मिळते. आजही वयाच्या ७६ व्या वर्षी तुम्ही प्रत्येक मंदिरात प्रवचन आणि कथा सांगण्यासाठी जाता, आणि तुमच्या कृपेने भुवैकुंठ मंदिराच्या नवीन मोठ्या बांधकामाची सुरुवात झाली आहे.

मी नेहमीच भगवान विठ्ठल आणि नित्यानंद प्रभु यांना प्रार्थना करतो की तुमचे आरोग्य चांगले राहो आणि तुमच्या चरणकमळांची सेवा करण्याची संधी मला मिळो.

कृपया माझे हे भावपूर्ण अर्पण स्वीकारा.

**तुमचा दास,**
**अजित** Solapur

नम ॐ विष्णुपणदाय कृष्ण पृष्ठाय भूतले ।
श्रीमते लोकनाथ स्वामिन इति नामिने ।।

प्रिय गुरुमहाराज

आपल्या ७६ व्या व्यासपूजेय कोटी कोटी प्रणाम-गुरुमहाराज.

गुरुमहाराज प्रथम आपल्याला शतश नमन- गुरुमहाराज आपली वाणी, चाल आणि आचरणांचे दर्शन माझ्या सारख्या पतित जीवाला पवित्र करते. प्रभुपादांप्रति असलेले समर्पण आपण नेहमी आपल्याला कृतीतून व्यक्त करता जे आम्हाला सेवेसाठी पात्र होण्यास प्रेरित करते.गुरूमहाराज, आपल्यांना पतित जीवाप्रति असलेले तळमळ, आस्था, प्रेम खरेच माझ्या सारख्या पतित जीवांना खरे प्रेमाची व अस्तित्त्वांची जाणीव करून देते. गुरूमहाराज आपण या वयातही, जेव्हा सकाळी-सकाळी न चुकता सर्व भक्तांना आपले संघ देण्यास खूप उत्सुक असता, ही आपली उत्सुकता आम्हांला जप करण्यासाठी उत्सुकता आणते आणि दिवस भरातील येणाऱ्या प्रत्येक संकटाला सामोरे जाण्याची शक्तीही त्यातून मिळते.

गरुमहाराज माझ्या कडे कोणतीच पात्रता नाही पण जे काही चांगल घडत आहे तिथे फक्त आपलीच कृपा माझ्यासोबत आहे. आणि गुरुमहाराज आपण सांगितलेल्या पदचिन्हांचे अनुसरण केल्याने जीवनात खूप आनंदी येत आहे- गुरूमहाराज आपल्या कृपेमुळेच कार्तिक मासच्या अगदी आरंभी दिवसामध्ये माझ्या जन्मदिनानिमित्त घराशेजारी असणाच्या लोकांना बोलवून व मादास माताजींच्या मार्गदर्शनामध्ये माझ्या जन्मदिनादिवशी दीपदान महोत्सव पार पाडले त्यात आबालवृध्द मिळून 20 ते 25 भक्तांनी दीपदान केले व भगवंताना 21 भोग अर्पण करून प्रसाद वाटप केले गेले आणि गीता मॅराथॉनच्या वेळी एकूण 57 भगवदगीता शाळेमध्ये व इतर ठिकाणी वितरण केली. गुरुमहाराज हे जे काही घडले इथे फक्त आपलेच कृपाशिर्वाद होते. इथून पुढे याहून अधिक सेवा करण्यासाठी आपल्या आणखी कृपाआशिर्वादाची सदैव माझ्यावर वृष्टी करावी, गुरुमहाराज आपण भुवैकुंठासाठी जी इच्छा व्यक्त केली आहे व आम्ही IGF Solapur मिळुन ७५००० ची सेवा घेतली आहे . ती लवकरात लवकर पूर्ण करू आणि मी ५००० रुपये या प्रकल्पासाठी देऊ ईच्छिते गुरूमहाराज कृपया यासाठी आपण प्रचार करण्याची युक्ती आणि शक्ती द्यावी व कृपया आपले कृपाशिर्वाद आम्हा सर्व igf मुलींना दयावे. आपल्या चरणाप्रति मी एवढीच प्रार्थना करते की सदैव आपल्या सेवेत राहो व दिलेली सेवा उत्कृष्टपणे व निरपराध पणे पार पाडो हीच इच्छा गुरूमहाराज.

**पतित जीव,**
**प्रिती वड्डेपल्ली**
**IGF Solapur**

O